# माणूस

एक समग्र साप्ताहिक

२० ऑगस्ट १९६
चाळीस पैसे



(उत्तरार्ध)



## राजसूय...

पूर्वी राजे राज्यविस्तारासाठी राजसूय यज्ञ करीत असत.

## प्रजासूय...

आज काळ आहे प्रजासूय यज्ञाचा–प्रजेने, सर्वसामान्य जनतेने आपल्या विकासा-साठी, चोहोबाजूंनी फैलावणाऱ्या मानसिक व बौद्धिक गुलामगिरीतून आपली मुक्तता करून घेण्यासाठी, आत्मस्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी, परस्परांच्या व देशाच्या उभारणीची लहानमोठी कार्ये स्वयंप्रेरणेने पुढे येऊन सिद्ध करण्याचा.

## माणूस प्रतिष्ठान

म्हणजे 'माणूस' साप्ताहिकाच्या असंख्य वाचकांनी स्वयंप्रेरणेने आरंभिलेला एक प्रजासूय यज्ञच आहे.

★ विक्री झालेल्या दर अंकाच्या *दर प्रतीमागे ४० पैशांतीलच एक पैसा 'माणूस प्रतिष्ठान 'साठी (माणूस फौंडेशन) वेगळा शिल्लक टाकणे.*

★ या शिल्लक निधीतून सर्वप्रथम महाराष्ट्रातला एखादा लहानसा मागासलेला भाग निवडून तेथे अन्नधान्य वाढीसाठी उपयुक्त ठरणारी पाणीपुरवठ्याची काही कामे पुरी करणे––

*काही विहिरी, तळी, एखादा छोटा तलाव इत्यादी.*

**येत्या २॥ वर्षांत १। लाख रुपयांचा निधी या कार्यासाठी उभा राहावा.**

*यासाठी 'माणूस' साप्ताहिकाच्या १। लाख प्रतींची विक्री दर आठवड्याला होणे अवश्य आहे.*

## आपण आपला अंक कोठून घेणार ?

[ कव्हर पान ३ पाहा. ]




## एक समग्र साप्ताहिक


*वर्ष — सहावे*

*अंक : सातवा*

*किंमत : चाळीस पैसे*

*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

*अ. मा. साधू*

*दिलीप माजगावकर*

*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**

*अ. वा. गेधे*

*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता — ४१९ नारायण, पुणे २.*

*दूरध्वनी — ५७३५९*



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.


## □ वार्तालेख....वृत्तकथा

साप्ताहिक 'माणूस'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला आणि वाचकांनी त्याचे बऱ्यापैकी स्वागत केले.

उलटसुलट प्रतिक्रिया, अभिप्राय जे कळले त्यांत एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे.

'माणूस'चे साप्ताहिकात रूपांतर झाले असल्याने त्यात वृत्तकथन, चालू घडामोडींचे परामर्ष यांवर अधिक भर दिला जावा,अशी बऱ्याच जणांची अपेक्षा दिसली. ही अपेक्षा रास्त आहे. पण या प्रकाराच्या मजकुराचे स्वरूप काय असावे, हा खरा प्रश्न आहे.

दैनिकांच्या साप्ताहिक आवृत्त्यातून ठिकठिकाणची वार्तापत्रे, समालोचने प्रसिद्ध होतच असतात. कार्यालयात तयार होणारा स्फुटवजा मजकूरही अनेक ठिकाणी दिसून येतो. तेव्हा याच प्रकारच्या मजकुराची पुनरावृत्ती न करता निवडक विषयांवर विस्तृत वार्तालेख किंवा वृत्तकथा (Features News stories) द्याव्यात असा पर्याय 'माणूस'ने स्वीकारला. पहिला अंक १५ ऑगस्टचा असल्याने मोहन रानडे यांची 'स्वातंत्र्यसमर गाथा' त्या अंकात दिली. या अंकात गाथा पूर्ण होत आहे. यापुढील अंकांतून असेच कालोचित विषय निवडून, खास प्रतिनिधींकडून या विषयांवर नवीन माहिती जमा करून, ती आकर्षक स्वरूपात वाचकांसमोर ठेवण्याचा 'माणूस'-चा प्रयत्न राहील. 'माणूस'ने स्वीकारलेल्या या पर्यायावर वाचकांचे अभिप्राय समजले तर त्यांची योग्य ती दाद घेतली जाईल, हे सांगणे न लगे.

— संपादक

# पत्रकी

**स. न.** १८–७–६६

'माणूस प्रतिष्ठान' विषयी वाचले. मी सध्या वर्गणीदार आहे. अंक चालू ठेवणार आहे. पण आपले स्वप्न अजून तरी धूसरच वाटते. पूर्वसूरींनी काय केले होते याचा आपण मागोवा घेणार असालच. मला वाटते पुण्याच्या आसपास श्री. भागवत यांनी काही काम केले आहे.... खारीवरून आठवले. डॉ. रघुवीर यांचे Micro planning हे पुस्तक आपण पाहिले आहे का ? सध्याचे Planning, Macro-planning आहे, त्या ऐवजी ते Micro – सूक्ष्म – व्हायला हवे असे त्यांचे मत होते. आपल्याला त्याचा निश्चित उपयोग होईल... मूठ उघडी का बंद, हे कळेलच...

**नी. मा. डोंगरे,** मुंबई.

**स. न.** २५–७–६६

आपण 'माणूस फाउंडेशन'ची योजना केली आहे ती अत्यंत अनुकरणीय आहे. आपण पाणीपुरवठ्याच्या ज्या नवीन योजना करणार आहात, त्यांसाठी योग्य तो भाग निवडावा अशी विनंती आहे. कारण आपल्या या योजनेच्या यशावर पुढील योजनांचे यश अवलंबून आहे. माझ्या माहितीप्रमाणे मी आपणांस पुणे ते पानशेत रोडवर असलेले खानापूर हे गाव सुचवत आहे. या गावामध्ये वातावरण अतिशय चांगले असून श्रमदानाने अनेक कामे या गावाने केलेली आहेत. गावामध्ये डॉ. मोडक या नावाचे अत्यंत ध्येयवादी कार्यकर्ते आहेत. मुख्य प्रश्न पाण्याचाच आहे. आपण शक्य असेल तर त्या गावास भेट देऊन गावाने केलेली प्रगती आणि पाण्याचा प्रश्न समजावून घ्यावा. 'माणूस'च्या योजनेत यश लाभावे म्हणून योग्य अशा गावाची निवड सुचवीत आहे.

**एक वाचक**

**स. न.** ६–८–६६

आपण सावित्री वाचनालयाला पाठविलेली सप्रेम भेट पोहोचली. त्याबद्दल मी आपली फार आभारी आहे. ती पुस्तके वाचून आमच्या येथील रोग्यांना फार आनंद होईल, अशी मी आशा करते व त्यांच्यावतीने मी आपल्याला सुयश चिंतिते. लोभ असावा, ही विनंती.

**सौ. जयश्री वैद्य,** पुणे

[ 'माणूस'कडे 'अभिप्रायार्थ' आलेली पुस्तके काम झाल्यावर Society of Friends of the Sassoon Hospital या संस्थेला भेट म्हणून पाठविण्यात आली. सौ. जयश्री वैद्य या संस्थेच्या अध्यक्ष आहेत. – सं. ]

स. न. ११ ऑगस्ट ६६

आपण 'माणूस' साप्ताहिक करण्याचे जाहीर केल्यापासून साप्ताहिकाचा पहिला अंक पाहण्याची उत्सुकता लागली होती. आज अचानक एक (त्या मानाने खूपच लवकर) हाती आला. अंक संपूर्ण वाचून काढला.

अंकाची एकंदर रचना फारच छान जमली आहे. मुखपृष्ठ नेहमीप्रमाणे सुंदर झाले आहे. 'तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार' हा पहिलाच लेख फारच झक्क उतरला आहे.

नवीनच सुरू केलेली लेखमाला: 'आणि ड्रॅगन जागा झाला...' 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' या लेखमालेप्रमाणेच गाजणार या बद्दल शंका नाही. तसेच आपले पुस्तक परीक्षणाचे सदर चांगले वाटले. या सदराबाबत आपणास एक विनंती करावीशी वाटते. आपण प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकावर अभिप्राय लिहिण्यापेक्षा नवोदित लेखकांनी लिहिलेल्या काही निवडक पुस्तकांवर अभिप्राय प्रसिद्ध करावेत. त्यामुळे नवोदित लेखकांच्या पुस्तकांचे योग्य मूल्यमापन होईल असे वाटते.

आपण मागे पाक्षिकात देत होतात, त्याप्रमाणे काही निवडक हिंदी, मराठी, इंग्रजी चित्रपटांची परीक्षणे सादर केल्यास बरे होईल. आपण जरा रशियन चित्रपटांकडेही नजर टाकावी. काही रशियन चित्रपटांच्या कथा दिल्या तर फार चांगले होईल. निदान रशियन चित्रपटांवर परीक्षणे तरी द्यावीत.

शेवटी आपण राशीभविष्य दिल्याचे पाहून फारच आश्चर्य वाटले! राशीभविष्य देण्याची इतर साप्ताहिकांची व पडेल मासिकांची ही परंपरा आपण का उचलावी, हे कळत नाही. कृपया या दोन पानांचा उपयोग इतर काही चांगले देण्यासाठी करावा.

'माणूस' साप्ताहिकाचा संपूर्ण अंक वाचून काढल्यानंतर एक गोष्ट मात्र खटकली. या संपूर्ण अंकात एकही हलकी फुलकी कथा नाही. एखादी तरी चांगली कथा आपल्या अंकात असावी. 'काळरात्र' ही कथा बरी आहे. पण आवडली मात्र नाही.

एकूण साप्ताहिकाची मट्टी छान जमली आहे. स्पष्टपणे काही सूचना केल्याबद्दल राग नसावा. 'माणूस' साप्ताहिक आणखी खूप लोकप्रिय होईल, यात शंका नाही.

हरिश्चंद्र निपुणगे, पुणे.

स. न. ११-८-६६

आपणांकडून 'माणूस' चे १० अंक व सप्रेम भेटचा अंक, आजच मिळाले. त्वरित सहकार्याबद्दल आभारी आहोत. वाचकांच्यात, आपल्या 'माणूस' बद्दल खूपच आवड व सहानुभूति दिसून आली. तेव्हा आपणास विनंती अशी की पत्र मिळताच आणखी जास्त म्हणून ५ अंक पाठवण्याची कृपा करावी. कळावे.

वि. ल. वर्धे, कराड



तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार !

# मोहन रानडे

## मनोहर आपटे

## मोहन मनोहर

## उत्तरार्ध

: लेखक :

सुधीर फडके

[ संगीत दिग्दर्शक ]

मोहन रानड्यांची लोकप्रियता वाढत होती. त्यांच्या शांत, विचारी व निश्चयी स्वभावामुळे अनेक तरुण त्यांच्याकडे आकर्षित होत होते. जिवाला जीव देणारे सवंगडी भोवती गोळा होत होते. आता त्यांच्या गुप्त हालचाली वाढू लागल्या आणि या हालचालींमुळेच, परक्या, जुलमी, पोर्तुगीज सत्तेच्या आसनाखाली सुरूंगाची स्फोटक दारू ठासून भरली जाऊ लागली. पोर्तुगीज अधिकाऱ्यांनाही हळूहळू याचा सुगावा लागू लागला.

याच सुमारास स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एक स्फूर्तिदायक, दैदीप्यमान घटना आकार घेऊ लागली. महाराष्ट्रातील कणखर राष्ट्रीय वृत्तीच्या काही धाडसी तरुणांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील दादरा, नगरहवेलीचा भाग मुक्त करण्याची योजना आखली. ही योजना आखण्यात नाना काजवेकर

राजा वाकणकर, त्र्यंबक भट व मी स्वतः होतो. गोमंतकातील अप्पा करमळकर, विश्वनाथ लवंदे, श्यामराव लाड अशा राजकीय कार्यकर्त्यांचे साहाय्यही आम्ही या कामी मिळविले. या तरुणांच्यापैकी काहींनी नगरहवेलीभोवती पायी प्रदक्षिणा घातली. काहींनी गुप्तपणे आत शिरून आतील पाहणी केली. श्री. जयंतीभाई देसाईंसारख्या नगरहवेलीतील मातबर माणसांची मदत मिळविली. त्यांच्या सहकार्याने आतील काही लोकांच्या गुप्त बैठकी घेतल्या. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, सी. रामचंद्र, ललिता फडके ( देऊळकर ) अशा प्रसिद्ध कलावंतांच्या कार्यक्रमाद्वारे जवळ जवळ सात-आठ सहस्र रुपये या कार्यासाठी जमा केले. ( मीही या कार्यक्रमात आणि स्वातंत्र्य लढयात सक्रीय भाग घेतला. ) काही शस्त्रे जमा झाली. मोहन रानडे या संग्रमात सामील झाले नसते तरच नवल.

या स्वातंत्र्य सैनिकांनी दि. २७ जुलै १९५४ ला नरोली या गावावर हल्ला चढवून ते गाव काबीज केले. तिथले सर्व पोर्तुगीज शिपाई कैद केले. त्यांच्याजवळच्या बंदुकी व दारूगोळा हस्तगत केला. या हल्ल्यात मोहन रानडे होतेच. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. वरून शांत, अबोल दिसणाऱ्या या माणसामध्ये केवढे अचाट धाडस भरले आहे याची यथार्थ कल्पना यानंतरच्या एका प्रसंगाने आली.

**बेभान उडी**

दि. ३१ जुलैला रात्री २।। वाजता भिलाडहून स्वातंत्र्यसैनिकांची एक छोटी तुकडी नरोलीच्या दिशेने निघाली. या तुकडीने नरोली काबीज केलेल्या तुकडीला नरोलीहून बरोबर घेऊन सकाळी सेल्व्हास या राजधानीच्या शहरावर हल्ला चढवायचा अशी एकंदर योजना होती. रस्ता नव्हताच. वाट दाखवायला भिलाडचे श्री. अंबेलालभाई होते. शेते तुडवीत व काळ्या मातीच्या चिखलात रुतून बसणारा एक एक पाय बाहेर काढीत मोठ्या निर्धाराने ही तुकडी मार्ग आक्रमीत होती. मिट्ट काळोख, बरोबरची विजेरी पेटविणे धोक्याचे. कारण सरहद्दीवरचे सशस्त्र भारतीय पोलीस आणि सरहद्दीपलीकडील पोर्तुगीज सैनिक यांच्यापैकी कुणालाही सुगावा लागला तर एकाकडून गैरसमजुतीने व दुसऱ्याकडून जाणूनबुजून गोळी खाण्याचा प्रसंग यायचा ही भीती. नरोलीच्या अलीकडील दारोठा नदीवर ही तुकडी पोचली. नदी दुथडी भरून तुफान वेगाने वाहत होती. या भागातील नद्यांत मोठमोठाले खडक असल्यामुळे पावसाळ्यात त्यांना भयंकर वेग असतो. पलीकडच्या काठावर जाण्यासाठी नदीवर 'तर' असते. अंबेलालभाईंनी तरवाल्याला साद घातली पण त्याचे काही उत्तर येईना. तरवाला पलीकडच्या काठावर होता. जवळजवळ अर्धा तास हा हाका मारण्याचा उद्योग अनेकांच्याकडून चालला होता. पाऊस मुसळधार कोसळत होता, 'तर'वाल्याचा पत्ता लागत नव्हता. सर्वजण अधीर झाले. सकाळी सेल्व्हासवर हल्ला चढविण्याच्या मार्गात या नदीच्या

रूपाने दैव आडवे येणार असे साऱ्यांना वाटायला लागले. हे सर्व शांतपणे पाहत असलेल्या एका तरुणाने अंगावरचे कपडे काढले. लंगोट कसलेला हा तरुण, पोहून पलीकडच्या काठावरून 'तर'वाल्याला तरीसह घेऊन यायला सिद्ध झाला. सगळ्यांच्या अंगाचा थरकाप झाला. त्या नदीत झेप घेणे म्हणजे साक्षात मृत्यूलाच मिठी मारण्यासारखे होते. पण त्या तरुणाच्या ते ध्यानीमनीही नव्हते. सकाळचा सेल्व्हासवरचा हल्ला आणि नगरहवेलीची मुक्तता या विचाराने तो बेभान झाला होता. नदीत उडी घेण्यासाठी त्याने पाऊल उचलले आणि एक चमत्कार झाला. गेला अर्धा तास अनेकांच्या कंठशोषाने जाग न आलेल्या त्या 'तर'वाल्याने हाक दिली. सर्वांचा जीव भांड्यांत पडला. अशा तऱ्हेचा धाडसी विक्रम करायला निघालेला हा तरुण अर्थातच, मोहन रानडे होता. आजही हा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा आहे.

दि. २ ऑगस्ट १९५४ ला सेल्व्हास मुक्त झाले. जवळजवळ दोनशे बंदुका आणि अमाप दारूगोळा हाती लागला. दोनशे पोर्तुगीज पोलिसांना कैद करण्यात आले. चार साडेचारशे वर्षांच्या पाशवी गुलामगिरीच्या शृंखलेमधील एक दुवा तोडून फेकून देण्यात आला. साडेचार शतकांपासून अजिंक्य समजल्या गेलेल्या हिंदुस्थानातील जुलमी पोर्तुगीज सत्तेचा एक बुरुज, अखंड भारतावर अविचल श्रद्धा असणाऱ्या राष्ट्रवादी तरुणांनी जमीनदोस्त करून टाकला.

मोहन रानडे पुन्हा गोव्यात गेले. आपल्या सहकाऱ्यांना गोळा करून नगरहवेली मुक्ततेच्या स्फूर्तिकथा त्यांनी सांगितल्या. गोव्यात असाच उठाव करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या. पोर्तुगीज सरकारला याचा सुगावा लागला. त्यांच्याविरुद्ध कारवाई सुरू झाली आणि एके दिवशी ते पुन्हा भूमिगत झाले. हातात पुस्तक घेऊन शिकविणारा शिक्षक त्याच हातात बंदूक घेऊन पोर्तुगीज साम्राज्यशाहीविरुद्ध उघडपणे उभा ठाकला. रानड्यांच्या बरोबर श्रीपाद साठे होतेच. त्याशिवाय शंभू पालेकर, रामदास चाफडकर असे त्यांचे शिष्य व बाळकृष्ण भोसले, मनोहर पेडणेकर आदी कार्यकर्तेही होते. त्यांनी उघड लढा सुरू केला.

## दहा सहस्र रुपये......

दिवसभर जंगलात किंवा गावात दडून राहायचे, रात्री बाहेर पडून ठरलेल्या ठिकाणी एकत्र यायचे. रात्रभर निरनिराळ्या वस्त्यांत हिंडून भितीपत्रके चिकटवायची, क्रांतिपत्रके घराघरांतून टाकावयाची, ठिकठिकाणच्या तरुणांच्या बैठकी घ्यायच्या आणि लढ्यासाठी वातावरण तयार करायचे असा ऑगस्ट १९५४ नंतरचा मोहन रानड्यांचा कार्यक्रम होता. त्यांच्या क्रांतिकारक संघटनेने चांगलेच मूळ धरले. त्यांनी अनेक सरकारी स्थानांवर हल्ले चढविले. पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांच्या मनात त्यांनी इतकी दहशत निर्माण केली की, रानड्यांना पकडण्यासाठी त्यांनी दहा सहस्र रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

एका अर्थात या क्रांतिवीराचा हा बहुमानच होता.

पोर्तुगीजांनी गोव्यात मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरू केली. रानड्यांचे काही सहकारीही पकडले गेले.

भारताचे अविभाज्य अंग असलेला आणि भारतीयांच्या रक्तामांसाचा गोमंतक स्वतंत्र करून, विमुक्त पण अपंग अवस्थेत असलेल्या भारतमातेला प्रसन्न करण्यासाठी बद्धपरिकर झालेले मोहन रानडे या वेळी ज्या तऱ्हेचे आयुष्य स्वेच्छेने कंठीत होते ते नुसते ऐकूनही अंगावर काटा उभा राहील.

लढ्याच्या काळात चार चार-सहा सहा दिवस जेवण दिसत नसे. पावाचे तुकडे खिशात ठेवावे, कंडेन्स मिल्कचा डबा दगडाने फोडून, त्यातले घट्ट दूध तळहातावर घेऊन त्याला पाव लावून खावा, कच्चे काजू, काजूची बोंडे खावी, जे मिळेल ते पोटात घालून भूक शमवावी, प्रसंगी संपूर्ण उपवास काढावे, पंचवीस पंचवीस मैलांचे फिरणे एकेका रात्रीत होत असे. शरीराला इतका थकवा येई की दिवसा डोळे उघडे ठेवणेही जड जायचे. काही वेळा असेही घडत असे की जंगलात वरून मुसळधार पाऊस कोसळतो आहे आणि त्या पावसात उघड्यावर मोहन रानडे शांतपणे झोपले आहेत. शरीराला त्या पावसाचे भानच नसे.

या दिवसांत रानडे कधीकधी गोव्याबाहेर गुप्तपणे कामासाठी येत. अशाच एकावेळी त्यांच्या आईची व त्यांची भेट झाली. आपल्या मुलाला पकडण्यासाठी लावलेल्या दहा सहस्र रुपयांच्या बक्षिसाची माहिती तिला मिळाली होती. मोहनने परत गोव्यात जाऊ नये म्हणून डोळ्यांत पाणी आणून तिने विनविले, पण देशासाठी फकिरी पत्करलेल्या त्या वीराने हळुवारपणे तिला सांगितले, "आई, माझे काही सहकारी गोव्याच्या तुरुंगात नरकवास भोगीत आहेत, काही तळहातावर शिर घेऊन स्वातंत्र्यासाठी झगडत आहेत. ती सर्व तुझीच मुले आहेत असे समज. त्या तुझ्या मुलांसाठीच मला परत गोव्यात जायला हवे, मला आशीर्वाद दे." त्या वीर मातेनेही मन घट्ट करून त्याला आशीर्वाद दिला.

## मानसिक यातना

मोहन रानड्यांची निर्लेप देशभक्ती दाखविणारा एक प्रसंग याच सुमारास घडला. मी स्वतः त्या प्रसंगाला साक्षी आहे. रानडे काही वस्तू खरेदी करण्यासाठी गोव्यातून पुण्याला आले. गोव्यातील एका राजकीय कार्यकर्त्याने ती वस्तू खरेदी करण्यासाठी पाचशे रुपये व खर्चासाठी वीसपंचवीस रुपये त्यांच्याजवळ दिले होते. वस्तू दोनतीन दिवसांत मिळेल अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्ष मिळायला दहा पंधरा दिवस लागले. रानडे या काळात काही दिवस श्री. राजाभाऊ वाकणकरांच्याकडे व काही दिवस माझ्याकडे राहत होते. शक्यतो ते खानावळीत जेवत. पहिल्या सात आठ दिवसानंतर पुढे ते रोज जेवत नसावेत असे ध्यानात येऊ लागले.

कारण कळेना. आम्ही त्यांच्यावर पाळत ठेवली तेव्हा ते मुळीच जेवत नाहीत, काही तरी किरकोळ खाऊन भूक भागवतात असे आढळून आले. आम्ही विचारले पण ते काही दाद लागू देईनात. माझे पोट बरे नाही, मला भूकच लागत नाही, काळजी करू नका, असे सांगू लागले. आमचे मुळीच समाधान होईना. राजाभाऊ वाकणकरांनी हट्टच धरला तेव्हा त्यांनी खरी परिस्थिती सांगितली. ते म्हणाले की, मला पाचशे रुपये वस्तूसाठी म्हणून दिले आहेत. वर खर्चासाठी दिलेले पैसे अपेक्षे-पेक्षा जास्त दिवस इथे राहायला लागल्यामुळे जवळ जवळ संपून गेले. परत जायला भाड्यापुरते पैसे आता शिल्लक आहेत. वस्तू मिळून परत गोव्याला जाईपर्यंत दिवस काढायचे तर जेवणात पैसे खर्च करून कसे चालेल? वस्तूचे पैसे वस्तूसाठीच आहेत त्याला मी कसा हात लावू? पण तुम्ही काळजी करू नका, असे राहायची मला सवय आहे मला काहीसुद्धा होणार नाही. त्या ध्येयवेड्या, निःस्वार्थ देशभक्त तरुणाचे हे उद्गार ऐकून आमची अंतःकरणे फाटून गेली. या माणसापुढे काय बोलावे तेच समजेना. न कळतच आमची मस्तके त्याच्यासमोर नम्र झाली. आज हा प्रसंग लिहिताना त्याच्या नुसत्या आठवणीने ही डोळ्यांना पाणी येते. यानंतर मात्र आम्ही त्यांना आग्रह करून नियमितपणे जेवायला घेऊन जाऊ लागलो.

गोव्यातील परिस्थिती त्यांच्याच तोंडून कळली होती. त्यांच्या प्रयत्नांची दिशाही समजली होती. याच वेळेस म्हणजे मोहन रानडे पुण्यात असताना, पुण्यातील एका मान्यवर सद्गृहस्थांनी, गोव्यात सशस्त्र क्रांती घडवून आणण्याच्या प्रयत्नासाठी पंचवीस सहस्र रुपये मिळवून देण्याचे आपणहून आश्वासन दिले. यासंबंधी माझ्याशीच त्यांच्या वाटाघाटी झाल्या होत्या. ही सुवार्ता रानड्यांना कळली. त्यांना अतिशय आनंद झाला. एवढी रक्कम हाताशी आल्यास गोव्यात प्रचंड धडाका उडविता येईल या कल्पनेने ते विलक्षण उत्साहित झाले. त्यांनी आपला मुक्काम वाढविला. त्यांच्या आणि राजाभाऊ वाकणकरांच्या विचाराने निरनिराळ्या योजना ठरू लागल्या. माझाही भाग त्यात होताच. त्या वेळी अण्णा देशपांडे या नावाचे पूर्वाश्रमीचे गोव्यातील एक राजकीय कार्यकर्ते माझ्याकडे राहत असत. रानडे सावईला असताना या अण्णा देशपांड्यांनी त्यांच्यावर बरेच प्रभावी संस्कार केले होते. रानडेही त्यांना मानीत. या वेळी ठरू घातलेल्या योजनेत त्यांचाही भाग होता. आमच्या योजना तयार झाल्या, पण पंचवीस सहस्र रुपये देऊ करणाऱ्या सद्गृहस्थांनी, मला महिना सव्वा महिना घोळवून शेवटी सपशेल तोंडघशी पाडले. त्यांनी शेवट-पर्यंत 'नाही' असे सांगितले नाही आणि कामही केले नाही. हा सर्व प्रकार म्हणजे मोहन रानड्यांचा आत्यंतिक मानसिक छळच होता. त्या सद्गृहस्थांना त्याची जाणीवही नसेल, त्यांना पैशांची व्यवस्था करणे शक्य झाले नसेल, पण तसे त्यांनी प्रथमच निदान/काही दिवस गेल्यावर जरी, मोकळेपणाने सांगितले असते तरी किती बरे झाले असते? कदाचित इतिहास बदलला असता. आमच्या ज्या काही

योजना ठरल्या होत्या त्या शक्यतो कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने खटपट चालूच ठेवायची, फार प्रचंड नसला तरी पोर्तुगीजांना प्रखरतेने जाणवेल असा धक्का द्यायचा असे नक्की ठरवून, इतकेच नव्हे तर "जे काही यापुढे करायचे ते आपण सर्वांनी मिळून करायचे, आपल्या सर्वांच्या संमतीवाचून मी काही करणार नाही," असे अण्णा देशपांडयांना एका कागदावर लिहून देऊन आणि लगेच परत येतो, असे सांगून रानडे गोव्यात गेले.

आम्ही त्यांची वाट पाहत होतो. ठरविलेल्या योजनांवर आपसांत चर्चा करीत होतो तोच एके दिवशी एक भयंकर वार्ता आली की, "मोहन रानडे गोव्यात गोळी लागून ठार झाले." वार्ता वाचली. पण आमच्या डोळयांवर आमचा विश्वास बसेना. आम्ही सुन्न झालो. कळेना की हे घडलेच कसे! उभ्या भारताला ही वार्ता वाचून थोडाफार धक्का अवश्य बसला असेल पण आमची स्थिती अगदी वेगळी होती. आम्ही त्या वीर पुरुषाला प्रत्यक्ष पाहिले होते. त्याच्या निःस्वार्थ, निरपेक्ष देशभक्तीने आम्ही भारावून गेलो होतो, त्या पुण्यात्म्याच्या सहवासाने कृतकृत्य झालो होतो.

शक्य त्या ठिकाणांहून आम्ही तपास काढायचा प्रयत्न केला. प्रथम काहीच नीट कळेना. एक दोन दिवस मध्ये गेले आणि मग हळूहळू सविस्तर प्रकार कळू लागला. रानडे मेले नाहीत. भयंकर जखमी होऊन पोर्तुगीजांच्या हाती सापडले. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे, अशी माहिती मिळाली. हाही आघात काही कमी नव्हता. कळेना की हे झालेच कसे! आम्हांपैकी कुणालाही पूर्वसूचना न देता हा हल्ला त्यांनी केलाच कसा? बऱ्याच काळाने वस्तुस्थिती कळली.

मोहन रानडे पुण्या-मुंबईहून गोव्याला जायला निघाले. सरहद्दीवर त्यांना श्रीपाद साठे भेटले. पुण्यात ठरलेली योजना त्यांनी साठयांना सांगितली, त्यांनाही ती पसंत पडली. आता यापुढे किरकोळ हालचाली न करता मोठा प्रयत्न करावा असेच मत त्यांनीही दिले. गोव्यातील आपल्या सहकाऱ्यांना याची कल्पना देण्यासाठी रानडे गोव्यात गेले. साठे बाहेरच राहिले.

या दिवसांत रानडयांची मनःस्थिती चमत्कारिक असावी. माणसे निष्कारण आशा लावतात, फुकट सहानुभूती दाखवितात, मदतीची भरघोस आश्वासने देतात आणि प्रत्यक्षात मात्र काही करीत नाहीत. आमच्या प्रामाणिकपणाचा अंत पाहतात. आपलीच माणसे अशी का वागतात? आम्ही तर प्राणांची बाजी लावून या खेळात उतरलो आहोत. पण घरबसल्या आमची अशी क्रूर चेष्टा हे का करतात? अशा तऱ्हेचे विचार जाताना ते आमच्या जवळ बोलले होते. श्रीपाद साठयांच्या जवळही ही व्यथा त्यांनी व्यक्त केली होती. रानडे जरी एवढयाने डगमगणारे नव्हते तरी खिन्न झाले होते. गोव्यात गेल्यावर त्यांना समजले की 'बेती'च्या पोलीस स्टेशनात

बऱ्याच बंदुका व दारूगोळा आहे. अचानक हल्ला केल्यास तो हाती लागण्याची शक्यता आहे. त्यांनी साठ्यांना निरोप पाठविला की एवढा एकच 'कार्यक्रम' करून मी बाहेर येतो.

दि. २७ ऑक्टोबर १९५५ ला दिवसाढवळ्या मोहन रानड्यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यसैनिकांनी, पणजी या गोव्याच्या राजधानीजवळील मांडवी नदीच्या अलीकडील काठावरील 'बेती' या गावच्या पोलीस चौकीवर सशस्त्र हल्ला चढविला. दोन्ही बाजूंनी बंदुकीच्या फेरी झडल्या. पोलीस स्टेशनचा अधिकारी ठार झाला. पण याचवेळी एक दारुण आघात झाला. या लढाईत मोहन रानडे जायबंदी झाले. त्यांच्या शरिरात मशिनगनच्या अनेक गोळ्या घुसल्या. त्यांच्या आतड्याची अक्षरश: चाळण झाली. रानड्यांचे सहकारी त्यांना उचलून सुरक्षित ठिकाणी नेऊ लागले तेव्हा त्यांनी कडाडून विरोध केला. ते म्हणाले की प्रथम चौकीवरच्या बंदुका आणि दारूगोळा हस्तगत करा. शत्रूला पाच दहा मिनिटांत कुमक येईल माझी चिंता करू नका, मला नेण्याच्या प्रयत्नात हस्तगत होणारा शस्त्रसाठा गमावून बसाल. एखादा माणूस गेला तरी स्वातंत्र्ययुद्ध चालूच राहिले पाहिजे. सहकाऱ्यांचा नाइलाज झाला. मोहन रानड्यांना जड अंत:करणाने तेथेच सोडून, शस्त्रसाठा ताब्यात घेऊन ते आपल्या तळाकडे परतले.

भयंकर जखमी झालेला हा सिंह, क्रूर पोर्तुगीज लांडग्यांच्या तावडीत सापडला. सर्वांत प्रबळ शत्रू आपल्या हाती लागल्याचा आसुरी आनंद त्यांना झाला.

मोहन रानड्यांना पकडल्यानंतर बिलंदर पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी एक धूर्त डाव आखला. त्यांनी त्यांची उत्तम वैद्यकीय व्यवस्था केली. निष्णात शस्त्र वैद्यांकडून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करविल्या. त्यांना संपूर्ण बरे केले. कारण पोर्तुगिजांना मोहन रानडे जिवंत हवे होते. त्यांच्यावर त्यांना खटला भरायचा होता आणि जगाला दाखवायचे होते की "गोव्यातील आमची प्रजा राजनिष्ठ, शांततावादी आहे, तशीच ती सुखातही आहे. येथील पोर्तुगीजविरोधी चळवळ गोव्याशेजारच्या 'भारत' या परक्या देशातले चळवळे लोक गोव्यात शिरून करतात. आमच्या राजनिष्ठ जनतेचा त्याच्याशी काहीच संबंध नाही. त्यांना स्वातंत्र्य वगैरे काही नको असून, अनेक पिढ्यांपासून, दयाळू पोर्तुगीज अमलातच ते आनंदात आहेत."

मोहन रानड्यांना गोव्याच्या पोर्तुगीज सैनिकी न्यायालयासमोर उभे करण्यात येऊन खटल्याचा देखावा करण्यात आला.

खटल्याचे वेळी त्यांना साखळदंडाने बांधून पंचवीस पंचवीस सैनिकांच्या पहाऱ्यात नेत असत. खटल्याचा निकाल काय लागणार याची मोहन रानड्यांना पूर्ण कल्पना होती. सर्व परिणामांना तोंड देण्याची त्यांची तयारी होती. खटल्याच्या वेळची त्यांची धीरोदात्त वृत्ती पाहून ते सैनिकी न्यायाधीशही चकित झाले. हा एवढासा कोवळा

तरुण ज्या धैर्याने बेडरपणे त्यांच्यासमोर उभा असे ते पाहून शत्रू असूनही त्यांची मान आदराने लवत असे.

### बनावट गुन्हे

त्यांच्या खटल्याचे वेळी गोव्यातील अनेकांना राजकीय बंदी बनवून छळले जात असे. अशा कितीतरी राजबंद्यांवरचे आरोप त्यांनी स्वतःवर घेऊन त्यांची सुटका करविली. रानड्यांची ही परोपकारी वृत्ती पाहून त्याचा फायदा घेऊन स्वतःची सुटका करविण्याचा प्रयत्न एका स्वार्थी गृहस्थाने केला. एका देवळाचा तो पुजारी होता. त्याला बंदी बनवून न्यायासनासमोर उभे केल्यानंतर रानड्यांच्या समोर तो न्यायाधीशांना म्हणाला, " मी काहीच राजकीय गुन्हा केलेला नाही. उलट मी राजनिष्ठ प्रजाजन आहे. या रानड्यांनीच एके दिवशी माझ्यावर पिस्तुल रोखून, स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रत्येकाने निदान एक रुपया दिलाच पाहिजे असे धमकावले. पिस्तुल बघून घाबरून मी रुपया काढून दिला. माझ्याप्रमाणेच दुसऱ्या एकाकडूनही असाच रुपया त्यांनी घेतला. "

ही शुद्ध बनावट हकीकत ऐकताच रानडे खवळून उठले. चारपाच सैनिकांनी त्यांना लगेच घट्ट धरून ठेवले म्हणून बरे; नाहीतर त्यांनी त्या गृहस्थाचा गळाच पकडला असता. जळजळीत शब्दांत रानड्यांनी त्या गृहस्थाला सुनावले. "स्वातंत्र्यलढ्यासाठी एक रुपयाची मागणी आणि तीही पिस्तुल दाखवून केल्याचा क्षुद्र, नीच आरोप माझ्यावर करताना तुमच्यासारखा धर्मनिष्ठ म्हणविणाऱ्या आणि देवाची पूजा करणाऱ्या माणसाला लाज वाटायला हवी होती. त्यापेक्षा तुम्ही पिस्तुलाने या न्यायाधीशाचा खून करून तसा आरोप माझ्यावर लादला असता तर तो स्वीकारून मी आनंदाने फाशी गेलो असतो. "

रानड्यांचे हे निर्भय उद्‌गार ऐकून न्यायाधीश थक्क झाले. त्यांनी रानड्यांच्या वीर वृत्तीचे कौतुक केले. त्यांच्या निर्भयतेचा, देशभक्तीचा कळस दर्शविणारी आणखी एक घटना या खटल्याचे वेळी घडली. एकदा न्यायाधीशांनी त्यांना विचारले की तुम्हांला सोडून दिल्यास पुढे तुम्ही काय कराल ? रानड्यांनी क्षणाचाही विलंब न लावता उत्तर दिले. " तुमच्यासारख्या ज्या मूठभर पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या आधारावर जुलमी पोर्तुगीज सत्ता या माझ्या देशात दिमाखाने नांदते आहे त्या तुम्हा अधिकाऱ्यांना हातात पिस्तुल घेऊन उडवून देण्याचा प्रथम प्रयत्न करीन. " त्यांच्या देशभक्तीचा हा तेजस्वी आविष्कार पाहून न्यायाधीश स्तंभित झाले. त्यांनी त्यांची पाठ थोपटून उद्‌गार काढले, " तुमच्यासारखे दहाच मोहन रानडे या गोव्यात असले तर आम्ही क्षणभरही येथे राहू शकणार नाही. " निकालपत्रामध्ये त्यांनी मोहन रानड्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे.

खटला संपला. दि. २९ डिसेंबर १९५६ ला सव्वीस वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्याशिवाय सव्वीस वर्षांनंतरही त्या वेळची सुरक्षिततेची

परिस्थिती पाहून वाटल्यास ही शिक्षा सहा महिन्यांपासून तीन वर्षांपर्यन्त वाढविण्यात येईल; असेही उद्दाम पोर्तुगीज सरकारने घोषित केले.

त्यांना शिक्षा ठोठावल्यानंतरही, त्यांच्या बाबतीत माणुसकीला काळिमा आणणारे वर्तन पोर्तुगीज सरकारने केले. सहा महिने त्यांच्या पायात बेड्या घालण्यात आल्या. पाच वर्षे एकांतवासात ठेवण्यात आले. अंगावर फारसे कपडे घालू न देता जवळ जवळ अर्धनग्न अवस्थेत राहायला भाग पाडण्यात आले. कित्येक महिने त्यांना आंघोळही करू दिली जात नसे.

अशाही अवस्थेत त्या वीर पुरुषाचा धीर सुटला नाही. पहाऱ्यावर असणाऱ्या निग्रो सैनिकांना इंग्रजी व पोर्तुगीज भाषा शिकवून त्यांच्यांत गुलामगिरीची चीड निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या हे ध्यानात आले. त्यांनी निर्णय घेतला आणि एके दिवशी रानडयांना गोव्याहून गुपचुप हलवून सरळ पोर्तुगालच्या लिस्बन या राजधानीतील तुरुंगात नेऊन ठेवले. अगोदर त्यांना आफ्रिकेच्या तुरुंगात पाठविण्याचा त्यांचा विचार होता पण तेथे नेल्यास तेथील निग्रो पहारेकऱ्यांना ते फितवतील, तसेच तेथील बंडखोर निग्रो संघटनेशी कशाही प्रयत्नाने संपर्क साधून तेथे उठाव करण्याचा प्रयत्न करतील अशी साधार शंका पोर्तुगीज सरकारला आली म्हणून तो विचार सोडून त्यांना लिस्बनला नेले.

ज्या भारताच्या स्वातंत्र्यासाठी मोहन रानडयांनी आपल्या आयुष्याची अक्षरशः होळी केली त्यांचा भारताशी संबंध १९६० साली तोडण्यात आला. हिंदुस्थानभर क्षणिक संतापाची लाट उसळली. भारत सरकारनेही असहाय्यतेने हात वर केले.

### तुरुंगातील यमयातना

गेली साडेसहा वर्षे मोहन रानडे पोर्तुगालमधील त्यातल्या त्यात वाईट तुरुंगात आहेत. अधूनमधून त्यांच्याविषयीच्या वार्ता कानांवर येतात, त्यांच्या आईला त्यांची पत्रे येतात, कधीमधी त्यांच्या एखाद्या मित्रालाही त्यांचे पत्र येते, इतरही काही मार्गाने त्यांच्याविषयीची माहिती कळते. इतक्या वर्षांनंतर त्यांची खात्री झाली आहे, की भारत सरकार आपल्याला विसरले. माझे देशबांधवही मला विसरले."

त्यांच्या संबंधीच्या सर्व माहितीचे एकत्रित भीषण चित्र पुढीलप्रमाणे आहे.–

पोर्तुगालमध्ये नेल्यानंतर पहिले सहा महिने त्यांना एका घाणेरडया, ओलसर तळघरवजा एकांत कोठडीत टाकण्यात आले. इतक्या हलक्या प्रतीचे अन्न देण्यात येई की शेवटी त्यांना अन्नत्याग करावा लागला. त्यानंतर त्यात किंचित् सुधारणा झाली. काही दिवसांनंतर त्यांना बेकायदेशीर गुन्हे करणाऱ्या, निर्ढावलेल्या कैद्यांच्या कोठडीत ठेवण्यात आले. या वेळपर्यंत या विभागात कोणाही राजबंद्याला ठेवण्यात आलेले नव्हते. रानडयांनी पुन्हा झगडा केला तेव्हा इतर काही राजबंद्यांना त्यांच्या विभागात टाकण्यात आले. आपले साम्राज्य नष्ट करण्यास कारणीभूत झालेला हा भारतीय बंडखोर आहे. या समजामुळे तुरुंगातले पोर्तुगीज अधिकारी त्यांचा

भयंकर द्वेष करतात. अन्य कैद्यांना मिळणाऱ्या कोणत्याही सवलती त्यांना देत नाहीत. रानडे अनेक वेळा आजारी पडले पण योग्य वैद्यकीय मदत त्यांना केव्हाच मिळाली नाही. वैद्यकीय शास्त्राचे समग्र शिक्षण न घेतलेल्या अर्धवट डॉक्टरांकडून औषधयोजना केली जाते. रोग्याला बरे करण्यापेक्षा मंदगतीने मरणाच्या दारात नेऊन टाकणे हाच त्यातील उद्देश असतो. त्यांना ठेवलेल्या कोठडीत साधारणपणे जितके कैदी राहू शकतात त्याच्या दुप्पट व क्वचित तिप्पट कैदी कोंबले जातात. अशा जामेत व गर्दीत खाणे, झोपणे व अन्य शरीरव्यवहार त्यांना वर्षानुवर्षे करावे लागत आहेत.

हलकट पोर्तुगीज सरकारने आणखी एक तिरस्करणीय नीचपणा मोहन रानड्यांच्या बाबतीत केला आहे. रानडे हे राजकीय बंदी नसून खुनी गुन्हेगार आहेत. त्यामुळे कसल्याही सवलती त्यांना मिळणार नाहीत असे उत्तर निर्लज्जपणे त्यांचेकडून वारंवार देण्यात येते. त्यामुळेच रानड्यांना त्यांच्याकडून वागणूकही तशीच मिळते. नुसत्या कल्पनेनेही अंगावर शहारे येण्यासारख्या भयानक परिस्थितीत पकडले गेल्यापासून जवळजवळ अकरा वर्षे त्यांनी तिथे काढली आहेत. झालेल्या शिक्षेप्रमाणे अजून साडेसोळा वर्षे त्यांना काढायची आहेत. अन्य कोठड्यांतील कैद्यांशी संपर्क ठेवायला त्यांना बंदी आहे. दुरून कुणाला अभिवादन करण्याच्या अपराधासाठीही कडक शिक्षा होते. वृत्तपत्रे मिळत नाहीत. सरकारी शासनाची प्रशंसा करणारे एकच सायंदैनिक कधी कधी त्यांना वाचायला मिळते. मोहन रानड्यांच्यावर आणि त्यांच्या कोठडीतील अन्य कैद्यांवर कारागृहप्रमुखाने स्वतः हात टाकून त्यांना मारहाण केल्याचीही वार्ता नुकतीच समजली आहे.

गोवामुक्तीनंतर या भयंकर यमयातनांतून मोहन रानड्यांची लगेच सुटका होईल अशी सार्थ अपेक्षा होती. फेब्रुवारी १९६२ मध्ये संयुक्त अरब प्रजासत्ताकाच्या लिस्बन येथील प्रतिनिधीने त्यांची भेट घेऊन " पोर्तुगीज व भारत सरकार यांच्यामध्ये युद्धकैद्यांच्या अदलाबदलीची अट ठरली असल्यामुळे तुमची लौकरच सुटका होईल ", असे सांगितले. ही भेट बहुधा भारत सरकारच्या सूचनेवरून झाली असावी. परंतु त्यानंतर तो राजप्रतिनिधी पुन्हा कधी तेथे गेला नाही. भारतसरकारने सर्वच्या सर्व पोर्तुगीज युद्धकैदी मुक्त करून सुरक्षितपणे त्यांच्या मायदेशी पाठवून दिले. मोहन रानडे मात्र गजांच्या आड आहेत तसेच आहेत. का ? पोर्तुगीज सरकार त्यांना खुनी गुन्हेगार म्हणते म्हणून ? भारत सरकार तर तसे म्हणत नाही ना ? मग एका देशभक्ताच्या जिवाशी क्रूरपणे खेळण्याचा, अन्यायी, असमर्थनीय, सर्व देशाला खाली मान घालायला लावणारा एकतर्फी निर्णय भारत सरकारने का घेतला ? आमची नीती तरी काय आहे ?

आज ३५-३६ वर्षे वय असलेला हा तरुण आपल्या वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षापासून अविरत देशसेवा करतो आहे. स्वतःसाठी नव्हे तर इतरांसाठी, साऱ्या

समाजासाठी, राष्ट्रासाठी झिजतो आहे. जळतो आहे. त्याला कधी आपल्या आईची आठवण झाली नसेल का ? तिच्या मांडीवर सुखाने झोपावेसे कधी वाटले नसेल का ? केव्हातरी चांगले कपडे घालून ऐटीत फिरण्याची, कुठेतरी गमतीची सहल काढण्याची, एखादा सिनेमा पाहण्याची, गोडधोड खाण्याची इच्छा झाली नसेल का ? तरुण वयात निर्माण होणाऱ्या अनेक नैसर्गिक भावनांची ओढ त्याच्या मनात कधीच निर्माण झाली नसेल का ? मग या सर्व इच्छा, भावना त्याने कशासाठी झुगारून दिल्या ? कुणासाठी ? का ?

या देवमाणसाची कुणीच किंमत केली नाही. समाजाने नाही, शासनानेही नाही. पण शेवटी शासनकर्ते म्हणजे तरी कोण ? तीही आपलीच, आपल्या रक्ताचीच माणसे आहेत. ते आपले म्हणजेच आपल्या सर्व गुणदोषांचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्यात स्वाभिमान नसेल तर तोही आपलाच सामुदायिक दोष आहे.

अन्यायाची चीड, त्याचा बदला घेण्याची तीव्र इच्छा आपल्यात नसेल तर त्यांच्यात तरी कुठून येणार. समाज म्हणून, राष्ट्र म्हणून या सगळ्याला शेवटी आपणच कारणीभूत आहोत.

संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या आयुष्याचा होम करणाऱ्या आणि त्यासाठी पोर्तुगीजांच्या तुरुंगात २६ वर्षांच्या सश्रम कारावासाची भयानक शिक्षा भोगत असणाऱ्या ज्वलंत देशभक्ताची जशी ही तेजस्वी गाथा आहे तशीच तो देशभक्त या नरकयातना आपल्यासाठी, आपल्या देशासाठी भोगत आहे हे माहीत असूनही त्यांतून त्याला मुक्त करविण्याचा भरीव प्रयत्न न करणाऱ्या, तथाकथित आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या कैफात लोळत पडलेल्या स्वाभिमानशून्य व कृतघ्न अशा शासनाची आणि या राष्ट्रीय पातकाची यत्किंचितही चीड न येणाऱ्या मुर्दाड समाजाची ही लाजिरवाणी कहाणी आहे.

यापुढे तरी हे सगळे असेच चालू राहता कामा नये.

हा अन्याय दूर होईपर्यंत वीर मोहन रानडे आणि त्यांच्याबरोबर लिस्बनच्या तुरुंगात सडत पडलेले श्री. जेलो मस्कारन्हेस सुखरूपपणे भारतात परत येईपर्यंत आपणांला सुखाने श्वास घेण्याचा अधिकार नाही, तोपर्यंत आपले स्वातंत्र्य अपुरेच आहे. मोहन आणि मस्कारन्हेस यांची सुटका झालीच पाहिजे. त्या पुण्यात्म्यांनी संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्यासाठी म्हणजेच आपणा सर्वांच्या सुखासाठी स्वतःच्या आयुष्याचा स्वेच्छेने होम केला आहे. त्यांनी त्यांचे कर्तव्य केव्हाच केले, आतातरी आपण आपले कर्तव्य करू या. त्यांची सुटका योग्यवेळी न करविल्याच्या पापाचा कलंक आपल्या माथ्यावर आहे. त्या पापाचे क्षालन करण्याचे दायित्वही आपलेच आहे. पन्नास कोटी भारतीयांची प्रबल इच्छाशक्ती मनात आणील तर जगातील कोणत्याही तुरुंगातून आपल्या देशभक्त बांधवांची सुटका करवू शकेल. [समाप्त]

●



# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

पुस्तकाच्या छपाईस १५ ऑगस्टपासून प्रारंभ

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

# विचारधारे — समीर

## □ आधुनिक युगात इतिहासाचे जतन

दक्षिण आशियातील बहुतेक सर्व राष्ट्रे सध्या प्रगतीच्या वातचक्रात सापडलेली आहेत. त्यामुळे सामाजिक क्रांतीच्या या वावटळीत या प्रत्येक देशातल्या संस्कृतीची साक्ष पटविणाऱ्या महान् स्मारकांकडे आणि अवशेषांकडे दुर्लक्ष होण्याची फारच भीती आहे, असे मत गेल्या आठवड्यात युनेस्कोच्या स्मारक व संग्रहालय विभागातील जपानी तज्ज्ञ श्री. डैफुकू यांनी दिल्लीच्या भेटीत प्रकट केले. काळाचे आघात आणि विध्वंसक मानव यांच्यामुळे आधीच स्मारकांचे नुकसान झालेले असते. त्यात या दुर्लक्षाची भर पडेल. असे होऊ नये, व आधुनिकतेच्या आजच्या युगातही इतिहासाचे जतन व्हावे, म्हणून दक्षिण अशियातील ऐतिहासिक अवशेषांचे जतन करणारी एक संस्था स्थापन करावी, असा युनेस्कोचा विचार आहे.

हिंदुस्थानात अशी स्मारके जतन करण्याचे किंवा त्यांची डागडुजी करण्याचे तंत्र बऱ्याच वरच्या दर्जाचे आहे. तरीदेखील अत्याधुनिक तंत्राचे अज्ञान व आवश्यक रसायनांचा अभाव या दोन अडचणी येथे जाणवतात. त्यासाठी पश्चिमात्य देशांत जाऊन प्रशिक्षण घेणे जरुरीचे आहे. पण तसे करणे फारच खर्चाचे होईल, म्हणून असे शिक्षण देणारी एक प्रादेशिक संस्था आशियात काढायचा युनेस्कोचा विचार आहे.

## □ शिक्षण कसे असावे ?

औद्योगिक तंत्रज्ञान सोडले तर ज्या एका क्षेत्रात भारत निरनिराळ्या देशांतल्या तज्ज्ञांचे मत घेत आहे ते क्षेत्र म्हणजे शिक्षण. भारतात नेहमी एखादा परदेशी शिक्षण-तज्ज्ञ असतोच पण एखाद्या वेळेस अधिकही असतात. उदाहरणार्थ, थोड्या दिवसांपूर्वी एक रशियन तज्ज्ञ व एक अमेरिकन तज्ज्ञ एकाच सुमारास भारत भेटीत आपली मते सांगून गेले. प्रा. शुमोव्ह्स्की हे रशियन तज्ज्ञ तर नुकताच प्रसिद्ध झालेला एज्युकेशन कमिशनचा अहवाल तयार करण्याच्या कामी मदत करीत होते. त्यांना विचारण्यात आले, "या अहवालामुळे भारतात साक्षरता प्रसार होण्यास किती मदत होईल ?" त्यांचे उत्तर: "अहवालातल्या सूचनांपैकी ५०-६० टक्के सूचना अमलात आल्या तरी शिक्षणाच्या क्षेत्रात येथे क्रांती होईल. रशियाला हा प्रश्न सोडविता आला तर हिंदुस्थानाला का येऊ नये ?"

अमेरिकन तज्ज्ञ श्री. फिलिप बायर्स यांनी अमेरिकन व ब्रिटिश या दोन्ही शिक्षण पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. "पण या दोन पद्धतींची तुलना करणे म्हणजे सफरचंदाची व संत्र्याची तुलना करण्यासारखे आहे. कारण दोन्हींचे उद्देश निरनिराळे आहेत व गुणही निरनिराळे आहेत." अमेरिकन शिक्षण-पद्धती माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला सुशिक्षित करण्याचा प्रयत्न करते. शिक्षण हे केवळ बौद्धिक नसते तर शारीरिक व मानसिकही असते. म्हणून ते सर्वांगीण असावे लागते. उदाहरणार्थ, ओहायो विश्वविद्यालयात ४००० निरनिराळे शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. एखाद्या विद्यार्थ्याने वर्षभर अभ्यास केला तरी सगळे कोर्स पुरे करायला त्याला अडीचशे वर्षे लागतील,–आणि तेवढ्या वेळात आणखी नवीन कोर्स सुरू होतील.

## □ ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रीय धोरण

ऑस्ट्रेलिया या खंडप्राय देशाचे औद्योगिक महत्त्व झपाट्याने वाढत आहे व जगाच्या राजकारणातही तो पुढे येत आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रीय धोरण कोणत्या तत्त्वांना अनुसरून आखले जाते हे पाहणे भारताला बोधप्रद आहे. थोड्या दिवसांपूर्वी ऑस्ट्रेलियाचे भारतातील हाय कमिशनर सर आर्थर टँज यांनी 'ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रीय धोरण' या विषयावर 'इंडियन सोसायटी फॉर इंटरनॅशनल लॉ' या संस्थेच्या विद्यमाने दिल्लीत भाषण केले तेव्हा त्यांनी या धोरणाचे पुढील आधारस्तंभ असल्याचे सांगितले : वसाहतवादाचा शांतिपूर्ण मार्गाने अंत करणे; स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला मान देणे; गरिबांचे जीवनमान सुधारणे; अणुशस्त्रांचा प्रसार न होऊ देणे, आणि जगात कोठेही राजकीय दडपशाहीचा विरोध करणे.

वैचारिक साम्राज्य किंवा भौगोलिक विस्तार यांच्यासाठी हल्ली लष्करी सामर्थ्याचा वापर करण्यात येत आहे. विशेषतः, छोट्या छोट्या अशियाई देशांना हल्ली या संकटाचा सामना करावा लागत आहे. पूर्व आणि दक्षिण आशियात 'शांतिपूर्ण सहजीवन' शक्य व्हायचे असेल तर धमक्यांपासून व उघड किंवा छुप्या हल्ल्यांपासून छोट्या देशांचे रक्षण करण्याची इतरांचीच तयारी पाहिजे–व म्हणूनच ऑस्ट्रेलियाने मलेशिया व दक्षिण व्हिएटनाममध्ये आपले सैनिक पाठवले.

आशियातील साम्यवादी देशांच्या व चळवळींच्या हेतूबद्दल ऑस्ट्रेलियाही अशियाई देशांइतकीच जागरूक आहे. या सर्व चळवळी जो एक मोठा साम्यवादी देश (–म्हणजेच चीन) आशियावर आपले वर्चस्व स्थापू पाहत आहे, त्याचे हस्तक म्हणून आज ना उद्या काय करतील अशी ऑस्ट्रेलियाला भीती वाटते. या देशाने हल्ली जे कळविले आहे, त्यावरून दिसते की आशियात सहजीवनाच्या सभ्यतेला त्याने घाव्यावर बसविले आहे. ●

# मुक्ताफळे... 

## □ डॉ. वसंत अवसरे

" सिगारेट न ओढणारा, दारू न पिणारा व एकपत्नीव्रत पाळणारा गेंडा अगदी आपल्यासारखा वागत नाही म्हणून तर त्याला श्रेष्ठ समजून त्याचे पुतळे उभारायचे ! पण एखाद्याचा पुतळा पाहणे आणि त्याला प्रत्यक्ष पाहणे यांत फरक असतो. "

(–लाल नदी, निळे डोंगर, पृष्ठ ५३)

" आज पुष्कळसे बंगाली हिंदू पुन्हा पश्चिम बंगालमध्ये निर्वासित म्हणून गेले व त्या वेळेपासून या क्षणापर्यंत धीट बनलेल्या आसामी मुसलमानांनी पूर्व बंगालमधून लाखो मुसलमानांना बेकायदेशीरपणे आसामात आणून मुसलमानी वस्ती वाढवायला पद्धतशीरपणे सुरुवात केली आहे ! आज भारताच्या उत्तर सीमेवर लढाई चालू झाली आहे. त्याच वेळी पूर्व बंगालमधून शेकडो मुसलमान आसामच्या प्रदेशात घुसत आहेत. हिंदुद्वेषावर उभारलेल्या पाकिस्तानातून आलेले हे लोक 'आमार बंधु' म्हणून जवाहरलालजींच्या गळचाला मिठी मारणार नाहीत. ते पंचस्तंभी आहेत व पंचमस्तंभी राहणार. भारतासकट जवाहरलालजींना आणि जवाहरलालजींसकट भारताला रसातळाला नेण्यासाठी शक्य ती कारवाई करणार. "

(–लाल नदी, निळे डोंगर, पृष्ठ ६३)

" भारतात घुसणाऱ्या परकी मुसलमानांना हाकलून देणे जरुरीचे आहे. हिमालयाची शिखरे हिंदुस्थानच्या रक्ताने रंगल्यामुळे आज अनेक समस्यांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहणे भाग आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती वाईट आहे म्हणून हे मुसलमान भारतात आसऱ्यासाठी येत आहेत. त्यांच्याकडे दयार्द्र दृष्टीने पाहिले पाहिजे, असा खुळचट दृष्टिकोन ठेवून जर भारताचे राज्यकर्ते वागू लागले तर म्हणावे लागेल की, 'व्रजन्ति ते मूढधियः । पराभवन् भवन्ति भाषाविषु येन मायिनः ।। शठांशी शठनीतीनेच जे कोणी बुद्धिहीन वागू शकत नाहीत, त्यांच्या ललाटी पराभवच लिहिला जातो. "

(–लाल नदी, निळे डोंगर, पृष्ठ ६४)

" डॉक्टरांच्या पायाला चक्र आहे. डोक्यात विचारांचे चक्र आहे. अंतःकरणात औदार्य आहे. नजरेत सौंदर्याचा शोध आहे. त्यांच्या हाती ताप–नळीसारखी कवीची लेखणी येते आणि चित्रकाराची तूलिकाही ! आमच्या चिमुकल्या वयात कविता गुणगुणत् प्रिस्क्रिप्शन लिहिणारा हा पहिला डॉक्टर आम्ही पहिला ! त्यांना

गाण्याचा कान आहे. ' अविदित गतयामा रात्रिरेवंव्यरंसीत् ' म्हणण्याचा अधिकार आहे. ' इथें सखे नि सोबती कुणी इथे कुणी तिथे ! ' असे सार्थ अभिमानाने म्हणावे, अशी देशविदेशांत सख्या–सुहृदांची जोडणी आहे. व्यवसायाच्या शिखरावर असूनही हा माणूस माणसांतला आहे. ते अलिप्त आहेत, केवळ अलिप्ततेपासून ! संस्कृत भाषेत त्यांना उत्तम गती आहे. त्यांच्या लेखनात या व्यासंगाचे सहज पुरावे आहेत. " उत्साहाला ओहोटीचा स्पर्श नाही. वाढत्या वयाचे लक्षण औषधालाही दिसेत नाही."

**डॉ. वसंत अवसरेकृत**

–' लाल नदी, निळे डोंगर 'च्या पु. ल. देशपांडे लिखित प्रस्तावनेतून

असे हे डॉ. वसंत अवसरे. यांनी मुसलमानधर्म स्वीकारला व एका गुर्जर युवतीशी नुकतेच दुसरे लग्न केले. सदर गुर्जर युवती चांगली M. A. असून हा विवाह संपूर्ण विचारांती केला असला पाहिजे. विवाह आंतरभारती–शिवाय वरपक्ष धर्माने सोईस्कर मुसलमान– असा सर्व योग जुळून आला असल्याने, पुण्यात एका नवीन सत्काराची योजना बहुधा कार्यान्वित झालेली असणार अशी अपेक्षा होती. परंतु त्याऐवजी भूतपूर्व प्रजासमाजवादी पुढारी आचार्य अत्रे यांनी आपल्या ' मराठा ' पत्रातून या डॉक्टरांच्या विवाहाची हकीकत एखादी वाईट घटना घडावी अशा स्वरूपात प्रसिद्ध केली. आचार्य अत्रे यांची टीका व पद्धती मंजूर होण्यासारखी नाही. एक तर विवाह ही खाजगी बाब आहे व वधूवरांतील वयाचे अंतर ही काही टीकेची बाब होऊ शकत नाही. जरठ–कुमारी विवाहात कुमारिकेची संमती नसे, हीच फक्त दुःखदायक गोष्ट होती. हा प्रेमविवाह असल्याने याबाबत अशी टीका करणे चुकीचे आहे.

एक तर द्विभार्या प्रतिबंधक कायदा फक्त हिंदूंना लागू करून मुसलमान समाजाला मोकाट सोडणाऱ्या सरकारच्या तोंडात डॉ. अवसरे यांनी ही झणझणीत चपराक दिली आहे. लग्नाची बायको व इतर संबंध अनौरस स्वरूपात ठेवण्यापेक्षा डॉ. अवसरे यांनी विवाह पत्करला, या धीटपणाबद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. फक्त हिंदू असल्याने दुसऱ्या विवाहाला कायद्याने बंदी आहे, हे लक्षात येताच त्यांनी



तात्पुरता मुसलमान धर्म स्वीकारला व महाराष्ट्र सरकारची कायदेशीर फटफजिती केली. डॉ. अवसरे यांनी आता अधिक वेळ न दवडता ताबडतोब हिंदुधर्मात यावे. हिंदुधर्मात का यावे हे त्यांना कोणी सांगण्याची आवश्यकताच नाही. (पाहा–'लाल नदी निळे डोंगर'मधील वर उद्धृत केलेली अवतरणे) त्यांनी वयाची पंचाहत्तरी गाठली आणि ते हिंदुधर्मात पुन्हा आलेले असले की त्यांच्या मुंबईत त्यांचा एखाद्या आलिशान उपाहारगृहात सत्कार होईल व कदाचित् आचार्य अत्रेच त्या समारंभाचे अध्यक्ष असतील ! आचार्य लवकर तापतात आणि कालांतराने आईस्क्रीमसारखे थंड आणि गोड होतात असा पुष्कळांचा अनुभव आहे.

## □ शिवभक्तांसाठी...

कृष्णनगर, ता. २६–नदिया गावात एका तरुणीला पळवून नेण्याचा प्रयत्न पाकिस्तानी गुंडांनी केला, पण हिंदच्या गस्त घालणाऱ्या पथकाने तो हाणून पाडला. ता. २३–२४ जुलैच्या रात्री तीन पाकिस्तानी आले व एका अठरा वर्षांच्या तरुणीला पळवून नेऊ लागले. तिने आरडाओरडा केला. सरहद्दीवर गस्त घालीत असलेल्या पथकाने तो ऐकला. ते सैनिक ताबडतोब धावले व त्यांनी त्या तरुणीची सुटका केली. पाकिस्तानी तीन गुंडांपैकी एकास अटक केली. –'सकाळ' २७–७–६६

—अशी बातमी वाचायलाही हरकत नाही. परंतु पुढे दोन दिवसांनी—

"पकडलेल्या पाकिस्तानी गुंडाला हातपाय तोडून लाल किल्ल्यावर लोकांना पाहण्यासाठी ठेवला आहे," अशी बातमी वाचायला मिळायला हवी.

## □ पराजयप्रकाशांची नवी 'नारायणगिरी'

सुप्रसिद्ध सर्वोदयी श्री. पराजयप्रकाश नारायण हे काँग्रेस सरकारच्या निरनिराळ्या कार्यात 'नारायण'गिरी करीत असतात. गृहस्थ मोठे विनोदी आहेत. त्यांनी सध्या रेड्याचे दूध काढण्याची चळवळ महामंत्री इंदिरा गांधींच्या आशीर्वादाने अंगीकारली आहे. शेख अब्दुला यांनी भारताचे शत्रुराष्ट्र जे चीन, त्याचा पंतप्रधान चौ–एन्–लाय यांचेशी काश्मीरबाबत परदेशांत वाटाघाटी केल्या. सध्या ही स्वारी तुरुंगात आहे. त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी व त्यांची सुटका व्हावी यासाठी पराजयप्रकाश यांनी अब्दुल्लांची गाठ घेतली. भेटीला जाताना काय म्हणाले,

"If we want to settle our disputes peacefully in a non-violent way, we should not fight shy of surrendering a part of our sovereignty voluntarily"

[जर सर्व भांडणे आपल्याला शांततेने व अहिंसक मार्गाने सोडवावयाची असतील तर राष्ट्राच्या सार्वभौम अधिकाराच्या काही भागांवर आपण स्वतः होऊन पाणी सोडले पाहिजे.]

वारे पठ्ठे ! याला म्हणावे ज्ञान. काय हा दैदिप्यमान प्रकाश ! आमचे डोळे दिपले !

उद्या शेख अब्दुल्ला सुटला की, पराजयप्रकाश नारायण यांनी पुण्याला यावे. येथे हल्या नामक एका मुसलमान गणपतीच्या मूर्तीवर लघुशंका केली या क्षुद्र आरोपाखाली तुरुंगात पडला आहे. त्याच्या सुटकेचा प्रयत्नही पराजयप्रकाशांनी करावा. क्षुद्र गोष्टीकरता काय ही तुरुंगाची शिक्षा ! नारायणसुता, लवकर पुण्याला धाव घ्या.

## □ 'शेरे काश्मीर'ची रपेट



There was a young lady of Riga,
Who smiled as she rode on a tiger.
They returned from the ride,
With the lady inside.
And a smile on the face of the tiger

[वाघाच्या पाठीवर बसून रिगा गावातील एक तरुणी रपेटीला निघाली, तेव्हा ती स्मित करीत होती. रपेट संपवून ते परत आले, तेव्हा तरुणी वाघाच्या पोटात होती व स्मित वाघाच्या तोंडावर होते.]

— **ग्यानबा**



# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## निवडक निरूपणे

### १ : नाम व इतर साधने

नवविधा भक्तीचा दासबोधात सांगितलेला क्रम हा सृष्टिनियमाला धरून आहे. श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण इ. मनुष्यप्राणी जन्माला आला की, शिकण्यास सुरुवात करतो ते श्रवणापासून. श्रवण करील तेच वाचेने बोलता येते. मुके लोक बहिरे असलेच पाहिजेत; कारण श्रवण न झाल्याकारणाने त्यांना बोलता येत नाही. मनुष्यप्राणी ज्या देशात जन्माला येतो, त्या देशाची भाषा तो बोलतो. म्हणून श्रवणानंतर कीर्तन (बोलणे) व बोलणे झाल्यानंतर कृती म्हणजे नामस्मरण असा स्वाभाविक क्रम लागतो. नामस्मरण होऊ लागले की आपले काम झाले. पुढील सर्व भक्ती नामस्मरणात येतात, त्याच्याकरता निराळी खटपट करण्याचे कारण नाही. एका इसमाला दुसऱ्या इसमाला भेटण्यासाठी नऊ मैल अंतरावर असलेल्या ठिकाणी जायचे होते, म्हणून तो घरातून निघाला. इतक्यात ज्याला भेटायचे होते तोच मनुष्य तीन मैल चालून गेल्यावर त्याला भेटला तर आपले काम झाले म्हणून तो जसा पुढे जाण्याच्या खटपटीत पडणार नाही, त्याचप्रमाणे नामस्मरणाचे बाबतीत आपली स्थिती आहे.

नामस्मरणाची बुद्धी झाली की, आपले काम झाले. नामात प्रेम येणे जरूर आहे. त्याच्याकरता ते नाम अत्यंत आवडीने व त्याच्याशिवाय दुसरे काही साधायचे नाही अशा भावनेने घेतले पाहिजे. म्हणजे त्यात प्रेम येईल. नाम हे अत्यंत उपाधिरहित आहे, त्याला कोणत्याही उपकरणाची गरज नाही. रोगी-निरोगी, विद्वान-अडाणी, श्रीमंत-गरीब, लहान-थोर, स्त्री-पुरुष, यांपैकी कोणतीही गोष्ट असली तरी अडत नाही व नसली तरी अडत नाही, नामाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाला शक्ती, बल, पैसा वगैरे कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टींची मदत लागते, म्हणून असे हे अत्यंत उपाधिरहित नाम, त्यात प्रेम येण्यासाठी आपण उपाधिरहित होऊन घेतले पाहिजे. नामात प्रेम येणे ही फार उच्च कोटीची स्थिती आहे, ती अगदी सहजासहजी प्राप्त होण्यासारखी नाही, म्हणून त्यातील वर्म ओळखून योग्य

तऱ्हेने व चिकाटीने सतत नामस्मरणाचा अभ्यास ठेवणं जरूर आहे. "भगवताच्या नामाशिवाय मला काही कळत नाही," असे ज्याला कळले त्याला सर्व कळले.

## २ : नाम व मायेचे स्वरूप

पुष्कळ लोकांना परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे मनातून फार वाटते, पण काही ना काही कारणाने ते घडत नाही. असे का व्हावे ? तर माया आड येते, मग मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोचायचे ? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे, तिला सोडून तू ये असे म्हणणे, भगवंतालाच तू येऊ नकोस, असे म्हणण्यासारखे आहे, कारण एखाद्या इसमाला तू ये, पण तुझी सावली आणू नकोस म्हटले तर कसे शक्य आहे ? म्हणून माया ही राहणारच, आपण तिचे तावडीतून सुटून भगवंतापर्यंत कसे पोचायचे, हाच प्रश्न आहे व या प्रश्नाचे उत्तर एकच, भगवंताचे नाव घेणे, नामानेच मायेच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत जाता येते. जसे व्यक्तीशिवाय सावलीला अस्तित्व नाही, तसे मायेला स्वतंत्र अस्तित्व नाही. तिला स्वतंत्र शक्तीही नाही. कारण व्यक्तीच्या हालचालीप्रमाणे तिची हालचाल होते. व्यक्ती न दिसली तरी सावली जशी दिसते, त्याप्रमाणे मायेचे अस्तित्व जाणवते.

मायेची सत्ता भगवंतावर नाही. समजा, एखादा इसम पूर्व दिशेकडे चालला आहे, तर त्याची सावली त्याच्यामागून त्याच दिशेने जाईल. पण त्या सावलीच्या मनात जर दिशा बदलून पश्चिमेकडे जाण्याचे आले तर तिला ते शक्य नाही. तो मनुष्यच जर पश्चिमेकडे जाऊ लागला तर ते शक्य होईल. याचाच अर्थ, माया भगवंताच्या आधीन आहे, सर्व विश्व हे मायारूप आहे, म्हणजे ते परमेश्वराची छाया आहे. या विश्वाला आधार परमेश्वरच आहे. या मायेच्या तावडीतून सुटून परमेश्वराकडे कसे जायचे ? समजा, एखाद्या इसमाला एका मोठ्या व्यक्तीला भेटायचे आहे, पण त्याच्याकडे सरळ जाणे शक्य नाही. कारण, दारावर रखवालदार, कुत्री वगैरे आहेत. तेव्हा मालकाची भेट होण्याचे काम मस्ती करून होण्यासारखे नाही. पण समजा, मला अमक्या दिवशी येऊन भेटावे, अशा मजकुराचे त्या मालकाच्या सहीचे पत्र जर आपल्याजवळ असेल, तर ते रखवालदारास दाखवताच तो आपल्याला विनतक्रार आत सोडील व मालकाची भेट होईल, तो रखवालदार अशिक्षित असला व त्याला पत्रातील मजकूर समजत नसला तरी मालकाच्या सहीची मात्र त्याला ओळख असते व ती सही पाहून तो आपल्याला आत सोडतो, तसेच भगवंताचे नाव म्हणजे भगवंताच्या सहीचे पत्र जर आपण घेऊन गेलो, तर मायारूपी रखवालदार ती सही पाहून आपल्याला आत सोडील व भगवंताची भेट होईल. म्हणून माया तरून जाण्यास भगवंताचे नामस्मरण हाच रामबाण उपाय आहे. सबब, प्रत्येकाने नामाची कास धरावी.

●

## एक रात्र :
## कंकालि मंदिर

अविरत पाऊस झरत आहे,
तरि वाहून जात नाही
अंधाराचा स्वयंभू पहारा !
थेंबाच्या भाराने हलके
हलू लागतात वडाची
पाने, ओल्या, भेद स्वराने
जागते, आत्यंतिक दु:ख
जे तुझे अन् माझेहि
बाजूला उभे मौन भिजत
कंकालिचे मंदिर
स्वत:चे झिजलेले शिल्प
तलावाच्या हिरव्या पाण्यात
न्याहाळत
तुलाहि नकळत वाहणारे शब्दहीन,
संस्पर्शी, अनादि गीत
त्याच्या आरोह अवरोहात
मिटत जातो—
सघन वेदनेचा प्रदेश
अंधारणाऱ्या नगरीत उतरणाऱ्या
क्षितिजाप्रमाणे . . . . . .

—उद्धव खोब्रागडे.

## हिरवा बंध

ओढ खळाळल्या पाण्याची
अजूनही तितकीच तीव्र
आणि झिरपत्या चांदण्याचा
स्पर्श, पुष्पमृदु पाकळ्यांचा
अंतरीच्या ओळखीचा . . .
अजून येतो गंध फुलांना
धुंद होउनी हुंगीत बसते
पहिली वहिली सर सरसरते
काळी धरती जरा शिरशिरते
बुलंद गहिरा गंध पसरिते
अंतरीच्या ओळखीचा . . .
निसटत्या क्षणांना तुझ्या आठवाच्या
येते आगळीच आर्द्र गोडी
हट्टी मनातला आठवांचा कचरा
उडवी, गरगरता हा उत्तरवारा
नको विसरू पण हिरवा बंध
अंतरीच्या ओळखीचा

—सौ. लीला धनपलवार.

## सत्यावर फुटले दर्पण

हा संथ भावनाप्रधान पडदा मनाचा
सोनेरी त्यावर स्वप्न फुलोनी येई
समाधान बहरले बधीर झाली आशा
जड निरभ्र जीवन हलकं हलकं होई. . .
भावना बिसरली रंग, रूप ' नि काम '
हो उदासीन आवड, मावळली ओढ
थकलेली वळणे घेऊन, रमली वाट
अन् क्षितीजभर मिळे समाधान बेजोड. . .
नजरेत धावले भाग्य काव्य जिव्हेत
लाजऱ्या कळ्या अनंत स्मित ढाळित
कमळाच्या मधुगर्भात हरपले भान
सत्यावर फुटले दर्पण अश्रू गाळित. . .!. .

—वि. ए. राजगुरु.

## हाक

पोट पाठीशी लागले
पाठ पोटासाठी देतो
शिव्या आणि मानहानी
यांची लाखोली साहतो
कधी निर्लज्ज बनतो
होते अब्रूही उघडी

हासणाऱ्यांच्या डोळ्यांचे
फेडी पारणे बापडी !
किती साहावे साहता
व्यथा–व्यथा न राहते
हाक आभाळाला देतो
तेहि दुभंगून जाते !

*–बजरंग सरोदे.*

## आस्वाद

आधुनिक मानवाचा जीवनकलह किती भयानक आहे, याची चित्रणे सध्याच्या कवितांत स्पष्टास्पष्ट दिसतात. बजरंग सरोदे यांनी 'हाक' कवितेत आधुनिक वेदनेला स्पष्ट वाचा फोडली आहे. पूर्वकवींच्या आविष्कारात आणि प्रस्तुत-सारख्या कवितेत फरक आहे तो पद्धतीचा. 'जू बैसले मानेवरी...... ' इ. यशवंत कवींची कविता याच वळणाची आहे. सरोदे यांनी ढब नवीन घेतली आहे. आणि ते साहजिकही आहे. आकाशाला आवाहन करायला जावे तर तिथेही निराशाच पदरी पडते हे चित्र हृदयविदारक आहे. शेवटचे कडवे थोडे गूढ आहे. बाकी या कवितेत खूप सुबोधपणा आहे.

'एक रात्र-कंकालि मंदिर' या कवितेत शब्द जरी थोडे अपरिचित असले तरी फार थोडी दुर्बोधता आहे. एका प्रेमी युग्माने कुठे अंधाऱ्या रात्री एका पवित्र वास्तूच्या आश्रयाने घालविलेले काही क्षण उद्धव खोब्रागडे यांनी चित्रित केले आहेत. एखाद्या कसबी चित्रकाराला रंगरेखांनी रेखाटता येईल, इतके सुस्पष्ट आणि गोचर वर्णन कवीने केले आहे. तलावात आपल्या जीर्ण शिल्पाचे प्रतिबिंब पाहणारे मंदिर डोळ्यांपुढे उभे राहते. वेदनेचा प्रदेश कसा मिटत जातो, त्याची प्रतिमा रेखीव आहे. रवीन्द्रनाथांच्या सांप्रदायात हे गीत सहज शोभेल.

हिरवा रंग हा यौवनाचा, ताजेपणाचा द्योतक आहे. प्रेमी जीवातला हिरवाबंध म्हणजे सूक्ष्म पण वळकट परस्पराकर्षणाचा असे लीला धनपलवार यांना सुचवायचे आहे काय ? 'एक रात्री 'प्रमाणेच या ठिकाणी पावसाळी हवा आहे. पण मीलन नाही, विरह आहे. 'आर्द्र गोडी' हा शब्दप्रयोग कवितेचा काळ आधुनिक आहे, हे सहज स्पष्ट करतो. 'सत्यावर फुटले दर्पण' ही वि. ए. राजगुरू यांची कविता अशीच स्मरणालंकारावर आधारलेली. भूपति जाति सदोष लिहिली आहे. एकेक सलग ओळ अर्थगर्भ वाटते. त्यातले दुवे सांधले असते तर त्यातली झेप अधिक परिणामकारक झाली असती.

*–गोपीनाथ तळवलकर*

# पाच ऑगस्टची गोष्ट...

तिचं वागणं पहिल्या-
पासूनच कोड्याप्रमाणं.
एक कोडं उलगडतंय
असं वाटेपर्यंत दुसऱ्यात
गुरफटावं माणसानं....

उज्ज्वला आगासकर

५ ऑगस्ट–आज ऑफिसमधून सरळ घरी जायचे नाही.

जाऊन कसे चालेल ?

तिचा वाढदिवस आहे आज.

दिवस जर घन स्वरूपात हाती लागला असता तर–कसे केले असते मी त्याचे स्वागत ?

गेली कित्येक वर्षे या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही.

आजच कशाला डोके शिणवा ?

लक्षात ठेवायचे फक्त इतकेच, की आज सवयीने चर्चगेटकडे वळायचे नाही ५–३१ ची विरार फास्ट दादरला थांबत नाही—

बसच्या क्यूमध्ये जायला हवे.

छे—रांग सरकतच नाही.

असे झाले की ती तर किती चिडायची !

दिवसभरात किती वेळा काढली तिची आठवण !

काही हक्क आहे का, पण असा जिव्हाळा जपण्याचा ? जिवलग मैत्रीण म्हणे–पुऱ्या दोन वर्षांत भेटले नाही जाऊन. नाही म्हणायला, तिच्याच नावाने काढलेली इंटिरिअर डेकोरेशन फर्म जरा स्थिरस्थावर झाली तेव्हा फोन करून तिला बोलावलं होतं––

बस आली. माझा नंबर तिसरा आहे. जागादेखील मिळाली.

तिच्या विवाहाला किती वर्षं झाली ?

येत्या डिसेंबरात सात होतील.

गळ्यात हात टाकून रडली वेडी–लग्न ठरलं तेव्हा.



"ठरलं" कसं? तिनंच तर स्वतःहून मधुकरबरोबर डाव मांडला!

काही का असेना, मांडवात रड-वेला चेहरा शोभतच होता तिला.

ठक् ठक्. एक खोदादाद सर्कल. तिकीट घड्याळाच्या पट्ट्यात शिरते.

आतापर्यंत सुवर्णपदके किती मिळाली?

तीन तरी नक्कीच. मला नव्हेत, तिला.

पण प्रत्येक वेळी माझा हात पाठीवरून फिरल्याखेरीज समाधान नाही!

कॉलिजमधले तिचे बौद्धिक परा-क्रम, वक्तृत्वाच्या ढाली आणि गेम्स्मधले चषक–नुसते दिसायचे. वर्णने ऐकायची ती इतरांकडून!

तिला तर सवयच नव्हती स्वतःबद्दल बोलण्याची – आणि कॉलिज तिचे वेगळे, माझे वेगळे!

खरे तर, तिच्या दिग्विजयांचा अभिमान मला वाटण्याचे काहीच कारण नाही––

नाही? का म्हणून?

शाळेतली सहा वर्ष–कॉलिजमध्ये असताना सांभाळून ठेवलेला घरोबा, आणि आत्यंतिक आपुलकी–बहिणीसारखे वागवले ना तिला? मग वाटला अभि-मान तर चुकले कुठे?

केवढ्या जोरात येतो आहे पाऊस–खिडकी बंद करावी––

सहावीत ती शाळेत आली तेव्हा––

वर्गात वयाने सर्वांत लहान, आणि वर्णाने सर्वांपेक्षा उजळ. कौतुकापेक्षा उपेक्षा, आणि हेव्यापोटी आलेला उपहास यांचेच प्राबल्य होते तिच्या स्वागतात–––

वर्गातल्या कुणीही तिला शेजारी बसायला बोलावले नाही. बाई मात्र तिच्या-

बद्दल आपुलकी दाखवीत. तीही इतरांची फारशी पर्वा करीत नसे.

आणि म्हणून तर मुलींना जास्तच आश्चर्य वाटे. एकटी पडल्याने ती कुढली असती, रडली असती तर ते त्यांना हवे होते–तिने विनवण्या केल्या असत्या तर मोठे औदार्य दाखवून तिला खेळायला घेणे त्यांना मानवले असते––

पण त्यांतले काहीच झाले नाही.

जणू या गोष्टींकडे लक्ष द्यायला तिला वेळ नव्हता !

सहामाही परीक्षा झाली. निकाल लागला.

आणि तिचा पहिला नंबर ! हे कसे काय ?

"हो, माहीत आहे. आमच्यांत खेळायचं नाही आणि अभ्यास करीत बसायचं–एवढा शिष्टपणा केल्यावर येईल नाहीतर काय नंबर पैला––"

"ए, मी सांगताना बघू नकोस तिच्याकडे, पण वडील ना तिचे, सरकारी अधिकारी आहेत, म्हणून––"

पण तिची मान काही वर झाली नाही ! 'कशी जिरवली' अशा थाटात तिने कुणाकडेही पाहिले नाही! "मी पहिली आले, आता तरी तुमच्यांत घ्या मला–" छट्!

आणि याने मुलीच जिरल्या !

कधी गणिते सोडवून घेण्यासाठी, कधी कठीण प्रश्नांची उत्तरे विचारण्यासाठी तर कधी खेळायला बोलावण्यासाठी मुलीच जायला लागल्या तिच्याकडे.

मी मात्र गेले नाही. असला दांभिकपणा मला जमलाच नसता. तीदेखील मुलींशी जेवढ्यास तेवढेच बोलत असे. माणसांची पारख तिला तेव्हाच होती म्हणायची ! पण ती माणूसघाणी नव्हती नक्कीच–कारण दुसऱ्याच आठवड्यात ती आपणहून माझ्याशेजारी बसू लागली. "चालेल ना, मी बसले तर ?" हिचे दात किती शुभ्र आहेत !

इतर मुली जळफळल्या.

माझे कुठे काय चुकले होते ?

मुळीच नाही. आणि त्यानंतरसुद्धा, माझे काही चुकते आहे असे मला कधीच वाटले नाही. उलट, शक्य असेल तितक्या सर्व वेळा तिच्या पाठीशी राहण्यात, जबाबदारी पार पाडल्याचे समाधान आणि एक वेगळाच अभिमान होता––

आणि मग तो दिवस आला.

किती विचित्र स्वरूप होते त्याचे ! जसजसा जास्त विचार करावा तसतसे बोथट होत जाणारे. पण प्रत्यक्ष त्या वेळच्या अनुभूती किती टोकदार !

दुसरा तास संपून तिसरा चालू झाला होता. घारपुरेबाई व्याकरण शिकवीत होत्या. साऱ्यांचे लक्ष पुस्तकाकडे होते. नोटीसची वही घेऊन मिकू शिपाई वर्गात शिरला. बाईंनी नोटीस वाचायला सुरुवात केली, आणि या अनपेक्षित व्यत्ययाचा फायदा घेऊन् मुलींनी गडबड––

"शू:—" बाईंचे करडे डोळे एकदाच सगळयांच्या नज़रा छेदून गेले, आणि वर्गात शांतता.

"उद्या तुम्हांला सुट्टी आहे." नोटीसवर पेन्सिलीने सही करताकरता बाईंची घोषणा.

"कशाची बै ?" एका आगाऊ मुलीचा, उभी राहून प्रश्न.

"मातृदिनाची." वही भिकूकडे परत देतादेता बाईंचे उत्तर.

"म्हंजे ?" पुन्हा तीच मुलगी.

"अॅहेरे. अगदीच चमन आहेस. अग, पूजा करून आईने—"

खूप माहिती मिळू शकण्याची संधी बाईंच्या दरडावण्याने हुकली, आणि व्याकरण पुढे सुरू झाले.

तास संपल्यावर वर्गातून जाताना बाईंनी डोळे का पुसले ? तेवढ्यापुरतेच ते प्रश्नचिन्ह. दिवसभरात विरूनही गेले. शाळा सुटली. ती नि मी निघालो.

इतर मुली आमच्याबरोबर कधीच येत नसत.

रस्त्याने जाताना तिच्या वडिलांचा अवाढव्य सरकारी बंगला प्रथम लागत असे. तिथे ती प्रथम जात असे, पुढे सरळ पाच मिनिटे चालले की आमचे घर.

त्यांच्या फाटकापाशी एखादं मिनिट थांबून गप्पांना पूर्णविराम दिला जाई.

त्या दिवशी मी त्या पूर्णविरामानंतर वळणार तोच—"उज्ज्वला, थांब."

अरेच्चा ! हिने आतापर्यंत कधी हात धरला नव्हता !

"काय ?"

"............"

"अं ?"

"मला आई नाही."

आणि ती वळून झपाट्याने बंगल्याकडे धावलीसुद्धा !

ती संध्याकाळ मी जन्मात विसरणार नाही.

अपरिपक्व मनाच्या ओल्या भूमीवर उठलेली ती फताडी पाउले !

तिच्या घुम्या स्वभावाचे कोडे त्या संध्याकाळी थोडे उकलले. बाईंची तिच्याबद्दलची आपुलकी कुठून उगम पावली होती, हे त्या संध्याकाळी समजले; आणि दिवसभरात विरून गेलेले ते प्रश्नचिन्ह पुन्हा तीक्ष्ण होऊन खुपले.

संध्याकाळी मी अभ्यास केला नाही.

दुसऱ्या दिवशी सुट्टी होती.

पण ती असे अर्धवट बोलून आत का पळाली ?

माझ्याने राहवेना. मी आताच जाऊन तिला भेटले नाहीतर—

डोके फुटणारसे वाटू लागले मला.

जेवल्यावर आईला सांगून मी घराबाहेर पडले.

मला घेऊन ती बाहेरच्या बागेत आली.

शेवग्याच्या झाडावर आम्ही चढून बसलो, आणि तिने माझ्याकडून वचन घेतले— काहीच कुणाला न सांगण्याचे.

मग ती म्हणाली, "हे बघ, घरात आई आहे, बाबांची नवी बायको." आणि मग तिने माझ्याकडे रोखून पाहत, एकेक शब्द सावकाश उच्चारला,

"ती माझी मावशी आहे."

हा सगळा गोंधळ माझ्या बुद्धीला पेलण्यासारखा नव्हता. पण मी तिला काहीच न विचारण्याचे आणि गप्प बसण्याचे धोरण स्वीकारले.

त्यानंतर मात्र तिने हळूहळू मला सगळे सांगून टाकले, आणि वर्गातली तिची वागणूक बदलली. एक पक्की मैत्रीण मिळाल्यावर इतरांकडे थोडेसे लक्ष द्यायला काय हरकत ?

नुसती मैत्री राहिलीच नाही त्यानंतर. भराभर जाणाऱ्या वर्षांच्या जोडीने अतूट नाते निर्माण झाले होते.

पण क्वचित् तिला एकलेपणाची प्रबळ जाणीव छळत असे. अशा वेळी समजूत घालणे फोल ठरे——

"काहीतरी औषध शोधलं पाहिजे विसरण्यासाठी." ती हताश सुरांत म्हणे.

"मी आहे ना पण ?"

"तू काय नेहमी असतेस जवळ ? आता तर बंगलोरला जाणार आहेस. कामातून आठवण येणार का माझी ?"

शेवटच्या प्रश्नातला फोलपणा सोडला तर बाकीचे काही अगदीच खोटे नव्हते. बंगलोरला राहायला गेल्यावर तर पत्र लिहायलादेखील फारशी फुरसत होत नसे.

सात वर्षांपूर्वी, तिचे लग्न झाले, तेव्हा मात्र मुद्दाम आठवडाभर रजा घेऊन मी मुंबईला येऊन गेले.

——मधुकरदेखील, तिला शोभण्यासारखा नव्हता असे नाही. तिच्या हळव्या प्रवृत्तींना साद देणारा, व्यवसायात धडाडीने पुढची पावले टाकणारा खंबीर जोडीदार—

ती खूप आनंदात वाटली.

मात्र हळूहळू त्याचा व्यवसायाचा ध्यास दृढ होत चालला होता.

लग्नानंतर, मला येणाऱ्या तिच्या पत्रांचा निर्मळ प्रवाह हळूहळू आटत गेला होता—प्रफुल्ल मनोवृत्तींचे तुषार उडणं केव्हाच थांबलं होतं——

गेल्या दोन वर्षांत तर काहीच खबर नाही——

"खोदादाद सर्कल"——

कंडक्टर ओरडत होता. आलं एकदाचं दादर.—

दोन वर्षांचं उट्टं काढायला दोन तास बसू नका बाईसाहेब ! घर पार्ल्याला आहे तुमचं—मन बजावीत होतं. स्वतःशीच हसून मी चालू लागले.

बेल दाबली.

कुणीतरी दार उघडायला धावल्याचा आतून आवाज आला. व्हरांड्यात ठेवलेल्या क्रोटन्सच्या मांडणीचं मी कौतुक करीत होते.

एका काळ्या बाईनं दार उघडले. मोलकरीण असणार.

"आइए न!"

चालत चालत इकडून तिकडे वळत एका बंद दाराशी आलो. त्या काळ्या बाईने टकटक केली.

"कौन है? व्ही. सी. लाओ"—

आता मात्र कमाल आहे. हिला व्हिजिटिंग कार्ड पाठवू काय? सहनशक्ती तुटायला आली. उत्सुकतेच्या ताणलेल्या तारेतून फार वरच्या टिपेचे झंकार निघत होते, पण आणखी थोड्या वेळात—

"ए, लवकर दार उघड. मी उज्ज्वला आहे."

मी चक्क मराठीत ओरडले. सुशोभित, नाजुक दिवाणखान्यात अगदीच रानटी!

आणि अर्ध्या मिनिटात दार उघडले.

दारात ती होती.

चेहरा निर्विकार.

पण तिची ती पद्धतच होती.

मी तिला ढकलून खोलीत घुसले, आणि जोराने हसत म्हणाले, "बाहेरच उभं करण्याचा बेत आहे काय?"

तिने निमूटपणे दाराला आतून कडी लावली.

"ए सोंगा, तुला greet करायला आलेय्—आज पाच ऑगस्ट ना?"

खो खो हसून ती म्हणाली, "खरंच की, लक्षातच नव्हतं माझ्या!" आणि तिने माझ्याकडे पाहिलं.

फ्रेंच पद्धतीच्या खिडकीतून गाळून आलेला प्रकाश तिच्या चेहेऱ्यावर पसरला होता.

हिचे डोळे असे का दिसतात?

आणि स्वतःचा वाढदिवस लक्षात नाही?

"ये ना, वसू या आपण." माझा हात धरून तिने मला ओढले. बैठकीकडे वळलो.

टेबलावर पाचशे पंचावनचा टिन् उघडा पडला होता.

ही—? म्हणून डोळे लाल?

तिने माझे अडखळणे लक्षात घेतले आणि आणखी जोराने मला पुढे खेचले.

"मधुकर इथे राहत नाही गेलं दीड वर्ष"—

एक झुरका.

"कारखान्यातच राहतो. हाः हाः हाः! ही माझी सोबत"— तिच्या नजरेच्या अनुरोधाने मी शेल्फकडे पाहिले.

हिरव्या आणि तपकिरी बुटक्या, चपट्या बाटल्या रांगेत उभ्या होत्या. ●

# आणि ड्रॅगन जागा झाला

## अरुण साधू



हूसियांग नदी चीनच्या मध्य विभागातील हुनान प्रांतातून एखाद्या तलवारीप्रमाणे कापीत गेल्यासारखी नकाशात दिसते. पांढरी शुभ्र शिडे असलेल्या तांदुळांनी गच्च भरलेल्या नावा या नदीच्या पात्रातून संथपणे सतत वाहत असतात. नदीच्या सोनेरी वाळूच्या किनारी ठिकठिकाणी लाल दगडांचे उंच उंच कडे दिसतात. प्रांतातील उत्तर भागात बांबूच्या गर्द जंगलांमध्ये शांत आणि स्वच्छ पाण्याची मोठमोठी सरोवरे आढळतात.

भारताच्या कच्छच्या रणातून आसाममधील मणीपूरला जोडणारी रेषा काढून ती तेवढ्याच अंतराने पुढे वाढवली तर ती चीनच्या नकाशातील या इतिहास-प्रसिद्ध प्रांतात नेऊन सोडते. उत्तरेकडे यांगत्से या सुप्रसिद्ध नदीने आणि दक्षिणेकडे नानलिंग या पर्वतशिखरांनी वेढलेल्या या प्रांताची लोकसंख्या महाराष्ट्राच्या लोकसंख्येपेक्षा किंचित जास्त असेल. परंतु हूसियांग नदीच्या या सुपीक खोऱ्यात राहणारे चिनी इतर प्रांतांतल्या चिन्यांपेक्षा देखणे मानले जातात.

लाल बुंद गाल, स्वच्छ चेहरा, भव्य भालप्रदेश व काळेभोर डोळे ही हुनानी चिन्यांची वैशिष्ट्ये चटकन नजरेत भरतात. हुनानी चिन्यांना इतर प्रांतीय चिनी त्यामुळे निसर्गतःच स्वतःपेक्षा श्रेष्ठ समजतात. त्याचबरोबर हुनानी हे हाडाचे बंडखोर आणि क्रांतिकारक म्हणूनही प्रसिद्ध आहेत. जर बादशाहा नसेल तर आपली बंडखोरीची खुमखुमी शमविण्यासाठी म्हणून हुनानी मुद्दाम एखादा बादशाहा तयार करतील असे त्यांच्याविषयी थट्टेने म्हटले जाते.



आणि हुनानी आहेतही तसेच तामसी. हुनानी लोक मिरच्या फार खातात, असे सांगतात. पण थोड्या थोड्या कारणांसाठी ते एकदम वादावादीला व मारामारीला तयार होतात हे खरे. उत्तम सैनिक आणि विद्वान हुनानमधूनच येतात, असे त्यांचे म्हणणे असते.

## माओचे बालपण

अशा या सुपीक व क्रांतिकारक हुनान प्रांतातील ह्सियांग नदीतीरापासून सुमारे २० मैल दूर असलेल्या, बांबूच्या गर्द जंगलांनी व छोट्या छोट्या टेकड्यांनी वेढलेल्या शाओ शान नावाच्या एका सामान्य खेड्यात एका गरीब शेतकऱ्याच्या घरी २६ डिसेंबर १८९३ रोजी एक मूल जन्माला आले. हे मूल एक असामान्य क्रांतिकारक आणि अखिल चीनचे सर्वसत्ताधीश होणार आहे, याची त्याच्या आई-बापांना आणि खेड्यांतल्या लोकांना कल्पनाही नसेल.

बापाने मुलाचे नाव ठेवले माओ-त्से-तुंग.

उंच, धिप्पाड आणि रागीट हुनानी शेतकऱ्याची सारी वैशिष्ट्ये बाप माओ-जेन-शेंग याच्यात होती. इतर शेतकऱ्यांप्रमाणच दारिद्र्य आणि काबाडकष्ट त्यालाही चुकत नव्हते. महापुरांची आणि अवर्षणांची भीती त्यालाही होतीच. धाकट्या माओच्या आजोबांसारखी माणसे, आपण पाहिलेल्या अनेक दुष्काळांच्या अंगावर काटा आणणाऱ्या आठवणी सांगत. आपल्या आयुष्यात आपण किती दुष्काळांचे तडाखे सोसले याची कुणी मोजदाद ठेवीत नसे. दहा वर्षांतून एखाद


चीन
सोव्हिएट रशिया
बाह्य मंगोलिया
आंतर मंगोलिया
सिंकियांग
काश्मीर
पश्चिम पाकिस्तान
दिल्ली
तिबेट
नेपाळ
भारत
पूर्व पाकिस्तान
कलकत्ता
ब्रह्मदेश
पीत नदी उर्फ हुवांग हो
यांगत्से नदी
पेकिंग
कोरिया
शेन्सी प्रांत
नानकिंग
शांघाय
वुहान
चांगशा
हुनान प्रांत
चिंगकांशान
क्वांगटुंग प्रांत
कॅंटॉन
हाँग काँग
फॉर्मोसा
व्हिएटनाम
थायलॅंड
लाओस
हैनान

दुसरेच वर्ष दुष्काळाविना जाई.

त्यामुळे शाओ शानमधील सारेच शेतकरी काटकसरीने राहत. अवर्षणाची बेगमी म्हणून पैसे आणि धान्य साठवून ठेवीत. चहाचे एकही पान निष्काळजीपणे वाया जात नसे. एकाच अंधाऱ्या खोलीत माओ, त्याचे दोन धाकटे भाऊ आणि बहीण, आईवडील व आजोबा यांना राहावे लागे.

पाय फुटल्याबरोबर माओ प्रथम शेतीवर राबण्यासाठी जाऊ लागला. सारे कुटुंब एकत्रच शेतावर सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबत असे. त्याची धाकटी भावंडेदेखील शेतीवरच येत. इंधनाची लाकडे गोळा करणे, शेणखत वाहून नेणे, गुरे राखणे ही मुलांची कामे होती. तांदूळ पेरण्यासही माओ मदत करीत असे. शेतातल्या उंचवट्यावर बसून मोठमोठ्याने ओरडून पक्ष्यांना उडवून लावणे हे मुलांचे आवडते काम होते.

माओचा बाप थोडा महत्त्वाकांक्षी होता. मुलांना आणि बायकोला शेतकामावर गुंतवून त्याने स्वतःचे थोडे लक्ष धान्याच्या व्यापाऱ्यातही घातले. इतर शेतकऱ्यांकडून धान्य विकत घ्यायचे आणि नंतर ते जवळच्या शहरात नेऊन विकायचे हा धंदा त्याने सुरू केला. त्यामध्ये त्याला नफाही मिळू लागला. थोड्याच दिवसांत माओ कुटुंब आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या मानाने सुखवस्तू मानले जाऊ लागले.

आठ वर्षांचा झाल्यावर माओ परंपरागत पद्धतीने शिकविणाऱ्या पंतोजीच्या शाळेत जाऊ लागला. तरी त्याचे शेतातील कष्ट सुटले नव्हतेच. सकाळी आणि रात्री त्याला शेतावर काम करावे लागे आणि दिवसा पंतोजीच्या शाळेत बसून जुनी कॉन्फ्युशसची पुस्तके वाचून काढावी लागत. पंतोजी मोठे कडक शिस्तीचे होते. अधून मधून मुलांना ते चांगलेच झोडपून काढीत.

## ' लढ्या 'चे बाळकडू

आपली चूक नसताना मार खाणे माओला मुळीच आवडत नसे. एकदा पंतोजी असेच त्याच्या अंगावर धावून आले. त्यांना चुकवून माओने शाळेतूनच पळ काढला. बाप घरी मारील म्हणून घरी न जाता दूर कुठेतरी जायचे म्हणून तो शहराच्या दिशेने निघाला पण शेवटी रस्ता चुकून आपल्याच खेड्याभोवती तीन दिवस चकरा मारून घरी परत आला. परंतु घरचे वातावरण बदलले होते. मुलगा पळून जाईल म्हणून बाप जपून वागू लागला. मास्तरांनीही माराचे प्रमाण कमी केले.

माओचा बाप भलताच रागीट होता. माओला थोडे लिहिता वाचता येऊ लागल्याबरोबर त्याने त्याच्याकडे घरच्या, शेताच्या आणि व्यापाराच्या हिशेबाचे काम सोपविले. शेतकाम, शाळा करून माओला रात्री हिशेबही पाहावा लागे. तो मोकळा बसलेला बापाला खपत नसे. मधून मधून तो घरातल्या सर्वांना बडवून

काढी. मुलांच्या हाती तो एक पैसाही लागू देत नसे.

माओची आई मात्र अतिशय दयाळू होती. ती प्रेमळ आणि सोज्वळ होती. ती सर्वांना मदत करीत असे. गरिबांची तिला फार कीव येई आणि दुष्काळाच्या दिवसांत कुणीही भुकेला आला की, त्याला ती काहीतरी खायला देई. यावरून माओच्या बापाशी तिची खूप भांडणे होत.

माओच्या कुटुंबात दोन ' पक्ष ' होते. त्याचा बाप म्हणजे जुलमी सत्ताधारी पक्ष होता. माओ, त्याची भावंडे, आई आणि शेतावरचे मजूर मिळून विरोधी पक्ष होता. पण विरोधी आघाडीत अंतर्गत मतभेद होते. सरळ हल्ला करून बंडाचा झेंडा उभारणे माओच्या आईला मान्य नव्हते. तसे त्याने केले तर ती टीका करीत असे. साऱ्या गोष्टी सामोपचाराने कराव्या असे तिचे म्हणणे असे.

परंतु घरातली भांडणे वाढत होतीच. एकदा माओच्या वडिलांनी घरी काही पाहुणे बोलाविले होते. त्यांच्यासमोर त्यांनी माओला आळशी, निरुद्योगी, मठ्ठ अशा वाटेल त्या शिव्या दिल्या. माओला ते सहन झाले नाही. त्यानेही उलट शिव्या दिल्या आणि तो घराबाहेर पडून पळू लागला. ते पाहताच त्याला घरात परत बोलावण्यासाठी त्याची आई धावत त्याच्या मागे आली. बापही धावत आला आणि शिव्या देत देतच त्याला परत फिरण्याविषयी बजावू लागला. माओ एका तळ्याच्या काठाशी आला आणि बाप एक पाऊलही पुढे आल्यास तळ्यात उडी मारीन, अशी त्याने धमकी दिली. अशा तंग परिस्थितीत मागण्या, प्रतिमागण्या सादर करण्यात आल्या. माओने दोन्ही गुडघे टेकवून क्षमा मागावी, असा बापाने हट्ट धरला तर मारणार नाही असे आश्वासन मिळाले तरच एक गुडघा टेकवीन, असे माओने कबूल केले व अशा रीतीने हा कौटुंबिक लढा संपला.

पण त्यापासून माओ एक धडा शिकला. उघड बंड केले की वडील तळ्यावर येत. पण बावळटपणे दबून वागले की ते चेकाळून शिव्या देत आणि खूप मारीत. लढ्याच्या एकेका पद्धतीचे शिक्षण माओला घरातच मिळत होते.

या घरगुती व्यावहारिक ' शिक्षणा 'बरोबरच शाळेतले बरेचसे पुस्तकी शिक्षणही त्याने स्वतःच आत्मसात केले. पंतोजींसमोर इतर मुलांमध्ये मांडी ठोकून बसून मोठमोठ्याने त्यांना जुन्या क्लिष्ट चिनी पुस्तकांतील उतारे एका सुरात कर्कश आवाजांत घोकावे लागत. हे शिक्षण माओला विशेष आवडत नसे. मास्तरांच्या चोरून तो बरीच पुस्तके वाची.

त्याच काळात त्याने वाचून काढलेले पुस्तक होते शुई-हु-चुआन (आपण सारे भाऊ) या काव्यातील नायक गांजलेल्या गरीब शेतकऱ्यांना संघटित करून निर्भयपणे जुलमी जमीनदार सत्ताधाऱ्यांवर हल्ले करून लढे देतात. या बंडखोर नायकांच्या क्रांतिकथेचे पुस्तक माओच्या संस्कारक्षम मनाला अतिशय आवडले.

## डॉ. सन् यत सेनचा प्रभाव

त्या काळात देशातल्या इतर भागांतल्या बातम्या क्वचितच शाओ शानमध्ये कळत. वर्तमानपत्रे तेथे येत नसत. सरकारी आज्ञापत्रके खेड्यांतील भिंतींवर चिकटविली जात वा शाळामास्तर ती वाचून दाखवीत. ती पत्रके करवसुलीविषयी, लष्कर भरतीविषयी अथवा महाराणी डोवेजरच्या वाढदिवस समारंभाविषयीच असत. माओ अकरा वर्षांचा असताना १९०४ मध्ये महाराणीचा एक वाढदिवस मोठ्या समारंभपूर्वक साजरा केलेला त्याला आठवतो. पण त्याच वेळी चालू असलेल्या डॉ. सन् यत सेनच्या स्वातंत्र्य चळवळीविषयी मात्र माओला यत्किंचितही माहिती नव्हती. १८९५ साली डॉ. सन् यत सेनने केलेल्या उठावाच्या वेळी आणि १९०० साली साऱ्या चीनभर पसरलेल्या परकियांविरुद्धच्या बॉक्सर उठावाच्या वेळी माओ वयाने लहानच होता. पण १९०६ साली अगदी हुनान प्रांतातच डॉ. सन् यत सेनचा अनुयायी हूवांग हूसिंग याने केलेल्या उठावाचीही त्याच्या खेड्यात विशेष झळ पोचली नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटचा आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा तो काळ, आशियातील साऱ्याच देशांमध्ये नवजागृतीचे युग आणीत होता. युरोपियन व्यापार आणि राज्याबरोबरच युरोपियन विचारही या देशांमध्ये वेगाने मूळ धरू लागले होते आणि राष्ट्राभिमानाच्या, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कल्पनांनी भारलेल्या नव्या तेजस्वी पिढ्या जन्माला येऊ लागल्या होत्या.

भारतातही या वेळी अव्वल इंग्रजीचा काळ संपून लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्याची चळवळ जोरात सुरू केली होती. राष्ट्रीय सभेचाही जन्म याच वेळी होत होता.

चीनमध्ये या वेळी मांचू घराण्याच्या बादशाहीचे राज्य सुरू होते. पाश्चात्त्य विचारांतून आलेल्या कोठल्याही सुधारणावादी चळवळीला हे घराणे मोठ्या प्रकर्षाने विरोध करीत होते. अनेक युरोपियन व्यापाऱ्यांनी आणि राष्ट्रांनी चीनमध्ये ठिकठिकाणी अनेक आर्थिक सवलती आणि भूभाग मिळविले होते. त्यांच्या व्यापाराखाली चीनची अर्थव्यवस्था पिळून निघत होती.

या साऱ्या व्यवस्थेविरुद्ध बंड करून साऱ्या चीनभर नवे लोकशाहीवादी सरकार स्थापन करण्याचा क्रांतिकारक विचार माओच्या बालपणी सुशिक्षितांमध्ये वेगाने मूळ धरू लागला होता. या क्रांतिकारकांचा अध्वर्यू होता डॉ. सन् यत सेन.

हाँगकाँगजवळील मकाओ या छोट्याशा पोर्तुगीज चिनी वसाहतीच्या जवळच असलेल्या खेड्यात २ नोव्हेंबर १८६६ रोजी जन्मलेला डॉ. सन् यत सेन सुरुवातीपासूनच बंडखोर होता. धार्मिक रूढींवर विश्वास ठेवीत नाही व त्या पाळीत नाही म्हणून लहानपणीच त्याला त्याच्या खेड्यातून हाकलून देण्यात आले होते.

होनोलुलू येथे त्याने आधुनिक वैद्यकीय व्यवसायाचे शिक्षण घेतले खरे, पण व्यवसायात तो पडलाच नाही. क्रांतीच्या, देशाच्या स्वातंत्र्याच्या, विचारांनी त्याला वेडे केले होते. शिक्षण पूर्ण होताच तो क्रांतिकार्यातच पडला. ठिकठिकाणी त्याने आपल्या गुप्त संघटना स्थापन केल्या व मांचू राजघराण्याविरुद्ध उठाव करण्याची त्याने जोराची तयारी केली.

परंतु चिनी बादशाहीची मुळे हजारो वर्षे खोलवर गेली होती. दोन हजार वर्षांपासून चालत आलेल्या परंपरागत, प्रामाणिक नोकरशाही हा तिचा पक्का कणा होता. संधिसाधू पाश्चात्त्य राष्ट्रांचा पाठिंबा होता. कारण बादशाही टिकवून ठेवणे हे त्यांच्या व्यापाराच्या दृष्टीने हिताचे होते.

डॉ. सन् यत सेनने १८९५ पासून मांचू घराण्याविरुद्ध ठिकठिकाणांहून एकंदरीने तेरा उठाव अथवा बंडे केली. पण दर वेळी त्याला माघार घ्यावी लागली. त्याच्या संघटनेतील अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. स्वतः डॉ. सन् यत सेनला कित्येक वेळा मायभूमीतून पळ काढावा लागला. मांचू बादशहाने त्याच्या डोक्या-साठी १५ लाख रुपयांचे बक्षीस लावले होते.

आपले भूमिगत अवस्थेतील दिवस डॉ. सन् यत सेनने जगभर हिंडण्यात घालवले. युरोप-अमेरिकेतील अनेक लोकशाहीवादी नेत्यांच्या त्याने भेटी घेण्याचा प्रयत्न केला. १८९६ साली असाच तो इंग्लंडमध्ये असताना लंडनमधील काही चिनी हेरांनी पकडून त्याला चिनी वकिलातीत नेले. लगेच त्याला बंदोबस्तात चीनमध्ये नेण्याची व्यवस्था होऊ लागली. पण सुदैवाने त्याच वेळी डॉ. सेनचा एक मित्र लंडनमध्ये होता. त्याला ही बातमी कळताच त्याने ब्रिटनच्या पार्लमेंटमध्ये आवाज उठवला. ब्रिटनच्या मुक्त भूमीवर बेकायदेशीरपणे एका गृहस्थाला पकडून त्याला चिनी वकिलातीत डांबले जाते म्हणजे काय? एकच खळबळ माजली आणि पार्ले-मेंटच्या दबावाने शेवटी डॉ. सन् यत सेनची सुटका झाली. वयाच्या ५० व्या वर्षी त्याने आपल्या एका मित्राच्या २० वर्षे वयाच्या सुंदर मुलीशी विवाह केला.

त्याच्या या नाट्यमय व निष्ठावान क्रांतिकार्यामुळे व लोकशाहीच्या प्रेमामुळे त्याचे नाव चिनी क्रांतिकारकांत प्रमाण मानले जाऊ लागले होते. देशोदेशींच्या तरुण, ध्येयवादी क्रांतिकारकांनाही डॉ. सन् यत सेनचे आकर्षण वाटत असे. पं. जवाहरलाल नेहरूही त्यामुळे डॉ. सेनकडे आकर्षित झाले होते.

क्रांतीच्या नवविचारांचे हे वारे आता साऱ्या चीनभर पसरू लागले होते. डॉ. सन् यत सेनचे सहकारी चीनच्या खेड्यापाड्यांतून संघटना उभारीत होते आणि लोकांच्या असंतोषाला वाचा फोडीत होते.

## जवळून पाहिलेली बंडे

माओच्या शाओ शान खेड्याजवळही अशाच शेतकऱ्यांना प्रक्षुब्ध करणाऱ्या



डॉ. सन् यत सेन

गोष्टी घडत होत्या. माउ तेव्हा तेरा वर्षांचा होता. हुन नची राजधानी चांगशा येथे त्य वर्षी मोठाच दुष्काळ पडल होता. हजारो लोक अन्नावाचू तडफडत होते. शहरांती श्रीमंतांकडे, सावकारांक अन्नाची पोती पडून होत भुकेल्या लोकांनी आपले ए शिष्टमंडळ धान्य मागण्यासाठ हुनानच्या गव्हर्नरकडे पाठवि गव्हर्नरने उद्दाम उत्तर दिले "कोण म्हणतो, गावात अ नाही ? चिक्कार अन्न आ मला तर कोठेच टंचाई दिसत नाही."

त्याचे हे उत्तर ऐकून लोक प्रक्षुब्ध झाले. त्यांनी जोराची निदर्शने करण्यास सुरुवात केली. एका जथ्याने मांचू सरकारी कचेरीवरील ध्वजस्तंभ तोडला आणि गव्हर्नरला हाकलून लावले. ही बातमी ऐकून मांचूच्या अंतर्गत कारभाराचा चांग नावाचा चिटणीस–एक प्रामाणिक अधिकारी–घोड्यावर बसून चांगशा येथे आला व त्याने लोकांना सर्व तऱ्हेची मदत करण्याचे सरकारतर्फे आश्वासन दिले. पण बादशहाची त्याच्यावर इतराजी होती. लगेच जनतेशी घनिष्ट संपर्क ठेवल्याचा आरोप त्याच्यावर ठेवून त्याला पदभ्रष्ट करण्यात आले. नवीन आलेल्या गव्हर्नरने उठावाच्या नेत्यांची एकदम धरपकड सुरू केली आणि त्यांची सरसकट डोकी कापून काढली. आणखी कुणाच्या डोक्यात बंडाचा विचारही येऊ नये म्हणून ती डोकी शहरांतून मिरवण्यात आली.

शहरांतून येणाऱ्या व्यापाऱ्यांकडून या बातम्या शाओ शानमध्ये कळत. शाळेतल्या विद्यार्थ्यांमध्ये त्यावर कडाक्याची चर्चाही होई. बऱ्याच विद्यार्थ्यांना बंडखोरांबद्दल सहानुभूती वाटत असे. पण या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष स्वतःशी संबंध आहे याचा कुणी विचार करीत नसे. माओला मात्र या गोष्टींचा कधी विसर पडला नाही. बंडखोरांबद्दल त्याला अत्यंत आत्मीयता वाटत होती आणि त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबद्दल त्याला भयंकर राग येत होता.

याच सुमारास शाओ शाननजीकच आणखी एक घटना घडत होती. शतकानुशतके अस्तित्वात असलेली ' क्यो लाओ हुई ' (ज्येष्ठ बंधू संघटना) नावाची एक गुप्त संघटना त्याच वेळी हुनानमध्ये पुन्हा जोर धरीत होती. खेड्यांमधील बहुतेक गरीब शेतकरी या संघटनेचे सभासद असत. जमीनदारांच्या जाचापासून छोट्या शेतकऱ्यांना वाचविणे हे या संघटनेचे ध्येय होते. परंपरागत रीतिरिवाजांप्रमाण या संघटनेची शपथ शेतकऱ्यांना देण्यात येई. पुढे पुढे मांचू विरोधाचेही त्या संघटनेत वारे शिरले. या वेळी संघटनेतील एका शेतकऱ्याचे आणि जमीनदाराचे शाओ शानमध्ये भांडण झाले. त्या श्रीमंत जमीनदाराने कोर्टात दावा लावून भांडणाचा निकाल आपल्या बाजूचा करून घेतला.

परंतु संघटनेतील शेतकऱ्यांनी दबून जाऊन पराभव न पत्करता जवळच्याच डोंगरात पळ काढला व त्या जमीनदाराविरुद्ध बंडाचे निशाण उभारले. त्यांच्यावर एक मोठी सेना पाठवून बंड दडपून टाकण्यात आले. बंडाचा नेता पँग याला पकडून त्याचा शिरच्छेद करण्यात आला. त्या वेळच्या शाओ शानच्या विद्यार्थ्यांमध्ये मात्र पँगचे नाव सर्वतोमुखी झाले. वयाच्या तेराव्या वर्षी माओ-त्से-तुंगने या दोन क्रांत्या अगदी जवळून पाहिल्या.

माओची आई त्याला बौद्ध देवळात नेई. मुलाने बौद्ध भिक्षू व्हावे असे तिला वाटत होते. आणि त्या दृष्टीने ती प्रयत्न करीत होती. पण मुलाचे वाचन, वागण पाहून तिने हा नाद सोडून दिला. तरीपण माओने निदान शिक्षक तरी व्हावे. यासाठी तिचे प्रयत्न चालू होतेच. त्याच्या बापाने मात्र जवळच असलेल्या हूसियांग तांग या बाजारपेठेच्या गावात आपल्या एका ओळखीच्या दुकानात तांदळाच्या व्यापाराचे शिक्षण घेण्यासाठी त्याला पाठविण्याचे ठरविले होते.

### नव्या शाळेत

परंतु माओचे विचार वेगळ्याच दिशेने चालू होते. अनेक गोष्टी तो पाहत होता आणि ऐकत होता. नव-विचारांची, शिक्षणाची लालसा त्याच्यात निर्माण झाली होती. त्याच वेळी त्याने नजीकच असलेल्या हूसियांग सियांग या गावात नव्यानेच निघालेल्या शाळेचे नाव ऐकले होते. या नव्या शाळेत जुन्या कॉन्फ्युशन वाङमयावर भर देण्याऐवजी नव्या पाश्चात्त्य ज्ञानाचे शिक्षण देण्यात येत होते.

वडील परवानगी देणार नाहीत याची माओला कल्पना होतीच. त्याने त्यांना न विचारताच शाळेत नाव दाखल केले. वडिलांनी प्रथम पैसे देण्याचे नाकारले. पण त्या शाळेत शिक्षण घेतल्यानंतर आपल्याला अधिक पैसे कसे मिळवता येतील हे माओने परोपरीने पटवून दिल्यानंतर ते कबूल झाले.

नव्या शाळेत माओ मुलांच्या टिंगलीचा विषय झाला. एवढी मुले एकत्र जमलेली त्याने आयुष्यात प्रथमच पाहिली होती. त्यांपैकी बहुतेक बड्या जमीनदारांची मुले होती. प्रत्येकाच्या अंगावर उंची किंमती वस्त्रे होती.

शेतकऱ्यांना आपली मुले त्या शाळेत पाठविणे परवडत नव्हते. इतर मुलांमध्ये माओ अगदीच थोराड आणि खेडुत दिसायचा. सर्वांत दरिद्री आणि जाडे भरडे कपडे त्याच्या अंगावर असत. त्यामुळे ती श्रीमंत मुले त्याचा तिरस्कार करीत.

आपले दारिद्र्य माओ आपल्या अभ्यासूपणामुळे आणि हुशारीने भरून काढी. त्यामुळे बऱ्याच शिक्षकांचा त्याच्यावर लोभ जडला. त्यामुळे तर त्याच्या वर्गातील श्रीमंत मुले त्याचा अधिकच तिरस्कार करू लागली.

परंतु वर्षभरात माओला याही शाळेचा कंटाळा आला. हुनानची राजधानी चांगशा येथे शिक्षणासाठी जावेसे त्याला वाटू लागले. आणि लवकरच आपल्या एका शिक्षकाच्या मदतीने त्याने तेथील एका चांगल्या शाळेत प्रवेश मिळवला. ●

**लेखांक दुसरा समाप्त : तिसरा पुढील अंकी.**

## □ गुप्त संघटनांचे वेड

दुसऱ्या कुठल्याही देशात नसतील एवढ्या असंख्य गुप्त संघटना चीनमध्ये सतत उलाढाली करीत असतात. अनादी काळापासून ही गुप्त संघटनांची प्रथा चीनमध्ये चालत आलेली आहे आणि आजही कम्युनिस्टांच्या राजवटीत ही नेस्तनाबूद झाली असेल, हे संभवत नाही. या संघटना समाजाच्या सर्व थरांत असत. राजकारण्यांच्या, क्रांतिकारकांच्या, बंडखोरांच्या, दरोडेखोरांच्या, शेतकऱ्यांच्या, जमीनदारांच्या, व्यापाऱ्यांच्या, सर्व वर्गांच्या या संघटना अधून मधून विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन हालचाल करीत. त्यांतल्या त्यात गरीब शेतकऱ्यांच्या गुप्त संघटना तर अगदी ठिकठिकाणी असत. जमीनदारांच्या जुलमापासून शेतकऱ्यांचे रक्षण करणे हे त्यांचे ध्येय असे.

या संघटनांच्या सभासदांना संघटनेच्या सर्व आज्ञा पाळण्याची आणि कधीही विश्वासघात न करण्याची शपथ घ्यावी लागे. शपथ मोडणारांना ठार मारले जाई. या शपथा त्यांना मोठ्या विधिपूर्वक घ्याव्या लागत. मंगोलियातील मांचू घराणे गादीवर आल्यानंतर या बहुतेक संघटनांनी आपला रोख मांचू गादी उलथून टाकण्याकडे वळविला. काही काही संघटना अतिशय जहाल असत. एका संघटनेच्या शपथेत पुढील वाक्ये होती–
"त्या परमोच्च शक्तीने भयाण दारिद्र्य आणि अतिरेकी संपन्नता यांतील दुष्ट विरोधाभास नष्ट करण्याचे महान कार्य आमच्यावर सोपविले आहे. स्वर्गाच्या पित्याला आणि पृथ्वीमातेला कोडोंच्या मालकीच्या धनाचा उपयोग थोड्याशा जणांनी आपल्या सुखासाठी करावा, हे नको आहे" ●

# □ खऱ्या जीवनातील नेटके चित्रण

[ निवडक कथा – वसुंधरा पटवर्धन, ललित साहित्य प्रकाशन, मूल्य १० रु. पृष्ठे २८२. ]

वसुंधरा पटवर्धन हे नाव आता मान्यवर साहित्यिकांच्या यादीत जाऊन बसले आहे. "ह्या स्वाक्षरीखाली येणारे कुठलेही लिखाण वाचावयास वाचकवर्ग उतावीळ असतो. मी स्वतः त्या वाचकांपैकी एक आहे," अशी पु. भा. भाव्यांनी प्रस्तावनेत दिलेली कबुली खरी आहे. स्वतःचा विशिष्ट वाचकवर्ग निर्माण करणे हे कसबी साहित्यिकांचे लक्षण असते. वसुंधराबाईंनी हे लक्षण मिळविले आहे.

त्यांच्या अशा लेखनांतल्या या 'निवडक कथा' येथे संपादित केलेल्या आहेत. पु. भा. भाव्यांसारखा विचक्षण आणि रसिक संपादक त्यांना लाभला आहे.

वसुंधराबाईंचा आवाका फार मोठा आहे. जीवनाचे-खऱ्या जीवनाचे-जीवनाच्या जीवनाचे—त्या चित्रण करतात. आणि तेही अगदी नेटकेपणाने, व्यवस्थित, कुठे फापटपसारा नाही, पाल्हाळ नाही, अनावश्यक वर्णन नाही. सारी वाक्ये, सारी वर्णने, बोट रोखल्यासारखी जीवनाकडे रोखलेली असतात. शब्द तोलूनमापून नव्हे, पण अगदी चपखल वापरलेले असतात. 'फुलोरा,' कल्पनाविलास' हे शब्द वसुंधरबाईंना माहीत नाहीत. अंगाबरोबर बेतलेल्या कपड्यांसारखी त्यांची कथा पात्रांबरोबर, त्यांच्या स्वभावांबरोबर बेतलेली असते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची नसन् नस खुलून दिसते. जिवंत वाटते.

## स्त्री

या साऱ्या कथांतून स्त्रीची विविध रूपे वसुंधराबाईंनी दाखविली आहेत. किंबहुना बऱ्याचशा कथांचा मध्यबिंदू स्त्री हाच आहे. पुरुष नुसता परिघाभोवती फिरणारा. प्रभावळीतला. स्त्रीच्या जीवनाची अपरिहार्य बाजू म्हणून आलेला. या स्त्रीजीवनाच्या रुंदावलेल्या कक्षा त्यातल्या सुरकुत्यांसह लेखिकेने प्रभावीपणे चित्रीत केल्या आहेत. अदृष्टाचे वरदान लाभलेल्या आणि तरीही निमूटपणे कर्मभोग भोगणाऱ्या अंबिकाबाई ( 'साधक' ), मेलेल्या नवऱ्याच्या पिशाच्चावरही निष्ठेने मनापासून प्रेम करणारी गोदू ( 'रक्षक' ), हरवलेल्या नादान सौभाग्यासाठी हेलपाटे घालणाऱ्या चंपूताई ( 'हेलपाटे' ), आंगेतल्या तुळशीप्रमाणे कलावंतिणीच्या कुळात जन्मूनही एका पुरुषावर निष्ठेने सर्वस्व ओवाळून टाकणारी अनामिका ( 'अनामिका' ), चार माणसे जसे दुःख करतात त्या सामान्य अवस्थेतून एका

चमत्कारिक जागी जाऊन पोचलेल्या माई ('घेणेकरी'), जिवंतपणी खुशीने करपून गेलेली विमल पाठक ('ग्लानी')--इत्यादी अनेक स्त्रिया या कथांतून उभ्या राहतात. त्यांच्या जीवनाचे आडवेउभे धागे एकमेकांत गुंताडून जातात. 'साळू', 'स्त्री', 'तपश्चर्या', 'पुरोगामी', 'आजीचे वसतिस्थान' या कथाही स्त्रियांच्या कथा आहेत. स्त्रीच्या भावना, तिचे मन, त्याला आलेले कंगोरे आणि त्याची धार, तिचा हळुवारपणा आणि तिचा कठोरपणा या साऱ्यांमुळे भोवतालच्या जीवनात बनलेला तिचा कोष वसुंधराबाईंनी या कथांतून दाखविला आहे. आणि हे करताना कुठल्याही सांकेतिकतेचा साचा त्यांनी वापरला नाही. अश्रू, हुंदके आणि सवंग सहानुभूती यांचा स्वस्त मसाला त्यांच्या कथांत आढळत नाही. त्यांची प्रत्येक कथा काही तरी नवीनच सांगते. स्त्रीच्या मनाची एक नवीन खिडकी उघडते आणि त्यातून बरेच काही दाखवून जाते. हे 'बरेच काही' मनाला अस्वस्थ करते. कारण खऱ्या जीवनाचा दाहक स्पर्श त्याला झालेला असतो. स्त्रीच्या ठराविक मर्यादेच्या बाहेरील सुखदुःख त्यात मिसळलेले असते. तिच्या प्रेमाचा नवा दृष्टिकोन, तिच्या त्यागाचे टोकदार स्वरूप, तिच्या तपश्चर्येचे लखलखीत तेज त्यात झळकून जाते. स्त्रीच्या आगळ्या समस्या त्यांत आकार घेतात. तिचे अफाट बल आणि तिची असहाय्य निर्बलता यांचा छेद गेलेला दिसतो. 'साळू'ला जपून राहण्याचा इशारा देणारे मास्तर आणि अपरिहार्यपणे त्यांच्या हाताबाहेर जाऊ लागलेली साळू ह्या दोघांचीही अगतिकता वसुंधराबाईंची लेखणी नेमकी दाखविते. ती स्वतः तिच्या भोवऱ्यात सापडत नाही. मात्र कथा वाचून अनेक वर्तुळे वाचकांच्या मेंदूत आपोआप निर्माण होतात. पतीचे आनंदाने दुसरे लग्न लावून देणारी पार्वती, आणि मूकपणे उपकाराच्या ओझ्याखाली जळणारी उमा या दोघींची 'तपश्चर्या', त्यांच्या मनांची गुंतागुंत, परिस्थितीने त्यांना घातलेला विचित्र तिढा या साऱ्यांचे वर्णन करताना वसुंधराबाईंची लेखणी कधी उत्कटतेने भारावून जात नाही, की उमाळ्याने गहिवरून येत नाही. पण या सर्वांचे चित्रण ती इतक्या भेदक अलिप्ततेने करते की मनाचा तळ ढवळून निघाल्याखेरीच राहत नाही. 'घेणेकरी' ही या दृष्टीने अत्युत्कृष्ट कथा. स्त्रीच्या सगळ्या बाजूंवर विदारक प्रकाशझोत टाकणारी. म्हातारा नवरा मेल्यावर गदगदून रडणाऱ्या माई, नारळाएवढा अंबाडा जाताना किंचाळणाऱ्या माई, दागिने मोडून खात खंगणाऱ्या माई, नवऱ्याच्या वस्तू कवटाळून उंबऱ्यावर धाडधाड डोके आपटणाऱ्या माई, कानामागे पदर खोचून लोकांकडे कामाला जाणाऱ्या माई, नानूच्या प्रकृतीला उतार नाही म्हणून नदीत उडी टाकणाऱ्या माई आणि शेवटी हे सारे अती झाल्याने पिचून, वैतागून, बधीर होऊन साऱ्याच्या पलीकडे पोचलेल्या व रोगी नातीला शिव्याशाप देत, अभद्र बोलत हापूसचा आंबा चवीने खाणाऱ्या माई ही सारी चित्रे मनाला सुन्न करतात. जीवन सहन होत नाही.

## सामान्य जीवनातले असामान्य नाट्य

'साधक', 'रक्षक' आणि 'मालक' या तीन अद्‌भुत कथा सोडल्या तर बाकीच्या साऱ्या कथांतील माणसे सामान्यच आहेत. पण त्यांच्या सामान्य जीवनातल्या असामान्य नाट्यावर लेखिकेने नेमके बोट ठेवले आहे. त्याला उठावदार आणि परिणामकारक बनविले आहे. भाऊबंदकीत विशेष काही नाही. परंतु 'जप्ती' या कथेतल्या आळशी काकाला मायेच्या सूक्ष्म धाग्याने जखडलेला आणि त्याचे सारे निमूटपणे निस्तरणारा भाऊ आणि हे सारे न पटणारा व आईच्या वळणावर गेलेला पुतण्या यांच्यांतील संघर्षातून नाट्य उभे राहते. काकाच्या मख्ख विक्षिप्त वागण्याने या नाट्याला धार चढते. पुतण्या कोर्टात जातो; जप्ती आणतो; काकाला त्याच्या बायकोमुलांसह घराबाहेर काढतो. तरीही काका शांत आहे. रडणाऱ्या काकूला व मुलांना तो म्हणतो, "आता आपण नानाच्या घरात जेवायचं. चला रे पोरांनो, चल ग तू, आता आपण नानाच्या जवळ राहू या. ये रे नाना. चला, चला व्हा आत. उचला हे नानाचं सामान, नानाची भांडी. झाडून स्वच्छ करा हे नानाचं घर. आणि नानाच्या काकू, तू आज नानाच्या घरीच स्वैपाक कर. आज तो मालक. आपण पाहुणे. आपण आज त्याच्या घरी जेवू या." पुतण्या विरघळतो. जप्तीचा कागद फाडून टाकतो. कथेतील जीवननाट्याला असामान्याचा स्पर्श होतो. वसुंधराबाईंना हे असले सगळे बरोबर दिसते. जीवनातले नाट्य आपणहून त्यांच्यापुढे येते. त्यांच्या लेखणीतून आकार घेऊ लागते. आगगाडीत त्यांना 'सकीना'सारखी तरुणी भेटते. तिचा तरुण उमदा नवरा भेटतो. दोघेही परस्परांच्या सुखासाठी धडपड करीत असतात. सुधारक असतात, सकीनाचे केस कापलेले असतात. अंगावर सुंदर महाराष्ट्रीय दागिने असतात. पाश्चात्य झगा असतो. या सुधारक प्रेमी जोडप्याला पाहून लेखिकेचा मुसलमानांविषयी पूर्वग्रह बदलू लागतो. "कोण म्हणतो की, मुसलमान जुनाट, बुरसटलेला आणि हिरवट डोक्याचा आहे? मला खरोखरीच खरे वाटेना. हा सुधारक माणूस आपल्या बायकोची प्रत्येक गोष्ट करीत होता." – आणि शेवटी स्टेशन आल्यावर त्या प्रेमळ सुधारक नवऱ्याने लाघवी स्मित करीत पुढे केलेला बुरखा ( सुंदर पोताचा, सुंदर लेस अन् नाजूक जाळी लावलेला ) पेहेरून ती मुलगी त्याच्यामागून आज्ञाधारकपणे खालच्या मानेने चालू लागते. नागमोडी रेषेत चालणारी कथा एकदम उंच झोका घेते. नाट्य निर्माण होते. लेखिकेची सहानुभूती त्या नाट्याची जोपासना करते. सफाईदार संवाद, सूक्ष्म निरीक्षण आणि अर्थाचा गाभा असलेली चिंतनशील वाक्ये यामुळे हे नाट्य मनाला भिडते. आपला ठसा उमटवते.

वसुंधराबाईंच्या कलागुणांचा आविष्कार या 'निवडक कथां'तून निश्चित होतो. 'अंधार' सारख्या त्यांच्या गाजलेल्या कथेची अनुपस्थिती मात्र जाणवते. ●

– निशिकांत मिरजकर



# जे नव्हते ध्यानी मनी

We never meant to go so far

या माविस रॉनसनकृत पुस्तकाचा परिचय

लेखांक आठवा

माविस

[समुद्र शांत होण्यासाठी कासव पाण्यात सोडून मावित-बार्बारांनी रंगून सोडले.]

वृत्तपत्रांना उत्तम छायाचित्रांसह प्रवासवर्णने पुरवणाऱ्या एजन्सी लंडनमध्ये आहेत. प्रवासी त्यांना फोटो व वर्णने पाठवतात. संपादकांना हे साहित्य एजन्सी विकत देते व कमिशन कापून पैसे प्रवाशांना रवाना होतात. आतापर्यंत मावितने घेतलेली छायाचित्रे व बार्बाराने लिहिलेली प्रवासवर्णने मावितने लंडनला धाडली होती. दोघींचे प्रवासांतील अनुभव असे थरारक असल्यामुळे त्यांना लंडनमध्ये मागणी वाढली व दोघींना एजन्सीमार्फत चांगले पैसे मिळू लागले.

बँकॉकपासून हे पसे येण्यास सुरुवात झाली. दोघींचा उत्साह वाढला. पैसा खिशात असल्याने आत्मविश्वास दुणावला. एजन्सीकडून प्रेसकार्डे आली. दोघींना आता यापुढे 'Press' म्हणून कुठेही प्रवेश मिळणे सुलभ झाले आणि अधिकाऱ्यांच्या मेहेरबानीचे जोगवे मागत हिंडण्यातून त्यांची मुक्तता झाली.

बँकॉकहून दोघी मलायात आल्या. तेथे नव्या राजाचे राज्यारोहण होते. मोठा समारंभ होता. दोघींनी त्याचे वृत्तांत छायाचित्रांसह तयार केले. तिथे त्यांना कळले की, इंडोनेशियातील बाली बेटावर मोठा समारंभ आहे. जुन्या काळी मेलेल्या राजाच्या अस्थींचा वार्षिक दफनविधी समारंभाने तिथे साजरा होतो. एका मालवाहू बोटीने हजार मैलांचा प्रवास त्यांनी पत्करला.

या मालवाहू बोटीचा कॅप्टन एक डच होता. तो मोठा आनंदी आणि परोपकारी होता. त्याने दोघींची बोटीवर उत्कृष्टे व्यवस्था ठेवली. बाली बेटात उतरल्यावर 'अमेरिकन ऑईल कंपनी'च्या आवारात त्यांची उतरण्याची सोय करून दिली.

हजारो अमेरिकन प्रवासी बाली बेटात दाखल झालेले होते. हा समारंभ आटोपून पुढचे तीन महिने दोघीजणींनी आसपासच्या लहान लहान बेटांवर भटकण्यात घालवले. या बेटांवर निरनिराळ्या जातगंगा सांगणाऱ्या जमाती राहत होत्या. त्यांचा धर्म मुसलमान असला तरी त्यांच्या आचारांत बऱ्याच गोष्टी हिंदू संस्कृतीतील होत्या. ते सणासुदीला गायी कापीत आणि प्रसंगी डुकराचे जेवण घेत. लोंबोंक, सुमबाता, फ्लोरेस या बेटांवरील भटकंती संपल्यावर दोघींनी जावातील सुराबाया बेटावर जाण्याचे ठरविले. १९५७ साल संपत आले होते. १ जानेवारी, १९५८ ला दोघींनी जावात जाण्यासाठी बोटीवर पाऊल ठेवले.

सुराबाया बेटावर दोघी पोचल्या, तेव्हा कुणीही स्थानिक बिनलष्करी माणसे त्यांच्याशी बोलायला तयार नव्हती, असा त्यांना अनुभव आला. इंडोनेशियातून त्या वेळी नुकतीच डचांची हकालपट्टी झाली होती व सत्तेसाठी कम्युनिस्टांनी देशात यादवी माजवलेली होती. सुराबाया बेटावर अनेक लष्करी तुकड्या जमा झालेल्या होत्या. डचांनी न्यू गिनी मात्र स्वतंत्र केलेले नव्हते व तेथून डचांना हुसकावण्याच्या प्रयत्नात इंडोनेशिया होता.

## प्रश्नांची सरबत्ती

इंडोनेशिया हे सुमारे ३००० बेटांचे एक राष्ट्र आहे. अशा राष्ट्रात राज्यकारभार स्थिरावयाचा तर वाहतूक व्यवस्था उत्तम हवी. परंतु डचांची जहाज कंपनी स्वतंत्र इंडोनेशियन सरकारने ताब्यात घेताच सर्व अनुभवी डच सेवकवर्ग नोकऱ्या सोडून चालता झाला होता व शेकडो बोटी या सेवकवर्गाअभावी समुद्रात नांगरून पडलेल्या होत्या. याचा परिणाम असा झाला होता की, एखादी बोट निघाली की, तिच्यावर प्रवाशांची बेसुमार गर्दी होई. तिकिटांचा काळाबाजार सर्रास चाले.

ही परिस्थिती पाहून इतर कुणी हातपाय गाळले असते व प्रवास संपवला असता. माविस-बार्बारांना उलट जोरच चढला. लंडनची वृत्तपत्रे त्यांच्या मागे लकडा लावून होती : "फोटो पाठवा – हकीकती पाठवा."

नेहमीप्रमाणे माविसने आर्मी हेडक्वार्टर्समध्ये जाऊन तिथल्या इंडोनेशियन मेजरला गाठले. दोघींना पाहून तो खूष झाला. त्याने प्रेस कॉन्फरन्स बोलावली. वृत्तपत्रप्रतिनिधी जमल्यावर दोघींवर प्रश्नांचा भडिमार सुरू झाला.

"इंडोनेशियन कम्युनिस्टांपासून जागतिक शांततेला धोका आहे, असे आपणांस वाटते काय?"

"न्यू गिनीच्या प्रश्नावर डचांशी युद्ध करावे काय?"

"डचांच्या कंपन्यांचे सरकार राष्ट्रियीकरण करीत सुटले आहे ते बरोबर आहे काय ?"

दोघींनाही या गुंतागुंतीच्या प्रश्नांबाबत मते अशी काही नव्हती. काय उत्तरे दिली तर चालेल ? कोणती उत्तरे त्यांना हवी आहेत ? दोघींनी आपली भूमिका लगेच बदलली.

"आम्ही दोघी प्रवासी आहोत. फोटो घ्यावेत, तुमचा देश पाहावा म्हणून आलो आहोत. इथल्या स्त्रिया सुंदर आहेत, इथली जनावरे सुंदर आहेत, इथल्या इमारती सुंदर आहेत, इथले दगड नि धोंडे सुंदर आहेत," असा सगळा सुंदरतेचा साक्षात्कार झाल्याचा निर्वाळा त्या देऊ लागल्या. प्रश्नांची दिशा पालटली. त्या आपत्तीतून दोघी सुटल्या.

वृत्तपत्रांतील बातम्यांवरून त्यांच्या ध्यानात आले की, उत्तर सेलेबसची राजधानी मेनाडो येथे लष्करी गडबड उडाली आहे. इंडोनेशियातील सेलेबस हे सर्वांत मोठे बेट होय. राज्यकारभाराच्या सोयीसाठी डचांनी याचे उत्तर सेलेबस व दक्षिण सेलेबस असे दोन भाग केले होते. मेनाडो हे उत्तर सेलेबसचे सर्वांत मोठे शहर व राजधानी. या भागात बहुसंख्य लोक ख्रिश्चन धर्मीय होते. डचांनी या भागात मिशनऱ्यांचा सुळसुळाट करून अनेक स्थानिक कुटुंबे सुरुवातीला बाटवली व मग त्यांना राजदरबारी मानमान्यता देऊन इतर अशिक्षित लोकांना ख्रिश्चन करून टाकले. धर्मांतरानंतर राष्ट्रांतर होते, या न्यायाने हा सर्व विभाग डचांच्या राज्याचा आधारस्तंभ झाला. शिक्षणाची विशेष सोय असल्यामुळे ही सर्व डचधार्जिणी ख्रिश्चन मंडळी मोठमोठ्या अधिकारपदांवर गेली व सैन्यातही त्यांचे प्राबल्य झाले. केवळ ६ टक्के साक्षरता असलेल्या इंडोनेशियातील हा भाग मात्र ७०–८० टक्के सुशिक्षित होता.

यामुळे मेनाडो शहरात सर्व आधुनिक गोष्टी होत्या. सडका उत्तम, रस्त्यांवर मोटारी, रिक्शा, स्कूटर्स यांचा सुळसुळाट, अधिकाऱ्यांची पाश्चिमात्य धर्तीवरची विलासी राहणी. घरात फ्रीज, रेडियो. अशा या मेनाडोला जाण्यासाठी माविसने मित्र झालेल्या मेजरकडून बोटीची तिकिटे मिळवली. १९ जानेवारी १९५८ ला एक उतारू बोट सुराबायाहून सुटणार होती. त्या बोटीची ही तिकिटे होती.

बोटीवर लष्करी अधिकाऱ्यांची व सैनिकांची गर्दी उसळली होती. नागरिकांना मागे ढकलून या मंडळींनी सर्व तिकिटे हस्तगत केली होती व त्यांच्यांतच माविस–वार्वारांनी वर्णी लावली होती. नुसती वर्णीच लावली नव्हती तर असंख्य तिकिटे हस्तगत करून ती काळ्या बाजाराने विकून पैसा केला होता.

बोटीत लाऊडस्पीकर्सवरून पॉपट्यून्स सुरू होते. आणि त्या तालावर सैनिक डोलत होते.

## मेनाडोतील मुक्काम

मेनाडो येथे बोट पोचताच, सैनिकी अधिकाऱ्यांनी जाहीर केले की मेनाडो येथील जावानीज सैन्य हलवण्यासाठी बोट ताब्यात घेण्यात आली आहे.

पुढे जाण्यासाठी तिकिटे काढलेले प्रवासी व मेनाडो येथे आत चढणारे सैनिक यांच्यांत बाचाबाची सुरू झाली. सैनिकांनी नागरिकांचे सामान उचलून बोटीजवळ आलेल्या पंडावांमध्ये वाटेल तसे फेकण्यास सुरुवात केली. या गोंधळात माविस-बार्बारा आपले सामान घेऊन निसटल्या. त्यांना फक्त मेनाडोलाच पोचायचे होते.

उतरताक्षणीच मेनाडोच्या लष्करी मेजरच्या बायकोने त्यांचा कबजा घेतला. मिसेस सुपिटने या गोऱ्या पाहुण्यांना घरी नेले. मेजरसाहेब आपल्या कामावर गेले होते. मिसेस सुपिटला सोबतिणी हव्याच होत्या.

मिसेस सुपिटकडून माविसने बरीच माहिती गोळा केली. तिच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांकडूनही तिला बरीच माहिती मिळाली.

सेलेबस बेटावरील मुख्य धंदा खोबऱ्याचा. खोबऱ्याचा उपयोग मुख्यतः साबण व मार्गारीनच्या धंद्यात होतो. प्रत्येक महिन्याला १०,०००,०० नारळ उतरवले जातात. नारळाचे झाड साठ वर्षे नारळ देते. दर तीन महिन्यांनी साधारणतः पंधरा नारळ तयार होतात. खोबरे काढून भुरकट रंगाचे होईपर्यंत उन्हात वाळवून ते बाहेरच्या देशांत पाठवले जाते. जगातील हा सर्वांत मोठा धंदा इंडोनेशियात आहे. त्यांतल्या त्यांत उत्तर सेलेबसमध्ये यांतील ५० टक्के व्यवसाय एकत्रित झालेला आहे. पाच झाडांपासून हजार झाडांपर्यंत बागाईतदार येथे आहेत.

इंडोनेशियात खनिजेही भरपूर आहेत. तेल, टिन, बॉक्साईट, लोखंड, तांबे, निकेल, सोने, चांदी आणि हिरे यांच्या खाणी आहेत. शिवाय रबर, क्विनाईन, कॉफी, तंबाखू यांचाही पुरवठा विपुल आहे.

मेनाडोच्या लोकांना डचांनी जावातील इतर लोकांपेक्षा जवळचे मानले. जसे भारतात ब्रिटिशांना ख्रिश्चन व मुसलमान जवळचे वाटत तसे. त्यामुळे मेनाडो येथील लोकांची परिस्थिती डचांनी गाशा गुंडाळल्यावर कठीण झाली. १९४९ साली डच निघून गेल्यापासून या लोकांना इतर जावानीज लोकांबरोबर समरस होणे भाग पडत गेले व आतापर्यंत ही गोष्ट केलेली नसल्यामुळे त्यांच्याविषयी विद्वेष वाढत गेला.

इंडोनेशियातील लालभाई, राजेरजवाडे, जात्यंध मुसलमान आणि डचांचे प्रेमी मेनाडो या सर्वांनी आगीत तेल ओतून इंडोनेशियन सरकारला सळो की पळो करून सोडले. गाड्या अडवणे, पूल उडवणे, खेडी जाळणे हे प्रकार सर्रास सुरू झाले. इंडोनेशियात यादवी सुरू झाली.

मेनाडोतील लोकांनी सरकारला धाब्यावर बसवून सर्व कर चुकवून माल निर्यात

करण्यास सुरुवात केली. चलन हद्दपार केले व वस्तूंच्या देवघेवींचा व्यापार सुरू केला. हा बेकायदा व्यापार थांबवणे सरकारला जमेना.

इंडोनेशियन सरकारने मेनाडोचा कब्जा घेतला. खोबऱ्याचा व्यापार सरकारी अंमलाखाली आणला व सिमेंट, रस्त्याची मशिनरी, लष्करी साहित्य यांची त्याबदलात आवक सुरू केली. तरीही लष्करात अनेक पैसेखाऊ अधिकारी असल्याने काळा बाजारही तेजीत होता.

मेनाडोत आलेल्या लेफ्टनंट कर्नल सुमुएल याने स्वतंत्र मेनाडोचे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली. जकार्ताहून येणाऱ्या आज्ञा तो धाब्यावर बसवू लागला. सुमुएलचा कबजा फक्त उत्तर सेलेबसवर होता. परंतु इंडोनेशियातला हाच प्रदेश सर्वांत समृद्ध होता.

माविस-बार्बारांनी मेनाडोत पाऊल ठेवले ते १९५८ मध्ये. या वेळी इंडोनेशियाचा सुखासीन हुकुमशहा सुकार्नो हा जपानच्या दौऱ्यावर होता. सुमुएल हादेखील मेनाडोबाहेर गेला होता. सर्व लष्करी अधिकारी ८-१० दिवसांत माविस-बार्बारांचे दोस्त झाले होते. परिस्थिती मोठी नाजूक झाली होती.

मग एके दिवशी मिसेस सुपिटच्या घरी काही लष्करी अधिकाऱ्यांबरोबर चहा घेत असताना ऑस्ट्रेलियन रेडिओने बातमी दिली—

'लेफ्ट. कर्नल सुमुएल यांनी अध्यक्ष सुकार्नो यांना असा इशारा दिला आहे की, ज्या कम्युनिस्टांच्या पाठिंब्यावर सुकार्नो सरकार राज्य करीत आहे त्या पक्षाला ताबडतोब बेकायदा ठरविण्यात यावे. काही डाव्या पक्षांच्या मंत्र्यांना मंत्रिमंडळातून हाकलण्यात यावे व जर हे झाले नाही तर मध्य सुमात्रात सुकार्नोविरोधी स्वतंत्र सरकार सेनाधिकारी अस्तित्वात आणतील.'

लष्करी अधिकाऱ्यांचे चेहरे काहींचे हर्षाने व काहींचे विषादाने भरून गेले. सर्वजण घाईघाईने निरोप घेऊन निघून गेले.

यानंतर दोन-तीन दिवसांनी सकाळी सहाच्या सुमारास माविस व बार्बारा अंथरुणात लोळत असताना मेनाडोवर एक विमान अगदी खालवर येऊन घिरट्या घालू लागले. प्रचंड आवाज होताच माविस-बार्बारा व मिसेस सुपिटने मुलांना पलंगाखाली ढकलले व तिघी खिडकीशी आल्या.

जकार्ताहून आलेल्या विमानांनी मेनाडोवर बॉंबफेक सुरू केली होती. रेडिओ केंद्र बरोबर टिपले होते. सुमुएलच्या धमकीला सुकार्नोने दिलेले हे उत्तर होते. टेलिफोनचे सर्व दळणवळण जकार्ता सरकारने बंद पाडले होते.

लढाई सुरू झाली होती.

लढाई सुरू होताच बाजारातील वस्तू काळ्या बाजारात गेल्या. सिगरेटच्या किंमती दसपटीने वाढल्या. धुण्याचा व अंगाला लावण्याचा साबू मिळेनासा झाला. पेट्रोल खाजगी वाहनांना बंद झाले. माविस-बार्बारांनी आता मेनाडोहून पुढे सर-

कण्याचे ठरवले. परंतु जाणार कसे ? मेनाडोपासून साठ मैलांवर असलेल्या बिटुंग बंदरात एक इंग्लिश जहाज लागल्याची कुणकुण त्यांना लागली व दोघी मोटारीने तिथे गेल्या. जहाजाच्या कप्तानाने दोघींना आश्वासन दिले, ' तुम्हांला दोघींना मी नेतो. परंतु अजून निघण्याची तारीख निश्चित नाही. मेनाडोला मी तार करीन तुम्ही निघून या. '

## सुमुएलची भेट

निसटण्याची सोय करून दोघी लॉरीने परत मेनाडोला येत असताना वाटेत लष्करी मोटारींचा भला मोठा ताफा लागला. लॉरी ड्रायव्हरने लॉरी थांबवली व तो माविसला म्हणाला,

" सुमुएल परत आलेला दिसतो. "

सुमुएलचे नाव निघताच माविसने आग्रह धरला की त्याची न् आमची गाठ घालून दे. त्या लष्करी ताफ्याच्या मागोमाग त्याने लॉरी टेकडी भागात नेली.

सुमुएलच्या निवासाबाहेर दोघींना रक्षकांनी अडवले. दोघी हट्ट धरून बसल्या, " भेट झाल्याशिवाय आम्ही येथून हलणार नाही. "

रक्षकांचा नाइलाज झाला. सुमुएलने दोघींना भेटीसाठी बंगल्यात बोलावले.

दोघी दिवाणखान्यात शिरताच सुमुएल म्हणाला, " तुमच्या दोघींविषयी माझ्या कानांवर कुणकुण आली आहे. आम्ही जे काम करीत आहोत ते बहुधा तुम्हांला पसंत नसेल. "

किंचित स्तब्ध राहून तो एकदम भुंकल्यासारखा ओरडून म्हणाला–" तुम्ही दोघी ' डेली वर्कर ' पत्राच्या बातमीदार आहात ना ? "

माविसने प्रसंगावधान ठेवून टिंगलीच्या सुरात उत्तर दिले–

" त्या भिकार पत्राला दोन मुलींना खर्च देऊन इतक्या लांब पाठविणे कधी शक्य आहे का ? आम्ही लंडनच्या एका एजन्सीकरता काम करतो. अमुकच वृत्त-पत्राकरता असे नाही. "

सुमुएल खूश झाला. दोघी बसल्यावर जणू मुलाखत सुरू झाली असे समजून सुमुएल म्हणाला–" पहिली गोष्ट आम्ही करणार, म्हणजे इथल्या कम्युनिस्टांना लाथा घालून इंडोनेशियाच्या बाहेर काढणार. आमची सामान्य जनता कम्युनिस्ट नाही. पण काही पुढारी कम्युनिस्ट आहेत. हे लोक जनतेला फसवतात व आमच्या देशात आर्थिक विघ्ने निर्माण करतात. "

सुकार्नोविषयी सुमुएलने सांगितले–" अध्यक्ष सुकार्नो स्वतः कम्युनिस्ट नाहीत. पण मी स्वतः लाखो लोकांचा बळी घ्यावा लागला तरी इंडोनेशियातून कम्युनिस्टांची हकालपट्टी केल्याशिवाय थांबणार नाही. आम्ही लढाऊ जमात आहोत, डचांना आणि जपान्यांना आम्ही धूळ चारली तिथे कम्युनिस्टांना हुसकायला काय उशीर ? "

या बंडखोर लष्करी नेत्याशी गप्पा मारून दोघी परत आल्या. आश्चर्य म्हणजे थोड्याच वेळात सुमुएल मिसेस सुपिटच्या घरी आला. कर्नल सुपिट हा त्याचा ए. डी. सी. होता. दोघींना कर्नल सुपिटच्या घरी पाहून सुमुएलने मिसेस सुपिटशी कानगोष्ट केली. सुमुएल निघून जाताच, मिसेस सुपिटने माविसला सांगितले, "तुम्हांला आता माझेकडे ठेवता येणार नाही. तुम्ही इतर कुठे राहण्याची सोय करा!"

लंडनहून दोघींच्या वडिलांकडून तारांवर तारा आल्या होत्या, "तावडतोब इंडोनेशिया सोडा. पैसे कुठे पाठवू ते कळवा."

इंडोनेशिया सोडायचा पण कसा हा प्रश्न होता. विमाने नव्हती. बोटी बंद. रस्त्यावर युद्ध जुंपलेले. दोघींना बिटुंग बंदरात असलेल्या ब्रिटिश बोटीसंबंधीच काय ती आशा उरली होती.

दोघींच्या दुर्दैवाने बिटुंग बंदरावर जकार्ताहून आलेल्या दोन लढाऊ जहाजांनी तोफा डागल्या व या गोळाबारीत दोघींना न घेताच ते ब्रिटिश जहाज बंदराबाहेर निसटले. जहाजावर काळ्या बाजारात चढवलेला लक्षावधी रुपयांचा माल होता व हा माल सिंगापूरपर्यंत पोहोचवला तर त्या ब्रिटिश कप्तानला ६०,००० रुपये मिळणार होते! म्हणूनच माविस–बार्बारांना न घेता कप्तानाने जहाज बंदराबाहेर काढले.

सुमुएलकडे दोघी गेल्या. सुमुएल म्हणाला, "तुम्हांला दोघींना सिंगापूरला नेण्याची मी व्यवस्था करतो. तुम्ही आता इथे राहू नये. जकार्ताहून सैन्य आले व इथे मेनाडोत उतरले तर युद्ध पेटेल."

दोघी एका हॉटेलात परतल्या. सुमुएलच्या मदतीने निसटावे, असा विचार दोघींच्या मनात येत होता. परंतु वाटेत जकार्ताच्या लढाऊ जहाजांनी जहाज बुडवले तर?

दुसऱ्या दिवशी सकाळी मेनाडो बंदरात प्रचंड स्फोट ऐकू आले. दोघींनी कॅमेरे घेतले. त्या बंदराच्या दिशेने पळू लागल्या. लोक उलट दिशेने हाती नेता येईल ती चीजवस्तू घेऊ डोंगराच्या दिशेने पळत होते. बिटुंगवर तोफा डागून ती जहाजे आता मेनाडोवर भडिमार करीत होती. पेट्रोलच्या टाक्या पेटल्या होत्या. बंडखोर लष्कर बंदरातून उलट गोळ्या झाडीत होते.

माविस–बार्बारा या धुमश्चक्रीत बंदरावर दाखल झाल्या. हातात कॅमेरा असला की माणूस वाटेल ते धोके पत्करतो. एकही नागरिक आता बंदरावर नव्हता. समुद्रकाठावर जहाजांवरून पेटते गोळे येऊन पडत होते.

माविस–बार्बारा वाळूतून किनाऱ्यावर पडलेल्या एका लाकडी होडक्याआड पडून लढाई पाहू लागल्या. दोघींच्या डोक्यावरून गोळ्या जात होत्या. केवळ पंचवीस फुटांवरून प्रत्यक्ष लढाई पाहण्याची ही सुवर्णसंधी त्यांना लाभत होती.

पेट्रोल टँकरना लागलेल्या आगीच्या ज्वाला पसरू नयेत म्हणून बंडखोर सैनिक व अग्निशामक दलाचे स्वयंसेवक काम करीत होते. असंख्य लोक जखमी होऊन बीचवर विव्हळत होते. त्यांना उचलण्याच्या व्यवस्थेत काहीजण होते. काही उलट दिशेने तोफा डागीत होते.

माविस–बार्बारा छायाचित्रे घेत होडक्याआडून हा जिवावरचा खेळ पाहत होत्या. थोड्या वेळानंतर जकार्ताहून आलेली जहाजे परत फिरली. लढाई शांत झाली.

या लढाईनेच माविस–बार्बारांचा मेनाडोहून निसटण्याचा मार्ग सुलभ झाला. मेनाडो बंदरात डच सरकारची दोन तीन जहाजे होती. या जहाजांनी तावडतोब मेनाडो सोडण्याचे ठरवले. बंडखोरांच्या लष्करी आज्ञा सुटल्या–

" परकीय असतील त्यांनी मेनाडोमधून चालते व्हावे—"

मेनाडोमधील शंभर–सव्वाशे गोरे डच निघाले. त्यांच्याबरोबर माविस–बार्बारांची पण वर्णी लागली. मागे राहिले ते तीस अमेरिकन मिशनरी व काही रोमन कॅथॉलिक नर्न्स !! सेवेचे व्रत त्यांना तेथून हलू देत नव्हते.

१२ मार्च १९५८ ला माविस–बार्बारांना घेऊन डच जहाज सुटले. जहाजाचे नाव होते " कालवाही. "

[ अपूर्ण ]

**रा. म. शास्त्री**


**परसूच्या पशुकथा** — वसंत सबनीस

**सहा साहसे** — दा. सी. देसाई

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.**

रंगभूमी

# रसिक कुलाने सादर केलेल्या तीन एकांकिका

तीन वेगळ्या प्रकृतींच्या प्रयोगशील एकांकिका ' रसिक कुला'तर्फे नुकत्याच सादर करण्यात आल्या. ज्या प्रकारच्या कार्यक्रमांची अपेक्षा या मंडळींकडून होती, ती पूर्ण होईल अशा पद्धतीनेच एकांकिकांची निवड करण्यात आली होती.

## ● डिक्टेटर

सर्वप्रथम श्री. अनंत काणेकर यांची ' डिक्टेक्टर ' ही एकांकिका करण्यात आली. संपूर्ण एकांकिकेमध्ये प्रत्यक्ष नावाचा उल्लेख कोठेही नसला, तरी डिक्टेटरच्या तोंडून निघणारे संवाद ' डिक्टेटर ' म्हणून लेखकास कोण अभिप्रेत आहे, याची स्पष्ट कल्पना देतात. सर्वसत्ताधीश झाल्यावर ' हिटलर 'कडून जनतेची जी मुस्कटदाबी झाली, त्याचे प्रतीक प्रोफेसर ग्रेगॉर माल्झिअसच्या रूपाने पाहावयास मिळते. माल्झिअससारख्या मान्यवर शास्त्रज्ञाकडून हिटलरच्या शुद्धिवादाचे राजकारणावर शिक्कामोर्तब मिळवण्याचा व या मोहिमेस शास्त्रीय आधार निर्माण करून देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. माल्झिअस केवळ नकार देऊन न थांबता डिक्टेटरची सहेतुक निर्भत्सना करतो. सर्वसत्ताधीशांकडून विरोधकांचा काटा ज्या पद्धतीने, काढण्यात येतो, त्याच मार्गाने माल्झिअस व त्यांचे तरुण अनुयायी यांची अडगळ दूर करण्यात येते.

दिग्दर्शक श्री. माधव वझे यांनी एकांकिकेवर बरीच मेहनत घेतल्याचे जाणवत होते. माल्झिअसची महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी माल्झिअसची व्यथा समजावून घेऊन केली. मात्र संवाद म्हणत असताना कळत नकळत त्यांच्या हातून एका मान्यवर साहित्यिकाची नक्कल होत होती.

डिक्टेटरचा सेनापती क्रूरकर्मा खरा, परंतु शरश्चंद्र—कलावंतांचा सेनापती—बाल कथांतील "जादूगार राक्षसाप्रमाणे" वाटला. भयाण गडगडाटी हास्य करण्याची त्यांना

काही गरज नव्हती. डिक्टेटरच्या प्रत्यक्ष आगमनापूर्वी संवादांतून व वातावरणातून त्याचे वेगळे व्यक्तिमत्त्व निर्माण करण्यात आले आहे. परंतु प्रक्षकांच्या मनश्चक्षूं-समोर निर्माण् झालेला डिक्टेटर व रंगभूमीवर विजय देव यांनी उभा केलेला डिक्टेटर यांत फारच तफावत आढळून आली. अन्य सैनिक मंडळी ठीक आहेत.

या एकांकिकेच्या यशामध्ये तांत्रिक अंगांचा व पार्श्वसंगीताचा वाटा मोठा आहे. श्री. आनंद पै यांनी सूचक रंगमंच उभा केला आहे. क्रांतीची कल्पना स्पष्ट कर-णारे पडदे व माल्झिअस, सेनापती, माल्झिअसचे शिष्यगण व नागरिक यांच्यासाठी वेगळ्या पातळीचा (Different Levels) उपयोग त्यांनी चांगल्या प्रकारे साधला आहे. 'गॉज' मधील फ्लॅश-बॅक अत्यंत यशस्वी झाला आहे. कॉन्टिनेन्टल संगीत सुयोग्य रीतीने वापरल्याने एकांकिकेचे यश उंचावले आहे.

● **गणूचा सदरा**

डिक्टेटरच्या पार्श्वभूमीवर डॉ. श्रीराम लागू यांचा 'गणूचा सदरा' ही एकां-किका सादर करण्यात आली 'शोकान्ती फॉर्स' गटामध्ये या एकांकिकेची गणना केल्यास वावगे ठरणार नाही. या एकांकिकेस दिग्दर्शकांनी ट्रीटमेन्ट चांगली देऊनही निमंत्रित सुजाण प्रेक्षकांना अर्थबोध होऊ शकला नाही. शेवटपर्यंत साधा फार्स असल्याच्या कल्पनेने प्रेक्षक दाद देत होते. त्यामुळे अनपेक्षित शेवट कित्येकांना समजू शकला नाही.

उन्हाळ्याचे दिवस आहेत. मध्यमवर्गीयाची खोली आहे. आपापल्यापरीने घरातील मंडळी उन्हाळा हलका करण्याचा प्रयत्न करीत आहेत. कुटुंबप्रमुख गणू येतो. आल्यापासून अस्वस्थ होतो. त्याला उकडते आहे, असे समजून घरातील मंडळी त्याचा उकाडा हलका करण्याचे प्रयत्न करू लागतात. गणू सदरा काढण्याचा हट्ट धरून बसतो. स्वतःच्याने सदरा निघत नाही. भाऊ व मित्र मदत करतात पण उपयोग नाही. पाणी मारून पंख्याच्या साहाय्याने सदरा काढण्याचा प्रयत्न होतो. पण यश नाही. कात्रीने सदरा कापण्याची योजना पुढे येते. आणि सदरा कापणाऱ्या रेणूच्या हातून गणूच्या पाठीचे सालडे निघते.

'गणूचा सदरा' – हे प्रतीकात्मक मानले तर प्रतीक अपुरे वाटते. वैचारिक कल्पनांमुळे सदरा न निघण्याची व्यवहारिक अशक्यता मुळीच पटणारी नाही. सर्व बंधने तोडून टाकण्याचा प्रयत्न गणू जीव तोडून करतो. परंतु त्याची आपली म्हण-वणारी आई, बायको, भाऊ या मंडळींकडून त्यांच्या वेदनांची जाणीव नोंदली जात नाही. त्याचे हाल पाहून या मंडळींना विनोद सुचतात. यामुळे एकटेपणाने ग्रास-लेल्या गणूची व्यथा मात्र प्रेक्षक काही प्रमाणात समजू शकतो. मूळ लेखनातच महत्त्वपूर्ण उणीव असल्याने या एकांकिकेस मिळणारे यशही मर्यादितच. त्या दृष्टीने एक अंजली किबे (रेणू) यांचा अपवाद वगळता श्री वझे व त्यांचे सहकारी मोठ्या प्रमाणांत यशस्वी झाले आहेत.



कधी न थांबणारे सूडाचे 'चक्र': सौ. सुमती गोडबोले (द्रौपदी), सुभाष गोडबोले (भीम)

● **चक्र**

सादर करण्यात आलेल्या तिसऱ्या एकांकिकेमध्ये द्रौपदीची मनोव्यथा आहे व आपला वंश चालवण्यास आपल्या वर्णाचे, आपल्या रक्ताचे आपल्यामागे कोणी नाही, या जाणिवेने द्रौपदी अस्वस्थ आहे. आतापर्यंत दाबून ठेवलेली ही व्यथा पांडवांच्या महाप्रयाणाच्या वेळी उफाळून वर येते आहे. भीमाला असंख्य प्रश्न विचारून द्रौपदी उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करते. 'सूडा'च्या समाधानाची विचित्र आकांक्षा सतत बाळगत आल्याने निर्वंश ओढवल्याचे द्रौपदीला जाणवते. तिच्या मुलांवर, शस्त्र चालवणाऱ्या अश्वत्थाम्याला भेटण्यास ती उत्सुक आहे. अश्वत्थामाही येतो. द्रुपद व द्रोणाचार्य यांच्यापासून सुटलेले सूडाचे दुष्ट चक्र थांबवण्याच्या हेतूने द्रौपदी अश्वत्थाम्याच्या जखमेवर तेल लावून एक मानसिक समाधान मिळवते. एकांकिकेचे लेखक प्रा. विद्याधर पुंडलिक यांनी अत्यंत प्रभावी संवादांतून कथाविषय सुस्पष्ट केला आहे.

दिग्दर्शक श्री. राजा नातू यांनी भरपूर परिश्रम घेऊन द्रौपदीची व्यथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली आहे. सुभाष गोडबोले (भीम), सौ. गोडबोले (द्रौपदी) व अरविंद साने (अश्वत्थामा) या कलावंतांनी आपल्या भूमिकेशी प्रामाणिकपणा राखला आहे. सुसंगत पार्श्व-संगीताचा वापर करून एकांकिकेच्या काळाशी एकात्मता साधली आहे.

या तीन एकांकिकांचा आस्वाद म्हणजे एक वेगळाच आनंद ही गोष्ट खरी. परंतु गंभीर प्रवृत्तीच्या तीन एकांकिका सलग सादर करण्यात आल्याने रसिक व व सुजाण प्रेक्षकही कंटाळतो, याची नोंद 'रसिक–कुलाने घ्यावी एवढीच अपेक्षा.

— शरद गोखले

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ माओ वाण्याची कथा

गेले वरेच दिवस अस्मादिक ऑम्लेट करायला शिकत आहेत – पण बेटे जमतच नाही. ऑम्लेट कसे करावे या विषयावर एकही अधिकृत व संपूर्ण ग्रंथ उपलब्ध नाही, त्यामुळे इतर अनेक वर्गांनी हे गुप्त ज्ञान संपादन करण्याचा भगीरथ प्रयत्न केला. अखेर 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता हेअर–ऑईलही गळे' या न्यायाला अनुसरून ऑम्लेट करायला शिकण्याचा एकमेव मार्ग सापडला आहे– अन् तो म्हणजे माओच्या तत्त्वज्ञानाचे अध्ययन करणे. थट्टा नाही ! माओवादाचा सखोल अभ्यास केल्याशिवाय ऑम्लेटच काय, हाफ्–फ्राय करणेदेखील शक्य नाही. हे विधान मी राजी–खुशीने, अक्कल हुशारीने व नशापाणी न करता करीत आहे. कारण, माओवादाचा अभ्यास केला तरच पिंगपाँग खेळता येते आणि माओवादाचे अध्ययन केले तरच मोटार चालविता येते, असे त्या 'लोकांच्या लोकशाही'त आधीच जाहीर झाले आहे, अन् आता माओवादाचे सम्यक् ज्ञान झाले तरच फळांची निगा राखता येते, असाही शोध तेथे लागला आहे; तेव्हा या सगळ्या गोष्टींना आवश्यक असणारा माओवाद ऑम्लेट करायलाही आवश्यक असणे अपरिहार्य आहे, हे सूज्ञांस सांगणे नलगे.

परवाच वर्तमानपत्रांत वाचले, चीनमध्ये चेंगटू नावाच्या गावात एका वाण्याला प्रश्न पडला होता – काही फळे टिकविण्यासाठी त्यांच्यावर साखरेचा लेप लावलेला असतो तो चिघळू न देण्यासाठी काय करावे ? उत्तरे मिळाले – माओच्या तत्त्वज्ञानाचा वापर करावा ! माओच्या तत्त्वज्ञानाची मदत घेतल्यामुळे हा वाणी आपला प्रश्न सोडवू शकला, असे चक्क छापून आले आहे. आता सांगा मी म्हणतो त्यात काय खोटे आहे ?

हिंदुस्थानात साधू वाण्याची कथा ऐकायला मिळते, पण त्याची जहाजे वादळात सापडली, तेव्हा त्याला सत्यनारायणाचा धावा करावा लागला. माओ वाण्याची कथा निराळी आहे. त्याने साम्ययोगवसिष्ठाचे दोनशे त्रेपन्नावे पान उघडले की पहिल्याच परिच्छेदात सगळी माहिती मिळते – आंतरराष्ट्रीय क्रांतीचे आणि

गनिमी काव्याचे तंत्र वापरले की साखर चिघळायची ताबडतोब थांबते. आता साम्यवाद व साखर यांच्या मिश्रणाने कोणते रासायनिक द्रव्य तयार होते, हे साध्या शास्त्रज्ञाला कळायचे नाही, नुसत्या साम्यवाद्यालाही कळायचे नाही. त्यासाठी साम्यवादी शास्त्रज्ञच हवा, अन् तोही माओ-मेयडने शिकलेला. पण मी साम्यवादी किंवा शास्त्रज्ञ किंवा साम्यवादी शास्त्रज्ञ नसतानाही एवढे निश्चित सांगू शकतो की माणसाचे रक्त गोठविणाऱ्या माओवादात साखर गोठविण्याचेही सामर्थ्य आहे. नाही तर 'वाण्यांचा वाणी' जो माओ त्याच्या तत्त्वज्ञानात चेंगटूच्या त्या वाण्याला आपल्या प्रश्नाचे उत्तर चुटकीसरसे कसे सापडले असते?

म्हणूनच माझी खात्री पटली आहे की ऑम्लेट करायला शिकायचे असेल तर माओ-टेक्निकने अंडे फोडले पाहिजे, गायला शिकायचे असेल तर माओवादाचा सूर ओळखता आला पाहिजे, टायपिंग शिकायचे असेल तर माओवाद हीच यशाची गुरुकिल्ली, अन् गुळगुळीत दाढी करण्याचे दुर्धर तंत्र हस्तगत करायचे असेल तर माओवाद हाच अन्सेफ्टी रेझर.

## ☐ परमेश्वराने घेतलेली कॅज्युअल लीव्ह

महाराष्ट्रातल्या छोट्या छोट्या जिल्हा पत्रांत अमुक खेड्यात एका गाईला दोन डोक्याचे वासरू झाले, किंवा अमुक गावात दत्ताची पावले उमटली, अशा बातम्या वरचेवर वाचायला मिळतात, — कारण, परमेश्वराची लीला आणि संपादकाची कल्पकता या दोन्ही सारख्याच अगाध असतात. पण परवा थेट इंग्लंडहून आलेली बातमी आपल्याकडच्या सुपीक संपादकीय डोक्यालाही नमवील अशी आहे. ती म्हणजे एका माणसाने एक बदक पाळले आहे. त्याला म्हणे पोहताच येत नाही! पाण्यात शिरले की ते गटांगळ्या खाऊ लागते अन् त्याचा मालक त्याला बाहेर काढतो. म्हणजे आता कहर झाला. हे बदक देवाने घडविले तेव्हा त्याचा स्विमिंग इन्स्ट्रक्टर जन्मात प्रथमच कॅज्युअलवर गेला होता की काय? पुढाऱ्याच्या जन्माला घालावे अन् भाषणबाजी शिकवू नये, कवीच्या जन्माला घालावे अन् शब्दगाम्भीर्य शिकवू नये, गवळ्याच्या जन्माला घालावे अन् नीर-क्षीर-अविवेक शिकवू नये, कॉलेज-युवकाच्या जन्माला घालावे अन् शिटीवर फिल्मी प्रेमगीत वाजवायला शिकवू नये, मंत्र्याच्या जन्माला घालावे अन् तोंड भरून आश्वासन द्यायला शिकवू नये त्यांतलाच हा प्रकार झाला. असा एखादा पुढारी केवळ भाषण करता येत नाही म्हणून कृती करायचा, असा एखादा दुर्दैवी कवी केवळ शब्दसृष्टीचा भिकारी ठरून चतकोर कवितेनंतर पेन्शनीत निघायचा अन् असा एखादा नतद्रष्ट मंत्री तर चक्क आपला शब्द खरा करून दाखवायचा. हर, हर? कोण अनवस्था प्रसंग ओढवेल, असे घडले तर!

# केवल – मनोज जोडीची अजोड कामगिरी

" सार्वजनिक सुरक्षितता आणि व्यापार विधेयकाविरुद्ध आवाज उठविणे, त्याकडे जनतेचे लक्ष वेधणे हाच आमचा हेतू होता. कोणाची हत्या करण्याचे आमच्या मनातही नव्हते. त्याकरिता आम्ही सेंट्रल असेंब्लीत बाँब फेकला नाही. बाँब त्यासाठी बनविलाच नव्हता, " असे निवेदन करून तो तरुण आरोपी ओरडला, ' इन्कलाब. ' सहकाऱ्याने जवाब दिला, ' जिंदाबाद.' पुन्हा तो तरुण ओरडला, ' इन्कलाब ', पुन्हा साथी उत्तरला : ' जिंदाबाद. '

हळूहळू न्यायालयाचे अवघे सभागृह एकाच घोषणेने दुमदुमून गेले. कोर्टाचे ऑर्डर ऑर्डरचे ठोके कोठल्या कोठे विरले. सर्व प्रेक्षकही स्वातंत्र्याच्या या जयघोषात सामील झाले.

तरुण आरोपी होते, वीर भगतसिंग व राजगुरू. खटला चालला होता दिल्लीमध्ये एका ब्रिटिश न्यायाधीशापुढे. हा प्रसंग आहे ' शहीद ' या चित्रपटातला.

आणि फक्त न्यायालयच का ? अवघा देशच स्वातंत्र्याच्या जयघोषात बेभान झाला होता. सायमन कमिशनविरुद्ध जोमाने लढणाऱ्या लाला लजपतरायांनी देशभर असंतोषाची आग भडकवली होती आणि भगतसिंगांसारखे क्रांतिवीर त्याचा स्फोट उडवून देत होते.

निर्माते केवल कश्यप यांनी या चित्रपटाने क्रांतिलढ्याचे ते पर्वच साक्षात पडद्यावर साकार केले आहे. मागे प्रेरणा आहे मनोजकुमार या नामवंत नटाची. शौर्य, त्याग आणि अमर्याद झगडा यांची कहाणी म्हणजे भगतसिंगांचे जीवन. मनात हेच जीवनचरित्र केवल-मनोज या जोडीने आपल्या चित्रपटासाठी निवडले. भगतसिंगांच्या देशप्रेमाची, स्वातंत्र्येच्छेची ज्योत बालवयातच कशी पेटते येथपासून सुरुवात करून, चित्रपटाचा आवाका एकदम सबंध क्रांतिलढ्यालाच व्यापून टाकेल एवढा मोठा केला आहे. चंद्रशेखर आझाद यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या क्रांतिकार्यात सामील होण्याचा भगतसिंगांचा निर्णय होतो. आणि चित्रपटाला एकदम धार येते. नाट्य जिवंत रूप धरू लागते. भगतसिंग जरी चंद्रशेखरांचे नेतृत्व मानूनच कार्य करीत राहिले तरी सेंट्रल असेंब्लीत बाँब टाकण्याच्या त्यांच्या कृत्याने चंद्रशेखराच्या कार्याकडे अवघ्या देशाचे लक्ष जाते, जनताजागृतीच्या कार्याला मदत होते. या बाँबस्फोटाने देशभर संतापाची लाट उसळते हे खरे; पण त्याने भगतसिंग आणि सर्व सहकाऱ्यांचा फार मोठा देशव्यापी कट उघडकीस येतो.



शृंखलांच्या या गुंफिल्या रत्नमाला

येथपर्यंत चित्रपटाचा मुख्य विषय क्रांतिलढ्यातील चंद्रशेखर–भगतसिंगांचे पर्व हाच असतो. यानंतर पुन्हा चित्रपट केंद्रित होतो. भगतसिंगांच्या तुरुंगातील धीरोदात्त वर्तनावर माफीचा साक्षीदार बनविण्यासाठी तुरुंगाधिकाऱ्यांनी केलेल्या अतोनात छळाला दाद न देता, उलट आपल्या सहकाऱ्यांना खाण्यास चांगले अन्न देत नाहीत म्हणून तुरुंगात ते ५२ दिवसांचे उपोषण सुरू करतात.

भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना फाशीची शिक्षा होते. इतर साथीदारांना वेगवेगळ्या शिक्षा सांगितल्या जातात. आणि चित्रपट पुन्हा गती घेतो. आपल्या पुत्राची शेवटची भेटही न मिळाल्याने दुःखी अंतःकरणाने घरी परतलेल्या भगतसिंगांच्या मातेप्रमाणे आपणही शोकमग्नावस्थेत घरी परतेपर्यंत गती कायम राहते.

## शाळेतील रंगमंचावर

चरित्र–कथेवरील चित्रपट हिंदी निर्मात्याच्या हाती आला म्हणजे नायकाच्या चरित्राचे धिंडवडे काढण्याचा त्याला तो परवाना दिल्यासारखेच होते. अशा वेळी संत ज्ञानेश्वरही प्रेमगीते गाऊ लागतात. पण केवल कश्यप अपवाद ठरले आहेत. हा महत्त्वाकांक्षी निर्माता धंद्यापेक्षा भावनेला, कलेला, इमानाला अधिक किंमत देतो. आणि पुन्हा भगतसिंगांचे जीवन तर त्यांनी आपल्या हयातभर मनाशी पूजलेले. कॉलेजात असल्यापासूनचा मनाचा निर्धार हा की, भगतसिंगांचे जीवन पडद्यावर

साकार करावयाचे.

मनोजकुमार व केवल कश्यप दिल्लीच्या कॉलेजात शिकत होते त्या वेळचा काळ १९४९–५० सालचा असेल. स्वातंत्र्य मिळाले होते. स्वातंत्र्यासाठी द्यावी लागलेली किंमत मनात ताजी होती. नव्याने कॉलेजात आलेली ही दोन मुले. त्यांना साधने कसली आणि सुविधा काय असणार ? बांबूचा रंगमंच आणि चादरीचे पडदे बनले. मनोजने लिहिलेले भगतसिंगांचे क्रांतिनाट्य. प्रयोग सुरू होऊन पडदा वर गेला. भगतसिंगांची भूमिका मनोजकडेच. तो रंगभूमीवर आला. समोर पाहतो तो केवल व आपले दोस्तच बसलेले. शूर वीराचा चेहरा चढवून आलेल्या या गड्याची गाळण उडाली. तो आत पळून गेला.

नाटक फसले पण जिद्द कायम राहिली. भगतसिंगांचे नाट्यजीवन मनातच घुमत राहिले.

मनोज व केवल १९५५ साली मुंबईला आले व चित्रपटसृष्टीत शिरले. मनोज सिनेमात कामे करू लागला. केवलचे इतर उद्योग सुरू झाले. संध्याकाळी फोर्ट भागात कोठेतरी बैठकी होत. जुन्या आठवणी निघत. हळूहळू दिवस बरे येत होते. पुन्हा दोघांच्या मनाने उचल घेतली. आता साधने होती. सुविधा जमविता येणार होत्या.

## अमाप कष्ट

भगतसिंगांचे जीवन म्हणजे सामान्य विषय नव्हता. अनेक अडचणी होत्या. महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच विषयावरील पहिले दोन चित्रपट फसले होते. [ प्रेमदेवाची प्रमुख भूमिका असलेला 'भगतसिंग' व 'शम्मीकपूर' ची शहीद भगतसिंग. हा दुसरा चित्रपट तयार होऊन बरेच दिवस पडून होता व तो 'शहीद' आधीच काही महिने लागला आणि लोकांना कळण्यापूर्वीच निघूनही गेला. ] प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यावर या अडचणी अधिकच तीव्रतेने जाणवू लागल्या. आधीच्या दोन्ही चित्रपटांची गत माहिती असल्याने भगतसिंगांच्या जीवनाशी संबंधित अशा लोकांनी या योजनेकडेही काहीसे आशंकेनेच पाहिले. मनोज व केवल यांच्याजवळ जिद्द होती, निर्धार होता. भगतसिंगांचे खरे जीवनचरित्र उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी के. पी. के मूव्हिजचा संशोधन विभाग स्थापन केला. याचे नेतृत्व होते मनोजकुमारकडे. दिवसा प्रणयवीराच्या भूमिका करणारा हा नट रात्री भगतसिंगांचे चरित्र संशोधिण्यात गुंतून जायचा. 'फूलों की सेज' चे मद्रासला चित्रण चालू होते. दिवसभर माला सिन्हाबरोबर वावरल्यावर मनोजकुमार रात्री 'हिंदू' या दैनिकाच्या कचेरीत जात व पुन्हा फायली चाळून बरोबर तारखा शोधून काढत. 'दिवसभर शूटींग केल्यावर रात्री एकेक वाजेपर्यंत तो असे कितीतरी वेळा बसल्याचे मला स्मरते,' केवल कश्यप आता मोठ्या अभिमानाने सांगतात. भगतसिंगां-

सारख्या क्रांतिकारकांचे जीवनचरित्र उपलब्ध असू नये, याचा त्यांना अती खेद होतो. आतासुद्धा ते सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेवर चित्रपट काढायच्या विचारात आहेत. फार मोठी योजना आहे. ' १९६८ पर्यंत नुसते धागे जमविण्यातच काळ जाईल. मग प्रत्यक्ष चित्रपटास आरंभ. ' त्यांनी झटकन कल्पना देऊन टाकली.

भगतसिंगांच्या आई अजून जिवंत आहेत. त्यांनी या कामी अमोल मदत केली. यामुळे चित्रपटात जराही कुठे कल्पनेस वाव राहिला नाही. प्रत्येक दोन रिळे चित्रण पूर्ण झाले की ते आईंना नेऊन दाखविण्यात येई. भगतसिंगांच्या थोरल्या बंधूंनीही चित्रपट प्रकाशित करण्यापूर्वी दोन वेळा पाहिला. चित्रणास प्रारंभ झाला १९६३ च्या सुरुवातीस. तो पूर्ण होण्यास दोन वर्षे लागली. सर्वोच्च न्यायालयात भगतसिंगांची बाजू लढविणारे एक वकील श्री. प्रेमनाथ मेहता यांनीही पटकथा लेखक दीनदयाळ शर्मा यांना वेळोवेळी मदत केली. चित्रपटाचे उद्‌घाटन झाले, तेव्हा मेहतांना मुद्दाम बोलावले होते. चित्रपट त्यांनी पाहिला. आणि शर्मांना मिठी मारून ते गदगदून म्हणाले, " मुला, तू काय कामगिरी बजावली आहेस हे या पिढीला कळणार नाही रे. तू एक अजोड असे काम करून ठेवले आहेस. "

## भरघोस यश

खरोखरच ' शहीद ' म्हणजे चित्रमय इतिहास आहे. तो निर्माण करण्यास केवल-मनोज आणि त्यांच्या सर्व तरुण साथीदारांनी अमाप कष्ट घेतले आहेत. असंख्य अडचणी पार केल्या आहेत. कर्त्यांच्या मागे भाग्य उभे राहते तसेच या चित्रपटाचे झाले. भारताच्या आजपर्यंतच्या तीनही पंतप्रधानांची संगत त्याला लाभली. चित्रपट तयार करण्याच्या प्रारंभीच उपस्थित राहून नेहरूंनी या तरुण पथकाला प्रोत्साहन दिले. शास्त्रीजींनी चित्रपटाचे दिल्लीच्या थिएटरमध्ये उद्‌घाटनप्रसंगी निर्मात्यांचे तोंडभरून कौतुक केले व श्रीमती इंदिरा गांधींनी चित्रपटास सरकारची तीन पारितोषिके देऊन गुणगौरव केला. ' शहीद ' ला १९६५ चे ' सर्वोत्तम हिंदी चित्र ' (राष्ट्रीय ऐक्य विभाग); १९६५ ची ' सर्वोत्तम कथा ' आणि १९६५ चे ' सर्वोत्तम हिंदी चित्र ' अशी राष्ट्राध्यक्षांची तीन पारितोषिके मिळाली. सर्वोत्तम हिंदी चित्राबद्दल केवल कश्यप यांना ५००० रु. मिळाले. त्यांपैकी २००० रु. त्यांनी लगेच भगतसिंगांच्या मातोश्रींना दिले. " ती माउली तर या सर्वच काळात भारावून गेली होती. तिला पुनःप्रत्ययाचा आनंद मिळत होता. पुत्रवियोगाची वेदना पुन्हा तीव्रतेने डाचत होती, " असे कश्यप सांगतात.

माजी पंतप्रधान शास्त्रीजींनी चित्रपट प्रदर्शनाच्या वेळी मनोज व कश्यप यांचे मुद्दाम कौतुक केले. त्यांनी भगतसिंगांचे जीवन जवळून पाहिले होते. या जोडीने काय श्रमांनी ते जसेच्या तसे उभे केले आहे हे शास्त्रीजींना जाणवले.

चित्रपट आता सबंध भारतभर लागून गेला आहे. उत्तर भारतात तो १९६५ मध्येच लागला. मुंबईला आताआतापर्यंत तो 'कृष्ण' सिनेमात झकास चालला होता. पुण्यालाही 'श्रीकृष्ण' मध्ये गर्दी खेचत आहे. आणि केवल व त्यांच्या पथकास याचेच विशेष वाटते. या पिक्चरची जाहिरात अशी केलीच नाही असे जाहिरातदारांचे म्हणणे आहे. पण के. पी. कें. चा भारतीय जनतेवर भरंवसा आहे. चांगल्या कामाची जनतेला किंमत आहे, असे त्यांना वाटते व त्यांचा भरंवसा खरोखरच खरा ठरला आहे.

चित्रपटाचे कलागुण ठरवायचे तर तो कोणत्या वर्गात जास्त लोकप्रिय आहे हे पाहिले पाहिजे. 'शहीद' जेथे जेथे लागला तेथे तेथे २ किंवा २।। रुपयांची तिकिटे आधी खपली आणि मगच लोक १ रु. किंवा १।। रु.च्या तिकिटांकडे वळले असे सांगून केवल कश्यप म्हणतात. 'कोण म्हणतो वरच्या वर्गात देशप्रीती दिसत नाही ? माझ्या पिक्चरला याच वर्गाने खरी दाद दिली आहे.'

बुद्धिमान वरच्या वर्गास पटावे, हृदयात खोलवर कोठे जाऊन बसावे असेच 'शहीद' हे चित्र झाले आहे. एक विख्यात चित्रपटसमीक्षक हा चित्रपट पाहून आला. त्याला लगेच समीक्षण लिहावयाचे होते. पहिले वाक्यच त्याने असे लिहिले की 'हा चित्रपट पाहताना मी चित्रपटसमीक्षक आहे हेच विसरून गेलो.' कोणत्याही बुद्धिमान माणसाला हे मान्य व्हावे.

## वैशिष्टये

खरे तर पाहून अनुभवावा असा हा चित्रपट. तरी वैशिष्टये सांगायचीच तर—

★ मनोज (भगतसिंग), कामिनी कौशल (आई), चोप्रा (सुखदेव), शैलेशकुमार (राजगुरू), करण दिवाण (भगवती चरण), निरुपा रॉय (भगवती चरण यांची पत्नी) आदींची मन लावून केलेली कामे.

★ एस. राम शर्मा यांनी बॉक्स ऑफीसशी जराही तडजोड न ठेवता केलेले सरळ दिग्दर्शन. दीनदयाळ शर्मा यांची वेधक पटकथा व उत्कंठापूर्ण संवाद.

★ आणि प्रेम धवन यांची स्फूर्तिप्रद गीते व खास पंजाबी ढंगाचे कथेला अनुकूल असे संगीत.

— ही सांगता येतील.

या सर्व चौकटीत बसणारा हा चित्रपट नव्हे. ही त्याची पूरक अंगे आहेत. खरी वेदना आहे, कथेमध्ये, भगतसिंगाच्या जीवनामध्ये. अद्भुत असे हे जीवन वरील चौकटीतून कल्पनेचा आविष्कार घेते व हृदयाला जाऊन भिडते, मंत्रमुग्ध करून सोडते. ■

# एक 'सायोनारा'

'सायोनारा' म्हणजे गुडबाय्. 'लव इन टोकियो' एक सायोनाराच आहे. वेगळ्या अर्थाने. कथावस्तू, कला, अभिनय यांना सायोनारा करणारा हा चित्रपट.

या चित्रपटाला कथा अशी नाहीच, दिग्दर्शक श्री. प्रमोद चक्रवर्तींचा उद्देश नयनरम्य टोकियो शहराची अंगप्रत्यंगे दाखवणे हा. यापूर्वी 'संगम'मध्ये एक नव्हे तर ३–४ पाश्चात्य शहरांचे चित्रण होते. परंतु ते तेथे आले होते पार्श्वभूमी म्हणून. 'लव इन टोकियो'च्या बाबतीत मात्र सारा उफराटा प्रकार आहे. येथे महत्त्व आहे ते पार्श्वभूमीचेच. त्यामुळे या चित्राचा नायक बनले आहे एक शहर–टोकियो. मग त्यात सारे काही येतं. विमानतळ, उद्याने, प्रशस्त रस्ते, नृत्यगृह, गैशागृह, दुकाने सगळ्यांचा समावेश आहे. अगदी स्टेडियमचासुद्धा! सबंध चित्रपटच टोकियोने व्यापून टाकला आहे. त्यामुळे सारी पात्रे पार झाकाळून गेली आहेत. या चित्रपटामुळे एका इंग्रजी चित्रपटाची आठवण झाली, 'माय गैशा' हा तो चित्रपट जपानमधेच चित्रीत केलेला. परंतु समर्थ कथा असलेला. शर्ले मॅक्लिनची गैशाची भूमिका चिरकाल स्मरणात राहावी असा.

चित्रपटाची कथा काय सांगायची? उठसूट सर्व पात्रे जपानला चक्कर टाकून येतात. नायक जपानला जातो पुतण्याला आणायला, नायिका असते जपानमध्येच. दोघांची भेट होते आणि मग 'लव इन टोकियो!' सुरू होते. जॉय मुकर्जी आहे नायक. त्याचा चेहरा अभियनशून्य आहे, आनंद होवो वा दुःख त्याच्या चेहऱ्यावरील भाव सारखाच. नायिका आशा पारेख ही आहे जातिवंत नृत्यांगना. तिचे एक नृत्य या चित्रपटात आहे तेथे तिचे कसब दिसते. नायकापेक्षा तिचा अभिनय खात्रीने जास्त उजवा आहे.

### बोलकी सिगारेट

या मुख्य नटांपेक्षा चांगली कामे केली आहेत ती प्राण आणि मेहमूद या नटांनी. हे दोघे गुणी कलावंत आहेत. प्राणच्या बारीक सारीक अभिनयातूनही त्याचा खलनायक दिसत असतो. प्राणपेक्षा त्याची सिगरेटच अधिक बोलकी आहे. सिगरेट

ओढण्याची त्याची पद्धत आणि त्यावरील राख फुंकून टाकतानाची बेफिकीर वृत्ती खलनायकाचा वखवखणारा स्वभाव दाखवते. प्राणला या चित्रपटात काम आहे थोडेसेच. परंतु त्यातदेखील त्याची सफाई आणि इतर नटांपासूनचा वेगळेपणा जाणवतो. मेहमूदचा अभिनयही असाच वाखाणण्यासारखा, परंतु प्राण आणि मेहमूद यांच्यांत एक महत्त्वाचा फरक आहे. दिग्दर्शक–मग तो कोणीही असो–प्राण त्याला बळी पडत नाही. त्याचा अभिनयाचा दर्जा तो कायम राखतो, मेहमूद मात्र दिग्दर्शकाच्या आज्ञेनुसार वाटेल तशा वेडयावाकडया उडया मारतो. मेहमूद खरा आहे बहुरुप्या, नकलाकार. या चित्रपटात त्याने दिलीपकुमार आणि राजकपूर यांची फार चांगली नक्कल केली आहे. दिलीपकुमारमधला परंपरागत प्रियकर आणि राजकपूरमधील बालभाव त्याने अचूक पकडला आहे. गैशाचे सोंगही मेहमूद चांगले वठवतो. आपल्या दिग्दर्शकांनी मेहमूदचा चांगला उपयोग करून घ्यायला हवा असं राहून राहून वाटतं.

चित्रपट पाहून चित्रनिर्माता आणि दिग्दर्शक यांची कीव येते. प्रभावी कथा नाही, या आपल्या दुर्बलतेवर पांघरूण घालण्यासाठी एका पाश्चात्यरूप धारण केलेल्या पौर्वात्य शहराचे माहितीपटवजा चित्रण त्यांना दाखवावे लागले. चित्रपटाची जाहिरातही 'जपानध्ये चित्रित केलेला पहिला भारतीय चित्रपट' अशीच करण्यात आली आहे. 'टोकियोचे फार चांगले दर्शन' असा नामवंत (म्हणविणाऱ्या) सिने–टीकाकारांनी या चित्रपटाचा उदोउदोही केला. बिचारा भारतीय प्रेक्षक तीन–तीन पिढ्या आपले जन्मग्राम सोडून जात नाही, याचा फायदा घेऊन त्याला एक पाश्चात्य (!) शहर दाखवायचे असेल तर मग कथा, अभिनय यांचा खटाटोप कशाला? सरळ एक माहितीपट काढावा.

शंकर–जयकिशन हे नाव आता सुविख्यात झाले आहे. 'लव इन टोकियो'ला संगीत देताना त्यांनी काही ठिकाणी जेम्स बाँड पद्धतीच्या चित्रपटातील संगीताचे काही 'पीसेस्' जसेच्या तसेच वापरले आहेत. दिग्दर्शकांनीही एका पाश्चात्य चित्रपटातील छोटीशी कल्पना उचलून तिचा विचका केला. 'दि ॲबसेण्ट माइन्डेड प्रोफेसर' या चित्रपटात एक प्रकारचा चिकट द्राव पायाला लागल्याने माणूस उडू लागतो. इथे तीच कल्पना वापरली आहे. मूळ इंग्रजी चित्रपटात ही कल्पना, हाच विषय आहे. परंतु 'लव इन टोकियो'त काही कारण नसताना ती घुसडली आहे. चिकट द्राव पायाला चिकटल्याने मेहमूद उंच उडतो आणि त्या निमित्ताने पुन्हा टोकियोचे दर्शन घडवून आणले आहे, असो. यातील जी जेमतेम नावापुरती कथा आहे ती वगळली तर जपान सरकारच्या प्रवासी खात्याने 'गाईड टु टोकियो' म्हणून हा चित्रपट खुशाल दाखवावा.

• • •

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

२० ऑगस्ट १९६६

# कर्क डगलस

लेखक : अशोक प्रभाकर आंग्रे

वास्तववादी व जिवंत अभिनय करणारे कलावंत हॉलिवुडमध्ये अनेक आहेत. परंतु वर्षानुवर्षे सलगपणे लोकप्रियता कायम टिकविणारे जे काही मोजके अभिनयपटू कलावंत आहेत त्यांत कर्क डग्लसचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. गेली २२ वर्षे हा कलावंत चित्रपटसृष्टीत मोठ्या दिमाखाने वावरत आहे. त्याच्या प्रत्येक नवीन चित्रपटागणिक त्याच्या यशात मानाचा तुरा खोवला जात आहे. "दि स्ट्रेंज लव्ह ऑफ मार्था आयव्हर्स" या आपल्या पहिल्याच चित्रपटामुळे त्याने अनेक निर्मात्यांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेतले. त्यानंतर चॅम्पीयन, दि बॅड अॅन्ड दि ब्यूटिफुल, युलिसिस, २०,००० लीग्ज् अंडर दि सी, लस्ट फॉर लाईफ, दि व्हायकिंग्ज्, स्पार्टाकस वगैरे अनेक गाजलेल्या चित्रपटांत त्याने भूमिका केल्या. कर्कची महत्त्वाची भूमिका असलेला "Cast A giant shadow" हा चित्रपट नुकताच प्रकाशित झाला. या चित्रपटात फ्रँक सिनात्रा, युल ब्रॅनर, अँगी डिकन्सन हे कलाकार त्याच्याबरोबर काम करीत आहेत.

आज अत्यंत यशस्वी ठरलेल्या कर्क डग्लसचे बालपण मात्र कष्टप्रदच गेले. स्वातंत्र्याच्या भोक्त्या असलेल्या रशियाहून अमेरिकेत झालेल्या हॅरि व ब्रायना डेमस्काय या जोडप्याचा कर्क डग्लस हा पहिला मुलगा. ॲम्स्टरडॅम, न्यूयॉर्क येथे त्याचा जन्म झाला. त्याच्या पाठीवर सहा बहिणी जन्मल्या. मोठे कुटुंब असल्याने वडिलांच्या तुटपुंज्या अर्थप्राप्तीत सर्वच गरजा अर्थातच भागत नव्हत्या. अन्नाची, पैशाची नेहमीच चणचण भासे. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी असतानाच कर्कला अर्थोत्पादनाकरिता वृत्तपत्र-विक्रेता म्हणून काम करावे लागले.

त्याचे शालेय शिक्षण चालू असतानाच इंग्रजीचे शिक्षक लुईस लिव्हिंग्स्टन यांनी त्याला नाटचक्षेत्रात आणून सोडले. त्यामुळे आपला फावला वेळ तो अभिनयसाधनेत घालवू लागला. अल्पावधीतच त्याने आपली चुणूक दाखविण्यास सुरुवात केली. वक्तृत्व स्पर्धा, काव्यगायन, वादविवाद व रंगभूमीवरील कार्यक्रम ह्यांत तो प्रकर्षाने चमकू लागला. अभिनयाची गोडी त्याला लागली. शालेय शिक्षण संपविल्यानंतर त्याने ॲम्स्टरडॅम डिपार्टमेंट स्टोअरमध्ये एक वर्ष काम केले. त्या अवधीत शिल्लक टाकलेले १६३ डॉलर्स घेऊन तो न्यूयॉर्कमधील सेंट लॉरेन्स युनिव्हर्सिटीत दाखल झाला. पैसे वाचविण्याकरिता त्याने फर्टिलायझर वाहणाऱ्या ट्रकमधून प्रवास केला. कॉलेजमध्ये अभ्यास करीत असतानाच त्याने वेटरचे अर्धवेळ काम केले व त्याशिवाय व्यायामाकडेही लक्ष पुरविले. रेसलिंगमध्ये तो तीन वर्षे

## कर्क आणि अँगी

*Cast a giant shadow*



विजेता खेळाडू ठरला. अभ्यास व क्रीडाविभागात नैपुण्य संपादन करणारा कर्क विद्यार्थीवर्गात अत्यंत लोकप्रिय ठरला. सेंट लॉरेन्स विद्यार्थी संघ, कॅम्पर, कौन्सिल व दि नॅशनल स्टुडंटस् फेडरेशन ऑफ अमेरिका या संस्थांचा तो अध्यक्ष म्हणून निवडला गेला.

पदवी संपादन केल्यानंतर अभिनय हेच आपले कार्यक्षेत्र असल्याची निष्ठा बाळगणारा कर्क 'अमेरिकन अॅकॅडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट' या संस्थेमध्ये दाखल झाला. त्याला शिष्यवृत्तीही मिळाली. एका छोटयाशा खोलीत तो राहू लागला. व उरलेल्या वेळात एका रेस्टॉरन्टमध्ये अर्धवेळ कामही करू लागला.

१९४२ मध्ये कर्क नेव्हीमध्ये दाखल झाला. नोत्रेडेस येथील 'मिडशिपमेन स्कूल'मध्ये शिक्षण घेतल्यानंतर त्याला कमिशन मिळाले. १९४४ पर्यंत त्याने संदेशवाहक अधिकारी म्हणून काम केले. लेफ्टनंट जे. जी. च्या हुद्यावर असताना त्याने नेव्ही सोडली.

### रंगभूमीने हात दिला

नागरी जीवनात पुनश्च प्रवेश करताच कर्कच्या जीवनालाही चांगलीच कलाटणी मिळाली. "किस अॅन्ड टेल" या नाटकातील प्रमुख भूमिका त्याला मिळाली. तत्पूर्वी हीच भूमिका रिचर्ड विडमार्क हा प्रख्यात अभिनेता करीत होता. त्यामुळे ती यशस्वीपणे पार पाडण्याची मोठी जबाबदारी कर्कवर येऊन पडली. त्याने आपले अभिनयकौशल्य पणाला लावून ही भूमिका साकार करण्याचा प्रयत्न केला आणि ज्या ब्रॉडवे रंगभूमीवर काही वर्षांपूर्वी त्याची नाटके अयशस्वी ठरली होती, त्याच ब्रॉडवे रंगभूमीवर "किस अॅन्ड टेल" था त्याच्या नाटकाने त्याला अभूतपूर्व यश मिळवून दिले. या नाटकात भूमिका करीत असतानाच कर्क रेडिओवर दिवसा होणाऱ्या कार्यक्रमात सातत्याने भाग घेऊ लागला. कर्कचे नशीब फळफळले होते. कारण पूर्वी अयशस्वी ठरलेल्या "अॅलिस इन् आर्म्स" व "ट्रिओ" या नाटकांत कर्कला प्रमुख भूमिका देण्यात येऊन ती पुन्हा रंगभूमीवर सादर करण्यात आली आणि त्यांना चांगलेच यश मिळाले. त्यानंतरचे "दी विंड इज् नाइन्टी" हे त्याचे नाटक त्याच्या जीवनात क्रांती करणारे ठरले. वेन्डेल कॉरे, बर्ट लायटेल व ब्लान्च

युर्का यांच्याबरोबर कर्कने त्यात प्रमुख भूमिका केली. या भूमिकेचे सर्वत्र उत्साहाने स्वागत झाले. कर्कवर स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला. याच नाटकाने कर्कसाठी चित्रपट सृष्टीचा मार्ग खुला करून दिला.

"दी विंड इज् नाइन्टी" या नाटकामुळे प्रसिद्ध निर्माते हॉल वॉलिस यांचे कर्ककडे लक्ष वेधले. कर्क डग्लसबरोबर ॲकॅडमीमध्ये त्याचा सहाध्यायी असलेला लॉरेन बेकॉल हा निर्माते हॉल वॉलिस यांना त्याच्याबद्दल नेहमीच सांगत असे. परंतु वरील नाटकामुळे त्यांना कर्कबद्दल अधिक प्रेम वाटू लागले. या नाटकाचे प्रयोग बंद पडल्यानंतर ब्रॉडवेवर कर्कची भूमिका असलेले कोणतेही नाटक चालू नव्हते. ती संधी साधून कर्क पडद्यावरील चाचणीकरिता हॉलिवुडला गेला. या चाचणीत तो यशस्वी झाला. "दी स्ट्रेंज लव्ह ऑफ मार्था आयव्हर्स" या चित्रपटात बार्बारा स्टॅन्विकबरोबर त्याला प्रमुख भूमिका देण्यात आली. त्यानंतर त्याला आऊट ऑफ दि पास्ट, आय् वॉक अलोन, मोर्निंग बिकम्स्, इलेक्ट्रा, दि वॉल्स् ऑफ जेरिको, माय डिअर सेक्रेटरी व लेटर टु थ्री वाईव्हज् या चित्रपटांत भूमिका करण्याची संधी मिळाली.

कर्कचा अभिनय दिवसेंदिवस अधिकाधिक आकर्षक होऊ लागला. त्याला चांगलीच लोकप्रियता लाभली. निरनिराळ्या निर्मात्यांकडे काम करण्याची संधी मिळू लागली. त्यात स्टॅन्ले क्रॅमरसारख्या मातबर दिग्दर्शकाचे त्याच्याकडे लक्ष गेले. त्यांनी आपल्या "चॅम्पीयन" या चित्रपटात कर्कला प्रमुख भूमिका दिली. याच चित्रपटाकरिता उत्कृष्ट अभिनेता म्हणून ॲकॅडमी ॲवॉर्डकरिता त्याचे नाव सुचविण्यात आले. त्यानंतर "दि बॅड ॲन्ड दि ब्यूटिफुल" व "लस्ट फॉर लाईफ" या चित्रपटांतील त्याच्या भूमिकांकरिताही ॲकॅडमी ॲवॉर्डकरिता त्याचे नाव सुचविण्यात आले होते. "लस्ट फॉर लाईफ" मधील त्याच्या रंगाऱ्याच्या भूमिकेमुळे त्या वर्षाचा उत्कृष्ट अभिनेता म्हणून त्याची निवड न्यूयॉर्क फिल्म क्रिटिक्स्तर्फे करण्यात आली होती.

### कर्क प्रॉडक्शनचे यश

१९५५ च्या सुरुवातीस कर्कने चित्रपटनिर्मिती करण्याचे ठरवून आपल्या आईच्या नावाची "ब्रायना प्रॉडक्शन" चित्रपट संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे त्याने "दि इंडियन फायटर" नावाचा पहिला चित्रपट निर्माण केला. त्यानंतर त्याने जे चित्रपट निर्माण केले त्यांत "पाथ ऑफ ग्लोरी", "दि व्हायकिंग्ज्" व "स्पार्टाकस" हे त्याचे चित्रपट अत्यंत लोकप्रिय ठरेल. "स्पार्टाकस" हा त्याचा अत्यंत महत्त्वाकांक्षी चित्रपट होता. महा जुलमी राज्यकर्त्यांविरुद्ध लढणाऱ्या व स्वातंत्र्याकरिता झगडणाऱ्या गुलामांची कथा त्यात प्रभावीपणे दाखविण्यात आली होती. त्यात स्वत: कर्क डग्लस, जीन सिमन्स, सर लॉरेन्स ऑलिव्हर, चार्लस् लॉटन, पीटर उस्तीनॉव्ह, टोनी कर्टीस यांसारख्या श्रेष्ठ कलाकारांच्या प्रमुख भूमिका

होत्या. या चित्राला अनेक अकॅडमी अॅवॉर्डस् मिळाली. ज्या ज्या ठिकाणी हा चित्रपट प्रदर्शित झाला, त्या त्या ठिकाणी त्याने उत्पन्नाचा उच्चांक गाठला. 'युनिव्हर्सल इंटरनॅशनल' या संस्थेतर्फे हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या संस्थेने १९५९ हे वर्ष 'स्पार्टाकस' वर्ष म्हणून घोषित केले.

वर उल्लेख केलेल्या चित्रपटांशिवाय कर्क डग्लसने यंग मॅन विथ ए हॉर्न, दि बिग कार्निव्हल, डिटेक्टिव्ह स्टोरी, दि बिग ट्रीज्, दि बिग स्काय, दि स्टोरी ऑफ थ्री लव्हज्, दि जग्लर, अॅक्ट ऑफ लव्ह, दि रेसर्स, मॅन विदाऊट ए स्टार, गनफाईट अॅट दि ओ. के. कॉरल, टॉप सीक्रेट अफेअर, लास्ट ट्रेन फ्रॉम गन हिल, दि डेव्हिल्स् डिसायपल, स्ट्रेंजर्स व्हेन वुई मीट, दि लास्ट सन्सेट, टाऊन विदाऊट पिटी, टू विक्स् इन अनदर टाऊन, लोन्ली आर द ब्रेव्ह, फॉर लव्ह ऑर मनी, दि लिस्ट ऑफ आर्डीयन मेसेंजर व सेवन डेज् इन मे या चित्रपटांत भूमिका केल्या आहेत. यांतील बहुसंख्य चित्रपट गाजलेले आहेत. तसेच एकाच संस्थेकडे काम न करता कर्क डग्लसने आर. के. ओ., युनायटेड आर्टिस्टस्, युनिव्हर्सल इंटरनॅशनल, ट्वेन्टीएथ सेंच्युरी फॉक्स्, पॅरामाऊंट, वॉर्नर ब्रदर्स व मेट्रो-गोल्डविन–मेयर या सर्व प्रसिद्ध चित्रपट संस्थांच्या चित्रपटांत काम केले आहे. अशा प्रकारे सर्व प्रमुख चित्रपट संस्थांकडे काम करणारा कर्क डग्लस हा एकमेव अभिनेता आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

चित्रपटसृष्टीत अत्यंत यशस्वी ठरलेला कर्क हा खाजगी जीवनात अतिशय सुखी आहे. आपली प्रथम पत्नी अभिनेत्री डायना डिल हिला त्याने फेब्रुवारी, १९५० रोजी घटस्फोट दिल्यानंतर त्याने २९ मे, १९५४ रोजी पॅरिसच्या अॅन बायडेन्सशी विवाह केला. प्रथम पत्नीपासून त्याला मायकेल व जोएल असे दोन मुलगे झाले. दुसऱ्या पत्नीपासूनही त्याला पीटर व्हिन्सेन्ट व एरिक अॅन्थनी असे दोन मुलगेच झाले आहेत. बिव्हर्ली हिलसवर त्याचे अत्याधुनिक निवासस्थान आहे. आपल्या घरच्या अंगणातच त्याने टेनिस कोर्ट व स्वीमिंग पूल तयार करवून घेतला आहे. छायाचित्रण हा त्याचा आवडता छंद आहे. गोल्फ खेळणे, पोहणे, स्काईंग टेनिस हे त्याचे आवडते खेळ आहेत. व्यायामाचा तो पहिल्यापासून भोक्ता आहेच. त्यामुळेच या वयातही त्याची शरीरप्रकृती बांधेसूद व दणकट आहे.

हॉलिवुडमधील भानगडींशी केव्हाही तो संबंध ठेवीत नाही. त्यामुळेच कलेतील आपला दर्जेदारपणा त्याने वैयक्तिक जीवनातही ठेवला आहे. लोकांच्या चर्चेचा विषय तो केव्हाही झाला नाही. आपल्या अभिनयाकडे अधिकाअधिक लक्ष देण्यात तो समाधान मानतो. त्याशिवाय स्वतःच्या चित्रपट संस्थेचे कामही तो जातीने पाहतो. त्यामुळेच त्याने निर्माण केलेले चित्रपट अत्यंत वैशिष्टयपूर्ण व प्रशंसनीय ठरले आहेत. एक यशस्वी निर्माता व अभिनयकुशल कलाकार म्हणून कर्क डग्लसचे स्थान निश्चित वरच्या दर्जाचे आहे. आणि ते त्याने आपल्या मेहनतीने, अखंड प्रयत्नाने मिळविले आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. ●

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

दिनांक २२ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट १९६६

**मेष :** आपल्या राशीस गुरू आणि मंगळ दोन्हीही प्रतिकूल ग्रह आहेत. त्यामुळे स्वतःच्या प्रकृतीस त्रास व घरात अडीअडचणी निर्माण होतील. घरात वादविवाद व अकारण द्रव्यखर्च होईल. दि. २३–२४ या दोन्ही तारखा प्रतिकूल आहेत. मानसिक स्वास्थ्य बिघडेल. कोणतेही नवीन व्यवहार करू नयेत. वरिष्ठांशी खटके उडतील.

**वृषभ :** आपल्या पराक्रमात पुष्कळशा ग्रहांची बैठक भरत आहे. अनिष्ट राहूचे परिभ्रमणही संपत आहे त्यामुळे या सप्ताहात घडाडीने प्रयत्न करावेत. कोणत्याही कार्यात यश येईल. भावास फायदा होईल. ज्याचे कृत्तिका नक्षत्र असेल त्यास हा सप्ताह जास्ती शुभ आहे. दि. २८, २९ शुभ.

**मिथुन :** आपले धनस्थानात गुरूचे परिभ्रमण होत आहे. आपल्या आर्थिक स्थितीत त्यामुळे निश्चित सुधारणा. ज्यांचे मृग नक्षत्र आहे त्यांना हा सप्ताह जास्त शुभ. गुरू अनुकूल त्यामुळे रवीही अनुकूल. त्यामुळे कुठल्याही कार्यात निश्चित यश. ३०, ३१ तारखा जास्त शुभ.

**कर्क :** आपणांस गुरू अनुकूल आहेच. त्यामुळे रवीही अनुकूल. त्यामुळे घरात आनंदी वातावरण. घरात शुभ कार्य घडेल. अकस्मात अर्थप्राप्तीचा योग. मंगळ प्रतिकूल असल्याने उष्ण विकारांपासून तब्येतीस त्रास. नोकरीत स्थिरता व बढतीचा योग. २३, २४ शुभ.

**सिंह :** आपल्या राशीत गुरू व मंगळ हे दोन्ही ग्रह १२ वे आहेत. त्यामुळे घरात अडीअडचणी व वादविवाद. संततीच्या तब्येतीस त्रास. अकारण द्रव्यखर्च होईल. मित्रांपासून जपावे. प्रवास टाळावा. अपघाताचा योग आहे. २३, २४ अशुभ. कुठलेही कार्य करू नये. सप्ताह आपणांस प्रतिकूल.

**कन्या :** आपल्यावर गुरुमहाराजांची पूर्ण कृपा आहे. त्यामुळे आपल्याला कोणत्याही कार्यात यश येऊन, बेत सफल होतील. रवी १२ वा असल्याने तब्बेतीस त्रास. २८, २९ शुभ दिवस. प्रेमिकांचे प्रेम सफल होईल. कनिष्ठ लोकांपासून त्रास.

**तूळ :** दशमात गुरू–मंगळ व लाभस्थानात रवी असल्यामुळे आपल्या मनाजोगत्या गोष्टी घडू लागतील. ज्यांचे मघा नक्षत्र चतुर्थ चरण असेल त्यांना अकस्मात धनाचा लाभ. सर्व गोष्टी मनाजोगत्या घडतील. दिनांक ३० शुभ.

**वृश्चिक :** आपणांस रवि–मंगळ या दोन्ही ग्रहांचे साहाय्य आहे. त्यामुळे आपल्या परिस्थितीत चांगली सुधारणा होईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल. बेकारांना नोकरी मिळेल. दि. ३० प्रतिकूल, दि. २७, २८ शुभ घटना.

**धनू :** आपणांस गुरू जरी अष्टमात आहे, तरी भिण्याचे कारण नाही. तो कारक ग्रह असल्यामुळे शुभ फलच देईल. आपण साडेसातीतून मुक्त झाला आहात व शनी–गुरूचा शुभ योग असल्याने नवीन तऱ्हेचा आर्थिक योग येईल, कोर्ट-कामात यश. दिनांक २५, २६ शुभ. शक्यतो प्रवास करू नये.

**मकर :** आपल्या राशीत गुरू आणि शनी दोन्हीही अनुकूल आहेत. त्यामुळे नोकरीत बढती–बदलीचा योग आहे. मात्र रवी अष्टमात असल्यामुळे पाय किंवा पोटातील विकारांपासून त्रास. २५, २६ प्रतिकूल. २८, २९ शुभ तारखा. गृहिणींना त्यांच्या पतीपासून अधिक मर्जी प्राप्त होईल.

**कुंभ :** आपल्या साडेसातीतली शेवटची २॥ वर्षे चालू आहेत. आपले पुष्कळसे त्रासाचे काम कमी होईल. २८ ता. प्रवासाचा योग. नवीन तऱ्हेने अर्थप्राप्ती होऊन परिस्थितीत सुधारणा होईल. कोर्टाची कामे पुढे ढकलावीत. कनिष्ठ लोकांशी वादविवादाचा प्रसंग. दिनांक ३० शुभ.

**मीन :** आपल्या राशीस गुरूची पूर्ण कृपा आहे. बरेच दिवसांपासून मनात घोळणाऱ्या गोष्टी सिद्धीस जातील. साडेसाती जरी असली तरी गुरुकृपेमुळे आपणांस अडचण भासणार नाही. २५, २६ शुभ. ●

## मिया बीबी राजी तो ....

आयुष्याचा खराखुरा जोडीदार निवडण्यासाठी आता वणवण फिरण्याची गरज नाही की अनेकदा प्रेमभंग करवून घेण्याचीही गरज नाही. एका अद्ययावत कॉम्प्युटरला तुम्ही तुमची वैयक्तिक माहिती पुरविली की भराभर गणिते करून ते यंत्र अवघ्या काही तासांच्या अवधीत तुम्हांला लायक असा सर्वोत्तम जोडीदार मिळवून देईल.

ब्रिटनमधील एका खाजगी कंपनीने लग्ने जमवून देण्यासाठी अशा तऱ्हेचे एक खास कॉम्प्युटरच तयार केले आहे. या कॉम्प्युटरच्या साहाय्याने सुमारे २००प्रश्नांची उत्तरे काढून एका प्रश्नपत्रिकेवरून १५००निष्कर्ष निघू शकतील.

विशेष म्हणजे वैयक्तिक नाजुक प्रश्नांची उत्तरे यंत्राला देतांना तरुण तरुणींना मुळीच लाज वाटणार नाही आणि अशा प्रश्नांची ते मोकळेपणे उत्तरे देतील व त्यामुळे निघणारे निष्कर्ष अधिक बरोबर ठरतील. अर्थातच जोडीदाराची निवड अधिक काटेकोरपणे होईल. अशा तऱ्हेने यंत्राच्या साहाय्याने जोडीदार निवडण्याची पद्धत ही सर्वात प्रभावी असल्याचे शास्त्रज्ञांना आता वाटू लागले आहे. याच यंत्राचा उलटाही उपयोग करता येईल. घटस्फोट घेऊ इच्छिणारे जोडपे खरोखरच एकमेकांशी जमवून घेऊ शकत नाही काय हे यंत्राच्या साहाय्याने माहिती करून घेता येईल.

- *Concessionaires of Mines*
- *Leading Exporters*

OF

- Mineral Ores
- Steamship Agents
- Air Travel Agents
- Insurance Agents
- Manufacturers' Representatives
- Civil Construction

# V. S. DEMPO & CO.

PRIVATE LIMITED.

Pangim – Goa.

BRANCHES : MARMAGOA HARBOUR, VASCO DA GAMA, MARGOA.

[ कव्हर पान २ वरून ]

## आपण आपला अंक कोठून घेणार ?

स्थानिक विक्रेत्यांकडून घेतला तरी हरकत नाही. पण वर्गणीदार होण्याचे ठरवत असाल तर या आकर्षक सवलतीचा आपण विचार करू शकता.

**' माणूस ' साप्ताहिकाची दिवाळी अंकासहित वार्षिक वर्गणी आहे रुपये वीस.**

★ पाच वर्षांची वर्गणी होते रुपये शंभर. आपण पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी ' माणूस 'कडे एकदम भरली तर सहा वर्षे— एक वर्ष अधिक— ' माणूस ' साप्ताहिकाचे अंक आपल्याला घरपोच मिळतील.

*म्हणजेच वर्गणीत वीस टक्के सवलत मिळून आपली वीस रुपये बचत होईल.*

आपण मनात आणले तर

*' माणूस पंचवार्षिक ग्राहक योजना '* यशस्वी करणे

आपल्याला मुळीच अवघड नाही.

स्वावलंबनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून,

### अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी—

### ' माणूस 'ने सव्वा लाखाचे हे प्रस्थान ठेवले आहे.

आपणही या प्रस्थानयात्रेत सहभागी होऊ शकता.

हा प्रजासूय यज्ञ सिद्धीस नेऊ शकता.



*रामायणातल्या*

*त्या छोटया खारीइतका*

*पुण्य संचय*

*करू शकता.*

MANOOS ( Weekly ) : 20 Aug. 66 : 40 Paise : Regd. No. M H-649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.